वन विभागाच्या प्रशासकीय संरचनेत पुनर्रचना करण्याच्या अनुषंगाने वन विभागांतर्गत मुख्य लेखापाल व कार्यालय अधिक्षक या पदांमध्ये श्रेणीवाढ करुन शासन आदेश क्र.एमएफएस-२००९/७३१/प्र.क्र.१३३/फ-८, दि.२६/९/२०११ अन्वये प्रशासकीय अधिकाऱ्यांची १२ पदे व कार्यालय अधिक्षकांची ३२ पदे श्रेणीवाढीने निर्माण करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार श्रेणीवाढीने निर्माण करण्यात आलेल्या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करणे आवश्यक असून त्याप्रमाणे प्रशासकीय अधिकारी व कार्यालय अधिक्षक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या खालीलप्रमाणे कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात येत आहेत :-

(अ) प्रशासकीय अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदारीचे स्वरुप पुढीलप्रमाणे राहील :-

वित्तीय कामे

(१) प्रशासकीय अधिकारी यांनी वनवृत्ताचे आहरण व संवितरण अधिकारी (Drawing and Disbursing Officer) म्हणून कर्तव्य करावेत.

(२) वेळोवेळी शासनाने प्रदान केलेले वित्तीय अधिकार व शक्तीच्या अधीन राहून सक्षम नियंत्रक अधिकाऱ्यांची मान्यता घेवून राजपत्रित अधिकारी व अराजपत्रीत कर्मचारी यांना प्रवास अग्रिम (Tour Advance) देणे संबंधी कार्यवाही करणे.

(३) अराजपत्रित कर्मचाऱ्यांना स्वग्राम सवलत व रजा प्रवास सवलत संबंधीत नियंत्रक अधिकाऱ्यांची मंजूरी घेऊन त्यांची देयके पारीत करण्याकरीता संबंधित कोषागार कार्यालयास पाठविणे.

(४) वरकमीय प्रतिपूर्ती प्रकरणांची देयके पारित करण्याकरीता संबंधीत कोषागार कार्यालयास पाठविणे.

(५) कोषागार कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या धनादेशानुसार/ Electronic Fund Transfer नुसार प्राप्त झालेली रक्कम संबंधीतांना अदा करणे.

(६) शासकीय कर्मचा-यांच्या वैयक्तिक दाव्या व्यतिरिक्त इतर अदायगी प्रकरणी प्रशासकीय अधिकारी यांना LOC चे धनादेश स्टेट बँक ऑफ इंडीया/ भारतीय रिझर्व बँक यांच्याकडे आहरण (Drawn) करण्याचे अधिकार देणे.

(७) वाहन चालकांना अतिकालीक भत्ता (Over Time Allowance) सक्षम नियंत्रक अधिका-यांची मंजूरी घेऊन त्याबाबी देयके कोषागार कार्यालयास पारित करण्याकरीता पाठविणे.

(८) सेवा निवृत्ती प्रकरणी प्राप्त झालेल्या सर्व लाभाविषयीची सर्व देयके तयार करून कोषागार कार्यालयास अदायगी करिता पाठविणे.

(९) अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वाहिक वेतन देयके, प्रवास भत्याची देयके भविष्य निर्वाह निधीतील परतावा अग्रीम देयके, घरबांधणी अग्रीम / मोटार सायकल अग्रीम / कार अग्रीम इ. देयके तयार करून पारीत करण्याकरीता कोषागार कार्यालयात पाठविणे.

(१०) प्रादेशिक वनवृत्त कार्यालयाचा रोखलेखा मुंबई वनसंहीता (Bombay Forest Manual) Vol-1 मधील तरतुदीनुसार तयार करणे व महालेखाकार कार्यालयास सादर करणे.

(११) वनखात्याचे महसूल थकबाकीवर तसेच अग्रीम वसूलीवर नियंत्रण ठेवणे.

(१२) लेखा संबंधी उद्भविक निवेतकालीके तयार करणे.

वरील सर्व कामे वेळोवेळी शासनाने प्रदान केलेल्या वित्तीय अधिकार व शक्तीच्या अधीन राहून सक्षम नियंत्रक अधिकारी यांची मान्यता घेवूनच संबंधीत प्रधान मुख्य वनसंरक्षक/अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक/मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या नियंत्रणा खाली करण्यात येतील.

आस्थापना विषयक कामे.

(१) प्रादेशिक वनवृत्त कार्यालयाची टपाल मार्किंग करणे व जनतेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीचे निवारण करणे.

(२) आस्थापनाविषयक विविध बाबी उदा. सेवानिवृत्तीचे प्रकरणे, अस्थायी पदांचे चालू वाढ प्रस्ताव इत्यादी तयार करून मंजुरीसाठी सादर करणे.

(३) वनवृत्तातील तथा वृत्तीय कार्यालयातील कार्यालयीन कर्मचारी यांना सर्व आस्थापनाविषयक बाबी (उदा. नेमणुका, बदल्या, वेतन निश्चिती, सेवा निवृत्तीची प्रकरणे, विभागीय चौकशीची प्रकरणे इत्यादी) हाताळण्यास मार्गदर्शन करणे व त्याचे कामावर नियंत्रण ठेवणे.

(४) गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांच्या रजा व वेतनवाढी सक्षम नियंत्रक अधिका-यांची मंजुरी घेवून प्रकरणाचा निपटारा करणे.

(५) मानव संसाधनाच्या विकासाच्या दृष्टीने प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्यालय यांनी तयार केलेले उपक्रम राबविणे.

(६) कार्यालयीन कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी सक्षमरीत्या हाताळणे.

(७) गट-क संवर्गातील कर्मचा-यांचे पदोन्नती समितीमध्ये सदस्य/सदस्य सचिव म्हणून कार्य करणे.

(८) गट-क संवर्गातील कर्मचा-यांचे बदली प्रस्ताव प्रशासकीय अधिका-या मार्फत सक्षम नियंत्रक अधिकारी यांस सादर करणे.

(९) न्यायालयीन प्रकरणात आस्थापनाबाबी विषयक प्रतिज्ञापत्र दाखल करणे व आवश्यकतेनुसार न्यायालयात हजर राहून शासनाची बाजू मांडणे.

(१०) कनिष्ठतासूचीत गट-क ते गट-ड पर्यंतच्या अधिका-यांना/कर्मचा-यांना पदोन्नती विषयक बाबीबाबत आवश्यक सक्षम नियंत्रक अधिका-यांची मंजुरी घेवून प्रकरणाचा निपटारा करणे.

(११) नियमानुसार नियंत्रक अधिकारी यांचे महीन्यात ज्या ठिकाणी आवश्यकता आहे अशी कागदपत्रे सादर करून त्यांनी अनुमोदीत केलेल्या मसुद्याच्या टंकलिखीत प्रतीवर त्यांच्या वतीने सहया करणे.

(१२) विभागीय कार्यालयांची वार्षिक तपासणी संबंधी कार्यक्रम तयार करून त्यास नियंत्रक अधिका-याची मान्यता घेवून तपासणी कार्यक्रम राबविणे.

(१३) सर्व्हीस पोस्टेज स्टेम्पस रजिस्टरची तपासणी करणे

(१४) शासनाने वेळोवेळी केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यालयातील निरुपयोगी कागदपत्रे नष्ट करणे.

(१५) कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिकछळ प्रकरणी वृत्तस्तरावर गठीत करण्यात आलेल्या महिला तक्रार निवारण समितीची बैठक दोन महिन्यातून एकदा आयोजित करणे.

(१६) वृत्तस्तरावरील सर्व लेखापरिक्षण परिच्छेदाचे उत्तर तयार करून लेखापरीक्षण परिच्छेदाचा जलद गतीने निपटारा करणे.

(१७) उपरोक्त कामाशिवाय नियंत्रक अधिकारी यांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे सुध्दा करतील.

(ब) कार्यालय अधिक्षक यांचे कर्तव्ये व जबाबदारीचे स्वरूप पुढीलप्रमाणे राहील :-

<u>आस्थापना विषयक कामे</u>

(१) विभागीय कार्यालयाची टपाल मार्किंग करणे व जनतेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीचे निवारण करणे.

(२) विभागीय कार्यालयातील कर्मचा-यांवर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे व संबंधीत वनविभागातील सर्वआस्थापनाविषयक बाबी (उदा. नेमणुका, बदल्या, वेतन निश्चिती, सेवा निवृत्तीची प्रकरणे, विभागीय चौकशीची प्रकरणे इत्यादी.) हाताळण्यास मार्गदर्शन करणे.

(३) गट-ड संवर्गातील कार्यालयीन कर्मचा-यांचे पदोन्नती समितीमध्ये सदस्य/सदस्य सचिव म्हणून कार्य करणे.

(४) विभागातील गट-अ ते गट-ड च्या अधिका-यांना/कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीमधून परताव्या अग्रीम सक्षम नियंत्रक अधिका-यांची मंजूरी घेवून प्रकरणाचा निपटारा करणे.

(५) अधिका-यांचे व कर्मचा-यांचे मासिक वेतन देयके, प्रवास भत्याची देयके, अतिकालीक भत्याची देयके, भविष्य निर्वाह निधीमधून काढण्यांत येणा-या रक्कमेची देयके, वैद्यकिय प्रतीपुर्तीची देयके, सेवानिवृत्ती विषयक लाभाची सर्व प्रकारची देयके, स्वग्राम सवलतीची व रजा प्रवास सवलतीची देयके, सण अग्रीमाची देयके इत्यादी प्रकारची देयके तयार करुन पारीत करण्याकरीता कोषागार कार्यालयात पाठविणे.

(६) गट-अ ते गट-ड मधील अराजपत्रीत कर्मचा-यांच्या रजा व वेतनवाढी सक्षम अधिका-याची मंजूरी घेवून प्रकरणाचा निपटारा करणे.

(७) गट-क व गट-ड मधील अराजपत्रीत कर्मचा-यांना स्वग्राम सवलत व रजा प्रवास सवलत सक्षम अधिका-यांची मंजूरी घेवून प्रकरणाचा निपटारा करणे.

(८) वनपरिक्षेत्र कार्यालयाची वार्षिक तपासणी कार्यक्रम तयार करून नियंत्रक अधिका-यांच्या मान्यतेनंतर तपासणी कार्यक्रम राबविणे.

(९) सर्व्हीस पोस्टेज स्टॅम्प्स् रजिस्टरची तपासणी करणे.

(१०) शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यालयातील निरुपयोगी कागदपत्र नष्ट करणे.

(११) वनखात्याचे महसूल थकबाकीवर तसेच अग्रीम वसुलीवर नियंत्रण ठेवणे.

(१२) नियमानुसार वनसंरक्षक/उपवनसंरक्षक यांचे सहीची आवश्यकता आहे. अशी कागदपत्रे सोडून त्यांनी अनुमोदीत केलेल्या मसुद्यांच्या टंकलिखीत प्रतीवर सहया करणे.

(१३) विभागीय स्तरावरील सर्व लेखापरीक्षण परिच्छेदाचे उत्तर तयार करून व त्यास संबंधीत नियंत्रक अधिका-यांची मान्यता घेवून लेखापरीक्षण परिच्छेदाचा जलद गतीने निपटारा करणे.

(१४) उपरोक्त कामेशिवाय नियंत्रक अधिकारी यांनी वेळोवेळी नेमुन दिलेली कामे सुध्दा करतील.

उपरोक्त नमुद केलेली सर्व कामे ही संबंधित कार्यालय अधिक्षक हे त्यांचे संबंधीत नियंत्रक अधिकारी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ट वनोपज, सनियंत्रण व मुल्यांकन) म.स.नागपूर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना), पूणे, मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती, मुख्य वनसंरक्षक मुल्यनिर्धारण घटक, नागपूर, मुख्य वनसंरक्षक (शिक्षण वृत्त), पूणे, मुख्य वनसंरक्षक (भूमि अभिलेख कक्ष), नागपूर, मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर/ ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर/संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, वनसंरक्षक याचतुक व विपणन विभाग बल्लारशाह, प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने), नागपूर व उपवनसंरक्षक (प्रादेशिक), यांचे नियंत्रणाखाली करतील.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

(ने.ए.फोंडके)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक व महा.संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, पुणे
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्या., नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
अपर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर / नाशिक / मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव)
मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक.
वन विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती (फ-८ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.३२.

ANNEXURE 5.01

वन विभागासाठी पदांचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:-एमएफएस-२०१७/प्र.क्र.७७ /फ-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १३ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :१) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एमएससी-१०९९/प्र.क्र.१८/फ-२ दि.१०/०१/२००३.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१ दि.१४/०१/२०१६
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१ दि.११/०२/२०१६
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक-पदनि २०१६/प्र.क्र.३०/१६/ वित्तीय सुधारणा-१/ दि.१६ /०९/२०१६
५) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक-पदनि ०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि.२९/०६/२०१७
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-७ / प्र.क्र.३३(१७-१८)/२८/१९-२०, दि.२८/०५/२०१९.
७) वित्त विभागाचे पत्र क्रमांक पदनि २०१९/प्र.क्र.३९/१९ आपुक दि.०३/०८/२०१९

प्रस्तावना:-

वित्त विभागाच्या शासन निर्णय संदर्भ क्र. ३, दि. ११/०२/२०१६ अन्वये प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील मंजूर पदांचा आढावा घेऊन सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग दि. २९/०६/२०१७ अन्वये सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. याअनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वन विभागातील क्षेत्रीयस्तरावरील पदांचा आढावा घेऊन पदांचा सुधारीत आकृतीबंध संदर्भ क्र. ६, दि.२८/०५/२०१९ च्या पत्रान्वये सादर केला आहे. वन विभागासाठी सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्याच्या अनुषंगाने मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.०८/०७/२०१९ रोजी उच्च स्तरीय सचिव समितीची बैठक झाली. सदरहू बैठकीमध्ये वन विभागासाठी विविध संवर्गातील एकूण १९०३४ नियमित + ४२९ अधिसंख्य पदे व ८३२९ वनमजूर (अधिसंख्य) असा एकूण २७७९२ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने वन विभागाचा पदांचा आकृतीबंध मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-पदनि ०६१७/प्र.क्र.०८/ विसु-१ दि.२९ जून, २०१७ अन्वये विभागातील सर्व पदांचा सर्वकश आढावा घेण्यात आला असून, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८/०७/२०१९ रोजीच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या मंजूरीनुसार वन विभागासाठी विविध संवर्गातील एकूण १९०३४ नियमित + ४२९ अधिसंख्य पदे व ८३२९ वनमजूर (अधिसंख्य) असा एकूण २७७९२ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

अ) वन विभागासाठी विविध संवर्गातील एकूण १९०३४ नियमित + ४२९ अधिसंख्य पदे व ८३२९ वनमजूर (अधिसंख्य) असा एकूण २७७९२ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे. त्याचा तपशिल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **विवरणपत्र-अ** नुसार राहील.

आ) प्रचलित आकृतीबंधातील विविध संवर्गातील एकूण **५८५** इतकी पदे निरसित करण्यात येत आहेत. त्याचा तपशिल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **विवरणपत्र-ब** नुसार राहील.

इ) प्रचलित आकृतीबंधातील **एकूण ६६ संवर्ग** मृत संवर्ग घोषित करण्यात येत आहेत. या संवर्गातील कार्यरत पदे संबधित कर्मचारी सेवानिवृत्तीपर्यंत चालू राहतील, तद्नंतर ती पदे व्यपगत होतील. या संवर्गातील कार्यरत ४२० पदे अधिसंख्य दर्शविण्यात येत असून, रिक्त असलेली २७९ पदे तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येत आहेत, त्याबाबतचा तपशिल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **विवरणपत्र-क** नुसार राहील.

ई) विविध संवर्गातील नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पदांचा तपशिल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **विवरणपत्र-ड** नुसार राहील. सदर पदांपैकी मंजूर आकृतीबंधामध्ये नसलेले पूर्णपणे नवीन संवर्ग/पदाचे सेवा प्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागामार्फत मंजूर करुन घेण्यात येतील.

हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.४०१/आपुक/२२/०८/२०१९ व क्र. ३३१/२०१९/सेवा-९ दि.२८/०८/२०१९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१८०५२५४११९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

सोबत: विवरणपत्र-अ, ब,क व ड

(वीरेंद्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)
महसूल व वन विभाग.

प्रति:-

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
३. मा. मंत्री(वने)/मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
५. अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे स्वीय सहायक
६. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक
७. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक
८. प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक
९. प्रधान सचिव (वि.सु.) यांचे स्वीय सहायक
१०. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक

११.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१३.प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (सर्व)
१५.मुख्य वनसंरक्षक (सर्व)
१६.वनसंरक्षक (सर्व) / उप वनसंरक्षक (सर्व) / विभागीय वन अधिकारी (सर्व)
१७.महालेखापाल -१ व २ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुबंई/नागपूर
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
१९.वित्त विभाग, आपुक /व्यय-१०/अर्थसं-१९, वित्तीय सुधारणा मंत्रालय, मुंबई.
२०.नियोजन विभाग- कार्यासन १४३२, मंत्रालय, मुंबई.
२१.वन विभाग- सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२.कार्यासन -ब (१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२३.निवडनस्ती, फ-८ कार्यासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

विवरणपत्र-अ

वन विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदाच्या सुधारीत आकृतीबंधाबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्यात आला. उच्चस्तरीय सचिव समितीने खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार एकूण १९०३४ नियमित + ४२९ अधिसंख्य पदे व ८३२९ वनमजूर (अधिसंख्य) असा एकूण २७७९२ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास शासनाची मान्यता देण्यात येत असलेली विविध संवर्गातील पदांचा तपशिल:-

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधातील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
	गट अ					
१	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) /प्रधान मुख्य वनसंरक्षक	Level -१७ २२५००० Level -१६ २०५४००-२२४४००	७	०	०	**७**
२	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक	Level-१५ १८२२००-२२४१००	१६	०	०	**१६**
३	मुख्य वनसंरक्षक	Level-१४ १४४२००-२१८२००	२४	०	०	**२४**
४	वनसंरक्षक	Level-१३A १३११००-२१६६००	१८	०	०	**१८**
५	उपवनसंरक्षक	१) Level-१३ १२३१००-२५१९०० २) Level-१२ ७८८००-२०९२०० ३) Level-११ ६७७००-२०८७०० ४) Level-१० ५६१००-१७७५००	६८	०	०	**६८**
६	विभागीय वन अधिकारी	S-२३ ६७७००-२०८७००	१२२	०	१३	**१०९**
७	सहायक संचालक	S-२३ ६७७००-२०८७००	०	**१**	०	**१** **नवीन पद**
८	उप आयुक्त, पशुसंवर्धन वन्यजीव	S-२३ ६७७००-२०८७००	१	०	०	**१**
९	सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन वन्यजीव	S-२२ ६००००-१९०८००	३	०	०	**३**
१०	पशुवैद्यकीय अधिकारी	S-१५ ४१८००-१३२३००	८	०	०	**८**

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधा तील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
११	मुख्य वन सांख्यिकी	S-२३ ६७७००-२०८७००	२	०	१	**१**
१२	वन अभियंता	S-२३ ६७७००-२०८७००	१	०	०	**१**
१३	सहाय्यक वन संरक्षक	S-१८ ४९१००-१५५८००	३१६	०	२७	**२८९**
१४	प्रशासकीय अधिकारी	S-२३ ६७७००-२०८७००	२०	०	०	**२०**
१५	वन सांख्यिकी	S-२० ५६१००-१७७५००	९	०	३	**६**
१६	उप वन अभियंता	S-२० ५६१००-१७७५००	१३	०	०	**१३**
१७	वैद्यकीय अधिकारी	S-२० ५६१००-१७७५००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
१८	वन जमाबंदी अधिकारी (प्रतिनियुक्तीचे पद)	S-२० ५६१००-१७७५००	५	०	०	**६**
१९	उपसंचालक (भूमि अभिलेख) (प्रतिनियुक्तीचे पद)	S-२३ ६७७००-२०८७००	१	०	१	**मृत संवर्ग**
२०	वरिष्ठ स्वीय सहायक	S-२३ ६७७००-२०८७००	३	०	०	**३**
२१	स्वीय सहाय्यक	S-१६ ४४९००-१४२४००	९	०	०	**९**
	एकूण गट अ		**६४७**	**१**	**४५**	**६०४**
१	कार्यालय अधिक्षक	S-१५ ४१८००-१३२३००	७३	०	०	**७३**
२	वन क्षेत्रपाल	S-१५ ४१८००-१३२३००	९९२	०	१	**९९१**
३	सहायक रासायनिक विश्लेषक	S-१५ ४१८००-१३२३००	०	**१**	०	**१ नवीन पद**
४	सहाय्यक अभियंता	S-१५ ४१८००-१३२३००	३	०	०	**३**
५	शाखा अभियंता	S-१५ ४१८००-१३२३००	१७	०	०	**१७**
६	कर्मशाळा अधीक्षक	S-१५ ४१८००-१३२३००	२	०	२	**०**

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधातील मंजूर पदे	उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध
१	२	३	४	५	६	७
७	उप वन अभियंता (यांत्रिकी)	S-१६ ४४९००-१४२४००	१	०	१	**०**
८	सहाय्यक वन सांख्यिकी	S-१५ ४१८००-१३२३००	१७	०	३	**१४**
९	सहाय्यक वैद्यकीय अधिकारी	S-१५ (For MBBS) ४१८००-१३२३०० S-१४ (For Others) ३८६००-१२२८००	७	०	४	**३ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
१०	तालुका निरीक्षक, भूमिअभिलेख (प्रतिनियुक्तीचे पद)	S-१५ ४१८००-१३२३००	३	०	०	**३**
११	पर्यवेक्षक	S-१७ ४७६००-१५११००	१	०	०	**१**
१२	हस्तशिल्प निर्देशक	S-१५ ४१८००-१३२३००	२	०	०	**२**
	एकूण गट ब		**१११८**	**१**	**११**	**११०८**
१	लघुलेखक (उच्चश्रेणी)	S-१५ ४१८००-१३२३००	३९	०	४	**३५**
२	लघुलेखक (निम्नश्रेणी)	S-१४ ३८६००-१२२८००	५२	०	७	**४५**
३	क्षेत्र भूमापक	S-१४ ३८६००-१२२८००	५६	०	०	**५६**
	एकूण गट ब (अराजपत्रित)		**१४७**	**०**	**११**	**१३६**
१	मंडल निरीक्षक (प्रतिनियुक्तीचे पद)	S-८ २५५००-८११००	५	**१**	०	**६ (५+१ नवीन पद)**
२	मुख्य लेखापाल	S-१३ ३५४००-११२४००	१६८	०	०	**१६८**
३	लेखापाल	S-१० २९२००-९२३००	८७४	०	०	**८७४**
४	लिपिक	S-६ १९९००-६३२००	१६४८	०	०	**१६४८**
५	वनपाल	S-८ २५५००-८११००	३०२५	०	०	**३०२५**

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधातील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
६	वनरक्षक	S-३ १६६००-५२४०० S-५ १८०००-५६९००	९४६१	**२१६**	०	**९६७७ (९४६१+२१६ नवीन पदे)**
७	सर्वेक्षक	S-८ २५५००-८११००	२२१	०	१७	**२०४**
८	कनिष्ठ अभियंता	S-१४ ३८६००-१२२८००	१०	०	०	**१०**
९	वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक	S-१४ ३८६००-१२२८००	२३	०	३	**२०**
१०	कानिष्ठ सांख्यिकी सहाय्यक	S-८ २५५००-८११००	२९	०	९	**२०**
११	लघु टंकलेखक	S-८ २५५००-८११००	४६	०	४०	**६ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
१२	आरेखक	१)S-१० २९२००-९२३०० २)S-१४ ३८६००-१२२८०० (After 4 years of Qualifying Service)	४	०	२	**२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
१३	अनुरेखक	१)S-७ २१७००-६९१०० २)S-८ २५५००-८११०० (After 7 years of Qualifying Service)	१२	०	२	**१० अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
१४	हत्यारी पोलीस	S-६ १९९००-६३२००	१५०	०	०	**१५०**
१५	सहाय्यक कुरेटर	S-८ २५५००-८११००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधातील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
१६	अव्वल कारकून (प्रतिनियुक्तीचे पद)	S-१० २९२००-९२३००	५	१	०	६ (५+१ नवीन पद)
१७	चित्रकार	S-१० २९२००-९२३००	४	०	३	१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)
१८	सहाय्यक आरेखक	S-८ २५५००-८११०० (S-१३) ३५४००-११२४०० After 5 years of Qualifying Service	२	०	२	मृत संवर्ग
१९	स्वंयचल विजतंत्री	S-७ २१७००-६९१००	२	०	०	२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
२०	सहाय्यक यांत्रिकी	S-६ १९९००-६३२००	८	०	५	३ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
२१	सहाय्यक सांधाता	S-६ १९९००-६३२००	१	०	०	१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)
२२	मिश्रक	S-१० २९२००-९२३००	७	०	४	३ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
२३	पोलीस	S-६ १९९००-६३२००	१८	०	३	१५
२४	वाणिज्य लेखापाल	S-१४ ३८६००-१२२८००	१	०	०	१
२५	काळजीवाहक	S-३ १६६००-५२४००	४	०	३	१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)
२६	उप लेखापाल	S-१३ ३५४००-११२४००	१	०	०	१
२७	ट्रक चालक	S-६ १९९००-६३२००	६६३	०	१६३	५००

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधा तील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
२८	आवेधक	S-३ १६६००-५२४००	१	०	१	मृत संवर्ग
२९	यांत्रिकी	S-८ २५५००-८११००	२४	०	९	**१५ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
३०	जोडारी / वरिष्ठ जोडारी	S-६ १९९००-६३२००	५	०	०	**५ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
३१	प्रमुख पोलीस शिपाई	S-८ २५५००-८११००	३	०	१	**२**
३२	गृह प्रमुख	S-१० २९२००-९२३००	२	०	०	**२**
३३	लाँच चालक	S-७ २१७००-६९१००	७	०	३	**४**
३४	लेथमन (कर्मशाळा)	S-८ २५५००-८११००	४	०	२	**२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
३५	निक्षणक	S-८ २५५००-८११००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
३६	एसआरपी वाहनचालक (प्रतिनियुक्तीचे पद)	S-६ १९९००-६३२००	१	०	०	**१**
३७	एअर कॉम्प्रेसर चालक	S-६ १९९००-६३२००	१	०	१	मृत संवर्ग
३८	उप मुख्य लेखापाल (प्रतिनियुक्तीचे पद)	S-१३ ३५४००-११२४००	१	०	०	१
३९	विजतंत्री	S-८ २५५००-८११००	९	०	४	५ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
४०	प्रसविका	S-६ १९९००-६३२००	४	०	२	२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
४१	माहुत	S-६ १९९००-६३२००	१९	०	४	१५
४२	लहान आगगाडी चालक	S-६ १९९००-६३२००	१	०	१	मृत संवर्ग

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधातील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
४३	मिनी ट्रेन गार्ड	S-५ १८०००-५६९००	१	०	१	मृत संवर्ग
४४	पोलीस बिनतारी संदेश दुय्यम निरीक्षक (प्रतिनियुक्तीचे पद)	S-१४ ३८६००-१२२८००	४	०	१	३
४५	शारीरिक प्रशिक्षण ड्रिल शिक्षक	S-१३ ३५४००-११२४००	२	०	०	२
४६	कवायत शिक्षक	S-७ २१७००-६९१००	१	०	०	१
४७	नभोवाणी यांत्रिकी	S-८ २५५००-८११००	२	०	२	मृत संवर्ग
४८	करवत्या	S-८ २५५००-८११००	७	०	१	६ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
४९	भांडारपाल	S-८ २५५००-८११००	९	०	३	६ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
५०	सांधाता	S-६ १९९००-६३२००	४	०	१	३ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
५१	बिनतारी संदेश चालक	S-८ २५५००-८११००	११	०	९	२
५२	बिनतारी तंत्रज्ञ	S-८ २५५००-८११००	१	०	०	१
५३	तारतंत्री	S-७ २१७००-६९१००	२	०	०	२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
५४	प्रक्षेपित चालक	S-७ २१७००-६९१००	३	०	२	१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)
५५	ग्रंथपाल परिचर	S-१ १५०००-४७६०० S -६ १९९००-६३२००	३	०	१	२
५६	पशु परिचर	S-३ १६६००-५२४००	४	०	१	३

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधा तील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
५७	लोहार	S-६ १९९००-६३२००	१	०	०	१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)
५८	डिघी चालक	S -६ १९९००-६३२००	२	०	२	मृत संवर्ग
५९	निमतनदार (प्रतिनियुक्तीचे पद)	S-१३ ३५४००-११२४००	४	०	०	४
६०	बिनतारी संदेशक	S-८ २५५००-८११००	१	०	०	१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)
६१	वननिरीक्षक	S-५ १८०००-५६९००	१०८	०	०	१०८
६२	द्दकश्राव्य व्यवस्थापक	S-६ १९९००-६३२००	१	०	१	मृत संवर्ग
६३	क्रिडांगन सहाय्यक	S-६ १९९००-६३२००	१	०	१	मृत संवर्ग
६४	मशिन निर्देशक	S-१४ ३८६००-१२२८००	२	०	२	मृत संवर्ग
६५	सहाय्यक मशिन निर्देशक	S-६ १९९००-६३२००	२	०	२	मृत संवर्ग
६६	प्रयोगशाळा परिचर	S-७ २१७००-६९१००	४	०	१	३ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)
	एकूण गट क		**१६६५६**	**२१८**	**३१५**	१६५५९
१	नाईक	S-३ १६६००-५२४००	१०४	०	१४	९०
२	दप्तरी	S-३ १६६००-५२४००	०	०	०	मृत संवर्ग
३	शिपाई	S-१ १५०००-४७६००	४९२	०	१२५	३६७ + ९ अधिसंख्य पदे
४	मोटार स्वच्छक	S-१ १५०००-४७६००	२१९	०	८२	१३७ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)
५	वर्ग परिचर	S-१ १५०००-४७६००	३	०	२	१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधा तील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
६	केबिन अटेडंट	S-३ १६६००-५२४००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
७	चेनमन	S-१ १५०००-४७६००	११	०	२	**९**
८	चारा कापणारा	S-३ १६६००-५२४००	२१	०	६	**१५**
९	टपालवाहक	S-१ १५०००-४७६००	१३	०	१	**१२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
१०	अंधारखोली सहाय्यक	S-३ १६६००-५२४००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
११	धोबी	S-१ १५०००-४७६००	२	०	०	**२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
१२	गँगमन	S-१ १५०००-४७६००	२	०	०	**२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
१३	द्वारपाल	S-१ १५०००-४७६००	२	०	१	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
१४	मदतनीस	S-१ १५०००-४७६००	८	०	३	**५ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
१५	कि मन	S-१ १५०००-४७६००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
१६	बोदारक्षक	S-१ १५०००-४७६००	५	०	५	**मृत संवर्ग**
१७	खलासी	S-१ १५०००-४७६००	१७	०	८	**९**
१८	सहायक स्वयंपाकी	S-१ १५०००-४७६००	३९	०	१०	**२९**

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधातील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
१९	चौकीदार-नि खानसामा	S-३ १६६००-५२४००	६	०	३	**३ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
२०	नौका तांडेल	S-६ १९९००-६३२००	१	०	०	**१**
२१	ओंडके उचलणारा	S-३ १६६००-५२४००	२	०	२	**मृत संवर्ग**
२२	माळी	S-१ १५०००-४७६००	१७६	०	६२	**११४ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
२३	मिनीट्रेन स्वच्छक	S-१ १५०००-४७६००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
२४	मास्ट लश्कर	S-१ १५०००-४७६००	२	०	१	**१**
२५	संदेशवाहक	S-३ १६६००-५२४००	२	०	१	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
२६	संग्रहालय सहायक	S-७ २१७००-६९१००	१	०	१	**मृत संवर्ग**
२७	नाकेदार	S-३ १६६००-५२४००	२	०	०	**२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
२८	पॅन क्लीनर	S-१ १५०००-४७६००	२	०	१	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
२९	सफाईगार	S-१ १५०००-४७६००	३३	०	३	**३० अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
३०	वायरलेस मदतनीस	S-३ १६६००-५२४००	२	०	०	**२ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
३१	तांडेल	S-१ १५०००-४७६००	१	०	०	**१**

अ. क्र.	पदनाम	7th Pay Scale वेतन स्तर	प्रचलित आकृतीबंधा तील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधा अंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्या अंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	२	३	४	५	६	७
३२	वॉर्ड बॉय	S-१ १५०००-४७६००	८	०	४	**४ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
३३	पाणीवाला	S-१ १५०००-४७६००	११	०	२	**९ अधिसंख्य पदे (मृत संवर्ग)**
३४	पहारेकरी	S-१ १५०००-४७६००	३२४	०	१३६	**१८८**
३५	प्लंबर	S-१ १५०००-४७६००	१	०	१	**मृत संवर्ग**
३६	देखभाल सेवक	S-३ १६६००-५२४००	१०	०	६	**४**
३७	बॉक्स बॉय	S-१ १५०००-४७६००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
३८	आरेकस	S -१ १५०००-४७६००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
३९	ग्राऊंडमॅन	S -१ १५०००-४७६००	१	०	०	**१ अधिसंख्य पद (मृत संवर्ग)**
	एकूण गट ड		**१५२९**	**०**	**४८२**	**१०५६**
	एकूण		**२००९७**	**२२०**	**८६४**	**१९४६३**
	अधिसंख्य वनमजूर	S -१ १५०००-४७६००	८३२९	०	०	८३२९
	एकूण		**२८४२६**	**२२०**	**८६४**	**२७७९२**

गोषवारा

	पदनाम	प्रचलित आकृतीबंधातील मंजूर पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधाअंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे**	आढाव्याअंती निरसित झालेली पदे	**उच्चस्तरिय सचिव समितीने मंजूर केलेला सुधारीत आकृतीबंध**
१	गट-अ (संवर्ग-२०)	६४७	१	४५	६०४
२	गट-ब (संवर्ग-१०)	१११८	१	११	११०८
३	गट-ब (संवर्ग ३) अराजपत्रित	१४७	०	११	१३६
४	गट-क (संवर्ग-५५)	१६६५६	२१८	३१५	१६५५९
५	गट-ड (संवर्ग-३४)	१५२९	०	४८२	१०५६
	एकूण (संवर्ग-१२२)	**२००९७**	**२२०**	**८६४**	**१९४६३**
६	वनमजूरांची अधिसंख्य पदे	८३२९	०	०	८३२९
	एकूण मंजूर पदे	**२८४२६**	**२२०**	**८६४**	**२७७९२**

विवरणपत्र-ब

निरसित पदे:-

खालील विवरणपत्रात नमूद विविध संवर्गातील ५८५ रिक्त पदे, वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक - पदनि-०६१७/ प्र.क्र.२०/ आपुक, दिनांक २९/०६/२०१७ मधील सूचनेनुसार निरसित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	संवर्ग	मंजूर पदे	निरसित पदे
(१)	(२)	(३)	(४)
	गट-अ		
१	विभागीय वन अधिकारी	१२२	१३
२	मुख्य वनसांख्यिक	२	१
३	सहायक वनसंरक्षक	३१६	२७
४	वनसांख्यिक	९	३
	गट-ब		
५	वनपरिक्षेत्र अधिकारी	९९२	१
६	कार्मशाळा अधिक्षक	२	२
७	उप वन अभियंता (यांत्रिकी)	१	१
८	सहायक वन सांख्यिकी	१७	३
	गट-ब (अराजपत्रित)		
९	लघुलेखक (उच्चश्रेणी)	३९	४
१०	लघुलेखक (निम्नश्रेणी)	५२	७
	गट-क		
११	सर्वेक्षक	२२१	१७
१२	वरिष्ठ सांख्यिकी सहायक	२३	३
१३	कनिष्ठ सांख्यिकी सहायक	२९	९
१४	पोलिस	१८	३
१५	ट्रक चालक	६६३	१६३
१६	प्रमुख पोलिस शिपाई	३	१
१७	लॉच चालक	७	३
१८	माहुत	१९	४
१९	पोलीस बिनतारी संदेश दुय्यम निरिक्षक (पतिनियुक्तीचे पद)	४	१
२०	बिनतारी संदेश चालक	११	९
२१	ग्रंथालय परिचर	३	१
२२	पशु परिचर	४	१
	गट-ड		
२३	नाईक	१०४	१४
२२	शिपाई	४९२	१२५

२३	चेनमन	११	२
अ.क्र.	संवर्ग	मंजूर पदे	निरसित पदे
(१)	(२)	(३)	(४)
२४	चाराकापणारा	२१	६
२५	खलाशी	१७	८
२६	सहाय्यक स्वयंपाकी	३९	१०
२७	मास्ट लश्कर	२	१
२८	पहारेकरी	३२४	१३६
२९	देखभाल सेवक	१०	६
	एकूण	**३५७७**	**५८५**

विवरणपत्र-क

मृत संवर्ग घोषित करणे :

खाली नमूद एकुण ६६ संवर्ग, मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात आले असून, त्यामुळे त्याअंतर्गत कार्यरत पदे संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंत कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे सदर ४२० पदे अधिसंख्य दर्शविण्यात आली आहेत. सदर पदावरील व्यक्ती सेवानिवृत्ती/राजीनामा/मृत्यू इ. कारणामुळे रिक्त झाल्यानंतर ती पदे निरसित होतील व सदर संवर्ग समाप्त (मृतसंवर्ग) होईल. तसेच सदर संवर्गातील रिक्त असलेली २७९ पदे तात्काळ प्रभावाने निरसित होतील.

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे	अधिसंख्य पदे (कार्यरत पदे)	तात्काळ प्रभावाने निरसित होणारी रिक्त पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)
	गट-अ			
१	वैद्यकिय अधिकारी	१	१	०
२	उप संचालक (भूमि अभिलेख)	१	०	१
	गट-ब			
३	सहायक वैद्यकीय अधिकारी	७	३	४
	गट-क			
४	लघु टंकलेखक	४६	६	४०
५	आरेखक	४	२	२
६	अनुरेखक	१२	१०	२
७	सहायक क्युरेटर	१	०	१
८	चित्रकार	४	१	३
९	सहायक आरेखक	२	०	२
१०	स्वयंचल विजतंत्री	२	२	०
११	सहायक यांत्रिकी	८	३	५
१२	सहायक संधाता	१	१	०
१३	मिश्रक	७	३	४
१४	काळजीवाहक	४	१	३
१५	आवेधक	१	०	१
१६	यांत्रिकी	२४	१५	९
१७	जोडारी/ वरिष्ठ जोडारी	५	५	०
१८	लेथमन (कर्मशाळा)	४	२	२
१९	निक्षणक	१	१	०
२०	एअर कॉम्प्रेसर चालक	१	०	१
२१	वीजतंत्री	९	५	४
२२	प्रसविका	४	२	२
२३	लहान आगगाडी चालक	१	०	१
२४	मिनीट्रेन गार्ड	१	०	१

अ.क्र.	पदाचे नांव	मंजूर पदे	भरलेली पदे	कमी होणारी रिक्त पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२५	नभोवाणी यांत्रिकी	२	०	२
२६	करवत्या	७	६	१
२७	भांडारपाल	९	६	३
२८	सांधाता	४	३	१
२९	तारतंत्री	२	२	०
३०	प्रक्षेपित चालक	३	१	२
३१	लोहार	१	१	०
३२	डिघी चालक	२	०	२
३३	बिनतारी संदेशक	१	१	०
३४	दृकश्राव्य व्यवस्थापक	१	०	१
३५	क्रिंडागण सहायक	१	०	१
३६	मशिन निर्देशक	२	०	२
३७	सहायक मशिन निर्देशक	२	०	२
३८	प्रयोगशाळा परिचर	४	३	१
	गट-ड			
३९	दप्तरी	०	०	०
४०	मोटार स्वच्छक	२१९	१३७	८२
४१	वर्ग परिचर	३	१	२
४२	कॅबिन अटेंन्डन्ट	१	१	०
४३	टपाल वाहक	१३	१२	१
४४	अंधारखोली सहायक	१	१	०
४५	धोबी	२	२	०
४६	गँगमन	२	२	०
४७	द्वारपाल	२	१	१
४८	मदतनीस	८	५	३
४९	कि मन	१	१	०
५०	बोदारक्षक	५	०	५
५१	चौकीदार-नि खानसामा	६	३	३
५२	ओंडके उचलणारा	२	०	२
५३	माळी	१७६	११४	६२
५४	मिनीट्रेन स्वच्छक	१	१	०
५५	संदेशवाहक	२	१	१
५६	संग्रहालय सहायक	१	०	१
५७	नाकेदार	२	२	०
५८	पॅन क्लिनर	२	१	१
५९	सफाईगार	३३	३०	३

अ.क्र.	पदाचे नांव	मंजूर पदे	भरलेली पदे	कमी होणारी रिक्त पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)
६०	वायरलेस मदतनीस	२	२	०
६१	वार्ड बॉय	८	४	४
६२	पाणीवाला	११	९	२
६३	प्लंबर	१	०	१
६४	बॉक्स बॉय	१	१	०
६५	आरेकस	१	१	०
६६	ग्राऊंडमॅन	१	१	०
	एकुण ६६ संवर्ग	**६९९**	**४२०**	**२७९**

विवरणपत्र-ड

नविन पदनिर्मिती :-

खालील विवरणपत्रामध्ये नमूद विविध संवर्गातील नवीन पदे निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली आहे.

अ.क्र.	संवर्ग	७th Pay Scale वेतन स्तर	मंजूर पदे	उच्चस्तरीय सचिव समितीने सुधारीत आकृतीबंधाअंतर्गत मंजूर केलेली नवीन पदे	सुधारीत आकृतीबंधाअंतर्गत मंजूर एकूण पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
	गट-अ				
१	सहायक संचालक	S-२३ ६७७००-२०८७००	०	१	१
	गट-ब				
२	सहायक रासायनिक विश्लेषक	S-१५ ४१८००-१३२३००	०	१	१
	गट-क				
३	मंडल निरीक्षक (प्रतिनियुक्तीचे पद)	S-८ २५५००-८११००	५	१	६
४	वनरक्षक	S-५ १८०००-५९६००	९४६१	२१६	९६७७
५	अव्वल कारकून (प्रतिनियुक्तीचे पद)	S-१० २९२००-९२३००	५	१	६
	एकूण		**९४७१**	**२२०**	**९६९१**

ANNEXURE 6.01

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साप्ताह/२७

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जुलै १६, १९९८/आषाढ २५, शके १९२०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ब यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ मार्च १९९८

83

भारताचे संविधान.

क्रमांक एमएफएस. १०८७/७५/प्र.क्र. २३/फ-८.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र वनसेवा, गट-अ मधील सहायक वनसंरक्षक (कनिष्ठ श्रेणी) या पदावरील सेवाप्रवेशाचे नियमन करण्यासाठी याद्वारे खालील नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र वनसेवा, गट-अ मधील सहायक वनसंरक्षक (कनिष्ठ श्रेणी) (सेवाप्रवेश) नियम, १९९८ म्हणता येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत,—

(अ) "सहायक वनसंरक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम" म्हणजे राज्य शासनाने सहायक वनसंरक्षकांची निवड केल्यावर भारत सरकारच्या मान्यताप्राप्त व त्यांनी विहित केलेल्या नियमानुसार वनशास्त्र व संलग्न विषयांमधील प्रशिक्षण देण्यासाठी, राज्य वनसेवा प्रशिक्षण महाविद्यालयाद्वारे चालविण्यात येणारा त्यांच्यासाठी प्रशिक्षण पाठ्यक्रम.

(ब) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(क) "विभाग" म्हणजे महाराष्ट्र शासनाचा महसूल व वन विभाग.

३. महाराष्ट्र वनसेवा, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) सहायक वनसंरक्षक या पदावरील नेमणूक एकतर :—

(अ) ज्यांनी वनक्षेत्रपाल हे पद धारण केले आहे आणि वनक्षेत्रपाल म्हणून तीन वर्षांहून कमी नाही अशी नियमित सेवा केलेली आहे, अशा व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे व पात्रतेच्या अधीन योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल, किंवा

(ब) सहायक वनसंरक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रमासाठी, याबाबतीत वेळोवेळी करण्यात आलेल्या नियमानुसार आयोगाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, ज्यांची निवड झाली आहे आणि ज्यांनी हा प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला आहे, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करता येईल.

४. स्पर्धा परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होण्यासाठी उमेदवार :—

(अ) अठरा वर्षांपेक्षा कमी आणि तीस वर्षांहून जास्त वयाचा नसावा,

(ब) वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिक शास्त्र, सांख्यकी, प्राणीशास्त्र, उद्यानविद्या, या विषयांपैकी कमीत कमी एका विषयाचा सांविधिक विद्यापीठाचा पदवीधारक असावा किंवा कृषि, अभियांत्रिकी यात स्नातक पदवीधारक असावा,

(क) कमीत कमी पुढीलप्रमाणे शारीरिक मानके असलेला असावा :—

उमेदवाराचा प्रवर्ग	उंची	छातीचा घेर (न फुगवता)	कमीत कमी फुगवून
पुरुष उमेदवार ..	.. १६३ सें. मी.	७९ सें. मी.	५ सें. मी.
स्त्री उमेदवार ..	.. १५० सें. मी.	७४ सें. मी.	५ सें. मी.
(अनुसूचित जमातींमधील उमेदवारांच्या बाबतीत खालीलप्रमाणे शिथिल)			
पुरुष उमेदवार ..	.. १५२.५ सें. मी.	७९ सें. मी.	५ सें. मी.
स्त्री उमेदवार ..	.. १४५ सें. मी.	७४ सें. मी.	५ सें. मी.

(ड) सुधारणेनंतर (आफ्टर करेक्शन) ४ + OD सह प्रत्येक डोळ्याची दृष्टीतीक्ष्णता (व्हिज्युअल ऑक्विटी) ६/६ असावी. बाह्य डोळ्यावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा,

(इ) पुरुष व महिला उमेदवारांनी अनुक्रमे २५ कि. मी. व १४ कि. मी. अंतर ४ तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक असेल,

परंतु असे की, आयोगाने स्पर्धा परीक्षेच्या आधारे उमेदवाराची निवड केल्यानंतर निवडलेल्या उमेदवारास विभागाने घेतल्यानुसार अनुक्रमे नियम ४ (क), ४ (इ) व ४ (ड) प्रमाणे शारीरिक व वैद्यकीय चाचण्या द्याव्या लागतील.

५. या पदावरील पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणूका ५०:५० या गुणोत्तरात करण्यात येईल.

६. नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात आलेल्या व्यक्तींचा प्रशिक्षणाधीन कालावधी तीन वर्षांचा असेल, ज्यामध्ये सहायक वनसंरक्षकांच्या प्रशिक्षण पाठ्यक्रमाचा २ वर्षांचा कालावधी व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी निश्चित केल्याप्रमाणे १ वर्ष क्षेत्रीय प्रशिक्षणाचा समावेश असेल.

७. नामनिर्देशनाने नेमणूक केलेल्या सहायक वनसंरक्षकांची परस्पर ज्येष्ठता आयोगाने घेतलेल्या परीक्षेत उमेदवाराने मिळविलेले गुण व सहायक वनसंरक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रमांच्या शेवटी घेण्यात येणाऱ्या अंतिम परीक्षेत उमेदवाराने मिळविलेले गुण एकत्रित करून निर्धारित केली जाईल.

८. या पदावरील पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने नेमणूका केलेल्या व्यक्तीने, आधीच परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल किंवा ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळालेली नसेल तर, तिला नियमानुसार विभागीय परीक्षा आणि हिन्दी व मराठीची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

९. या पदावरील नेमणूक करण्यात आलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गोविंद स्वरूप,
सचिव (वने).

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ, गुरुवार ते बुधवार,
सप्टेंबर १०-१६, २००९/भाद्र १९-२५, शके १९३१

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ ऑगस्ट २००९

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक एमएफएस. १००७/११९६/प्र.क्र. १९०/फ-८.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ मधील परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागांतर्गत महाराष्ट्र वन सेवेतील सहायक वन संरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) (सेवा प्रवेश) नियम, १९९८ यात पुढीलप्रमाणे सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र वन सेवेतील सहायक वन संरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) (सेवा प्रवेश) (दुसरी सुधारणा) नियम, २००९ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र वन सेवेतील सहायक वन संरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) (सेवा प्रवेश) नियम, १९९८ मधील नियम ४ (ब) मध्ये " उद्यान विद्या " यानंतर " पशुसंवर्धन आणि पशुवैद्यक शास्त्र " हे शब्द समाविष्ट करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जे. पी. डांगे,
शासनाचे अपर मुख्य सचिव (वने).

Revenue And Forests Department
Mantralaya, Mumbai 400 032, dated 12th March 1998

CONSTITUTION OF INDIA.

No.MFS.1087/75/CR-23/F-8 :— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Assistant Conservator of Forests, in the Maharashtra Forest Service, Group-A (Junior Scale), under the Revenue and Forest Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Assistant Conservator of Forests, in the Maharashtra Forest Service, Group-A (Junior Scale) (Recruitment) Rules, 1998.

2. In these rules, unless the context requires otherwise, —

   a) "Assistant Conservator of Forests Training Course" means a training course conducted by the State Forest Service College recognised by the Government of India for imparting training in Forestry and allied subject, for the Assistant Conservator of Forests after their selection by the State Government, in accordance with the rules prescribed by the Government of India in that behalf;
   b) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;
   c) "Department" means Revenue and Forests Department of Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Assistant Conservator of Forests in the Maharashtra Forest Service, Group-A (Junior Scale) shall be made either :—

   a) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Range Forest Officer in the Maharashtra Forest Service, Group-B having not less than three years regular service in that post; or

   b) by nominating from amongst candidates who are selected for the Assistant Conservator of Forests training course, on the basis of result of the competitive examination held by the Commission in accordance with the rules made in this behalf from time to time and have successfully completed the training course.

4. In order to be eligible for admission to the competitive examination a candidate shall —

   a) not be less than eighteen years and not more than thirty years of age.
   b) Possess a degree of a statutory university with at least one of the subject of Botany, Chemistry, Forestry, Geology, Mathematics, Physics, Statistics, Zoology, Horticulture, or a Bachelors degree in Agriculture Engineering;
   c) Possess the minimum physical standard as follow :—

Category of Candidate		Height	Chest girth (deflated)	With minimum expansion by
Male Candidate	..	163 c.m.	79 c.m.	5 c.m.
Female Candidate	..	150 c.m.	74 c.m.	5 c.m.
Relaxable in the case of candidate belonging to Scheduled Tribes as below :–				
Male Candidate	..	152.5 c.m.	79 c.m.	5 c.m.
Female Candidate	..	145 c.m.	74 c.m.	5 c.m.

d) have visual acuity 6/6 each eye with 4+OD after correction. There should be no infective condition of external eye or squint;

e) have ability for walking a distance of 25 kilo meters and 14 kilo meters to be completed in four hours by male and female candidates respectively.

Provided that after the Selection of candidates by the Commission, on the basis of Competitive Examination, a selected candidate shall be required to undergo the Physical and Medical test to be held by the Department on the terms of Rule 4(c), 4(e), and 4 (d) respectively.

5. Appointment to the post by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50.

6. A person appointed to the post by nomination shall be on probation for a period of three years including two years Assistant Conservator of Forests training course and 1 year field training as decided by the Principal Chief Conservator of Forests, Maharashtra State, Nagpur.

7. The inter-se-seniority of the Assistant Conservator of Forests, appointed by nomination shall be determined by adding the marks obtained by the candidate in the examination held by the Commission and marks obtained by the candidate in the final examination of the Assistant Conservator of Forests Training Course.

8. A person appointed to the post whether by promotion or by nomination, shall be required to pass the Departmental Examination and examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations.

9. A person appointed to the post shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Govind Swarup,
Secretary (Forests)

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ, गुरुवार ते बुधवार,
सप्टेंबर १०-१६, २००९/भाद्र १९-२५, शके १९३१

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 17th August 2009

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA.

No. MFS.1007/1196/C.R.190/F-8.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Assistant Conservator of Forests, in the Maharashtra Forest Service, Group-A (Junior Scale) (Recruitment) Rules, 1998, as follows, namely :—

1. These rules may be called the Assistant Conservator of Forests in Maharashtra Forests Service, Group-A (Junior Scale) (Recruitment) (Second Amendment) Rules, 2009.

2. In rule 4 of the Assistant Conservator of Forests, in the Maharashtra Forests Service, Group-A (Junior Scale) (Recruitment) Rules, 1998, in clause (*b*), after the word " Horticulture " the words " Animal Husbandry and Veterinary Science " shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. P. DANGE,
Additional Chief Secretary (Forests)
to Government.

ANNEXURE 6.02

NOTIFICATION

Revenue and Forests Department,
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated 2nd July, 2008

Constitution of India

NO.MFS-12-2000/C.R.80/F-8 :- In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, the Governer of Maharashtra is hereby pleased to amend the Assistant Conservator of Forests in the Maharashtra Forests Service, Group-A (Junior Scale) (Recruitment) Rules, 1998, under the Revenue and Forests Department of the Government of Maharashtra, as follows :-

1. These rules may be called the Assistant Conservator of Forests in Maharashtra Forests Service, Group A (Junior Scale) (Recruitment) (Amendment) Rules, 2008.

2. In rule 5 of the Assistant Conservator of Forests , Group-A (Junior Scale) (Recruitment) Rules, 1998 after the words in the ratio of "50 : 50" shall be substituted.by" 75 : 25 " By order and in the name of the Governer of Maharashtra.

(J.P.DANGE)
Additional Chief Secretary (Forests)
Government of Maharashtra

NO.MFS-12-2000/C.R.80/F-8
Revenue and Forests Department,
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated 2nd July, 2008

Copy forwarded with compliments for information to :-
1. The Secretary to Governer of Maharashtra

2. The Principal Secretary, Chief Ministers Secretariat,
3. The Private Secretary to Minister (Forests)
4. The Private Secretary to State Minister (Forests)
5. The Additional Chief Secretaray, General Administration Department
6. The Principal Secretary, Rural Development and Water Conservation Department
7. The Secretary, Maharashtra Public Service Commission
* 8. The Principal Chief Conservator of Forests, Maharashtra State, Nagpur
9. The Additonal Chief Conservator of Forests (Human Resource Development and Administration), Maharashtra State, Nagpur
10. The Managing Director, Maharashtra Forests Development Corporation Ltd., Nagpur
11. The Director, Social Forestry, Maharashtra State, Pune
12. All Chief Conservator and Conservator of Forests
13. All Regional Manager, Forests Deveopment Corporation of Maharashtra
14. All Joint Director, Social Forestry
15. All Deputy Conservator of Forests,
16.. All Sub Divisional Forests Officers of all independent Sub Divisions of Forests
17. All Desks in Forest Wing of Revenue and Forests Department
18. Select File, F-8 Desk
19. The Manager, Government Central Printing Press, Netaji Subhas Marg, Charni Road, Mumbai - 400 004.

2. He is requested to publish this notification in the official Gazette of Maharashtra State Part-4-A and send 1000 copies of the same to this Department.

(M.D.Kedar)
Deputy Secretary
Reven...

* By letter

Scanned by CamScanner

ANNEXURE 6.03

भाग चार-अ] महाराष्ट्र शासन राजपत्र, डिसेंबर ६, १९८४/अग्र. १५, शके १९०६ १४३८-३९

GR File

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated 22nd November 1984

CONSTITUTION OF INDIA.

No. MFS. 1876/142931(a)/CR-454-80/F-8.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, and in force in the State or any part thereof, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the follwing rules regulating recruitment to the post of Divisional Forest Officer, in the Maharashtra Forest Service, Class I, in the Forest Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Divisional Forest Officer (in Maharashtra Forest Service, Class I) (Recruitment) Rules, 1984.

2. Appointment to the post of Divisional Forest Officer in the Maharashtra Forest Service, Class I, shall be made by promotion from amongst the officers in the Maharashtra Forest Service, Class II, in the Forest Department of the Government of Maharashtra, who have put in not less than three years of service in the Maharashtra Forest Service, Class II posts :

Provided that, in the case of persons directly appointed as Assistant Conservator of Forests, the period spent on training at the Government Forest Colleges and the period of probation, including the extended period of probation, if any, shall not be counted towards the requisite period of service.

3. A person appointed to the post of Divisional Forest Officer shall be required to pass the examinations in Hindi and Marathi, according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing these examinations.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. NAKHATE.
Under Secretary to Government.

ANNEXURE 6.04

RNI No. MAHBIL /2009/31733

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ५(२)] शुक्रवार, फेब्रुवारी ६, २०१५/माघ १७, शके १९३६ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय

मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ फेब्रुवारी २०१५.

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक एफएसटी. ०३/१४/प्र.क्र. २२१/फ-४.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ मधील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील वनक्षेत्रपाल गट-ब (राजपत्रित) या पदाच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना वनक्षेत्रपाल गट-ब (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०१४ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " आयोग " याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(ब) " पदवी " याचा अर्थ मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी,

(क) " विभाग " याचा अर्थ शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अधिपत्याखालील वन विभाग,

(ड) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन,

(इ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा अधिनियम महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो,

(फ) " उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा अधि. महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

३. महाराष्ट्र वन सेवा मधील "वनक्षेत्रपाल", गट-ब या पदावरील नियुक्ती—

(अ) वनपाल हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान ३ वर्षे इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रतेच्या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

किंवा

(ब) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेसंदर्भात आयोगाशी वेळोवेळी याबाबतीत विचार विनिमय करून शासनाने काढलेल्या आदेशानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या " मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेच्या " निकालाच्या आधारावर तयार केलेल्या सामायिक गुणवत्ता यादीच्या आधारे, वनपाल पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींच्या निवडीने ;

किंवा

(क) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेद्वारे नामनिर्देशनाने,

४. मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे निवड होण्यासाठी परीक्षेला बसण्यास उमेदवारांनी पुढील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील—

(१) (अ) वन विभागात "वनपाल" म्हणून किमान ५ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेली असावी ;

(ब) उमेदवार २१ वर्षांपेक्षा कमी व ४२ वर्षांहून जास्त वयाचा नसावा ;

(क) (i) उमेदवाराने, खालीलपैकी कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण केलेली असावी :— वनस्पती शास्त्र, रसायन शास्त्र, वन शास्त्र, भू शास्त्र, गणित शास्त्र, भौतिक शास्त्र, सांख्यीकी शास्त्र, प्राणी शास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषी शास्त्र, अभियांत्रिकीमधील (कृषी/रसायन/स्थापत्य/संगणक/विद्युत/इलेक्ट्रॉनिक्स/यंत्रयांत्रिकी), संगणक ॲप्लिकेशन/संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशु वैद्यकीय विज्ञान यापैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी.

किंवा

(ii) विज्ञान शाखेव्यतिरिक्त अन्य शाखेतील गणित विषयासह पदवी धारक :

परंतु आणखी असे की, मर्यादित विभागीय स्पर्धात्मक परीक्षेद्वारे निवडीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध न झाल्या, सदर कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात येतील.

(२) मर्यादित विभागीय परीक्षेस बसण्याकरिता उमेदवारांना कमाल ३ संधी उपलब्ध राहतील. परंतु, मागासवर्गीय उमेदवारांना ५ संधी उपलब्ध राहतील ;

(३) उमेदवाराचे मागील पाच वर्षांपैकी तीन वर्षांच्या गोपनीय अहवालातील शेरे "उत्कृष्ट" तसेच उर्वरित दोन वर्षांचे "चांगला" या दर्जाचे असणे आवश्यक आहे ;

(४) मागासवर्गीय उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असणे आवश्यक राहील.

५. नामनिर्देशनाद्वारे निवडीसाठी आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या मर्यादित स्पर्धा परीक्षेस बसण्यास पात्र होण्यासाठी उमेदवारांनी खालील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील :—

(अ) २१ वर्षांपेक्षा कमी आणि ३३ वर्षांहून जास्त वयाचा नसावा ;

DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8fc05801329d4ebce812d1340cea24fcd0132235fb0c5444a8, cn=Mukesh Khullar
Date: 2017.09.21 14:59:35 +05'30'

(मुकेश खुल्लर)
अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधान भवन, मुंबई,
५. सर्व सन्माननीय संसद सदस्य,
६. विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य.
७. मा. मुख्य सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९. सर्व मंत्रालयीन विभाग,

पृष्ठ २८ पैकी ४

१०.प्रबंधक मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.प्रबंधक अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१२.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१४.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१५.सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, (विधान परिषद), मुंबई,
१६.सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
१७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१८.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, मुंबई,
१९. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२०. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, मुंबई,
२१.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२३.मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
२४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई, (२ प्रती प्रसिध्दीकरिता)
२५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
२६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२७.निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२८.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२९.सामान्य प्रशासन विभाग/का.३९,(महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता)
३०. निवडनस्ती. (कार्यासन-८).

परिशिष्ट- 'अ'

(शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.)

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. २६.१०.१९९४ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शासन परिपत्रकान्वये विहीत केलेली अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबतची एकत्रित नियमावली)

१. महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व कार्यालयात अनुकंपा कारणास्तव करावयाच्या नेमणूकांना हे नियम लागू राहतील.

२. अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील तरतुदी ह्या केवळ शासकीय कर्मचा-यांपूरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी ह्या जिल्हा परिषदा/ नगरपालिका / महानगरपालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील.

३. अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतच्या तरतूदी खालीलप्रमाणे आहेत:-

(१) अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ खालील शासकीय कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांना अनुज्ञेय राहील:-

(अ) शासकीय कर्मचाऱ्यांना (रुपांतरीत स्थायी व अस्थायी आस्थापनेवरील शासकीय कर्मचारी धरून) (शासन, निर्णय, दि. २६.१०.१९९४)

(आ) सेवा नियमित केलेल्या परंतु अधिसंख्य पदावर कार्यरत असलेले कर्मचारी. (शासन निर्णय, दि. १०.७.२००९)

(२) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पात्र नातेवाईकांना खालील नमूद परिस्थितीत अनुकंपा तत्वावर नियुक्ती लागू राहील:-

(अ) शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांनाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील. (शासन निर्णय, दि. २२.०८.२००५)

(आ) गट अ/ब/क/ड मधील शासकीय अधिकारी अथवा कर्मचा-यास नक्षलवादी/ आतंकवादी/ दरोडेखोर/समाज विघातक यांच्या हल्यात/कारवाईत मृत्यू आल्यास अथवा शासन सेवेत कार्यरत असतांना स्वत:चा जीव धोक्यात घालून प्रत्यक्ष कर्तव्य बजावत असताना मृत्युमुखी पडल्यास अशा अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या कुटुंबियातील पात्र व्यक्तीस, अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना, त्यांचे नाव अनुकंपाधारकांच्या सामान्य प्रतीक्षासूचीमध्ये न घेता, त्यांची वेगळी यादी करुन पद उपलब्ध असल्यास, रिक्त पदांच्या ५ टक्के मर्यादेची (१० टक्के- शासन निर्णय दि. १ मार्च, २०१४) अट शिथील करुन त्यांना सर्व प्राथम्याने अनुकंपा नियुक्ती देण्यात यावी. (शासन शुध्दीपत्रक दि. १७.०९.२०१२)

(इ) गट अ/ब/क/ड मधील जे शासकीय अधिकारी अथवा कर्मचारी नक्षलवादी/ आतंकवादी/ दरोडेखोर/समाजविघातक यांच्या हल्यात/कारवाईमध्ये कायमस्वरुपी जायबंदी झाले आहेत व त्यांनी स्वत:हून शासकीय सेवा सोडून देण्याची लेखी अनुमती दिली आहे अशा अधिकारी/कर्मचा-

पृष्ठ २८ पैकी ६

यांच्या पात्र कुटुंवियातील एका व्यक्तीस अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या ५ टक्के (१० टक्के-शासन निर्णय दि. १ मार्च, २०१४) मर्यादेमध्ये प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. (शासन निर्णय, दिनांक १७.७.२००७)

(३) खालील दर्जाच्या पदावर अनुकंपा नियुक्ती देय राहील :-

(अ) राज्य शासनांतर्गत कोणत्याही गट-क आणि गट-ड मधील सरळ सेवेच्या पदांवर त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहीत शैक्षणीक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता यईल. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ व दि. २८.०३.२००१)

(आ) ह्या नियमानुसार नियुक्ती मिळण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेस बसण्याची आवश्यकता नाही तसेच सदर पदावर अनुकंपा नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सल्ला घेण्याची आवश्यकता असणार नाही. मात्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पोलीस उपनिरीक्षक, विक्रीकर निरीक्षक, मोटार वाहन उप निरीक्षक, रेंज वन अधिकारी, कनिष्ठ अभियंता, सहायक वैद्यकीय अधिकारी, इ. गट-'क' मधील कार्यकारी (एक्झिक्युटीव) पदावर तसेच मंत्रालयातील सहायक पदावर नियुक्ती देता येणार नाही. तसेच निवडमंडळाचा सल्ला घेणे आवश्यक नाही. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ व दि. २१.११.१९९७)

(इ) लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदाखेरीज अन्य गट-'क' मधील कार्यकारी पदांवर नियुक्ती देण्यात यावी मात्र अशी नियुक्ती ही त्या पदांसाठी सेवा प्रवेश नियमानुसार सरळ सेवा भरतीची तरतुद आहे अशाच पदांवर देण्यात यावी. (उदाहरणादाखल काही कार्यकारी पदांची यादी-परिशिष्ट क) (शासन निर्णय, दि. २०.१२.१९९६)

(४) अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबिय:-

(अ) अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी खालील नमूद केलेले नातेबाईक पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.

(१) पती/पत्नी,

(२) मुलगा/मुलगी (अविवाहीत/विवाहीत), मृत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी (अविवाहीत/विवाहीत)

(३) दिवंगत शासकीय कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून

(४) घटस्फोटित मुलगी किंवा वहीण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा वहीण,

(५) केवळ दिवंगत अविवाहीत शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा वहीण (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ व दि. १७.११.२०१६)

(आ) मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या पति/पत्नी ने कोणाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी/कर्मचा-यांचे पती/पत्नी हयात नसल्यास त्याच्या/तिच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे. (शासन निर्णय, दि. १७.०७.२००७)

(५) कुटुंबाची हलाखीची परिस्थिती

(अ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरिता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा यापुढे राहणार नाही. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

(आ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव शासन सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा, या योजनेच्या मागील भूमिका लक्षात घेऊन जो कर्मचारी मृत झाला आहे त्याच्या कुटुंबियांना तात्काळ उदभवणा-या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने विचारात घ्यावेत. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

(इ) दिवंगत शासकीय कर्मचा-याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल तथापि तो त्याच्या कुटुंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती प्राधिका-यांनी अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नांवाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.

यासंदर्भात नियुक्ती प्राधिका-याने मिळणा-या निवृत्तीवेतनाची रक्कम, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, त्याची मालमत्ता/दायित्व, गंभीर आजारामुळे अथवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती इत्यादी बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

(६) लहान कुटुंबांचे प्रमाणपत्र :-

दिनांक ३१ डिसेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबियास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. (शासन निर्णय, दि. २८/३/२००१)

(७) योजनेची माहिती देण्याची जबाबदारी :-

(अ) आस्थापना अधिका-याने अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती (योजनेचा उद्देश, पात्र नातेवाईक, अर्ज करण्याची मुदत, शैक्षणिक अर्हता, टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत, अर्ज विहीत नमून्यात भरणे इ. माहिती) शासकीय कर्मचा-याच्या मृत्यूनंतर १५ दिवसानंतर किंवा कुटुंबनिवृत्तीवेतनाची कागदपत्रे पाठविताना शासकीय कर्मचा-यांच्या कुटुंबियांना त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.तसेच सदर माहिती मिळाल्याबाबत कुटुंबाकडून पोच घेणे आवश्यक आहे. (शासन निर्णय, दि. २३.०८.१९९६ व शासन परिपत्रक दि.५.२.२०१०)

(ब) दिवंगत शासकीय कर्मचा-याचा पात्र वारसदार सज्ञान नसेल तर तो सज्ञान झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज करु शकेल मात्र तो सज्ञान झाल्यावर त्याने असा अर्ज करणे अपेक्षित आहे हे देखील कुटुंबनिवृत्तीवेतन धारकाला कुटुंब निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रांची पूर्तता करतेवेळी लेखी कळविणे संबंधित आस्थापना अधिका-यावर बंधनकारक राहील. (शासन निर्णय, दि. २०.०५.२०१५)

पृष्ठ २८ पैकी ८

(८) कुटुंबातील अन्य सदस्यांचा सांभाळ करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्रः-

(अ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूवी संबंधितांकडून कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. (शासन निर्णय, दि. २३.०८.१९९६)

आ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधिताकडून दिवंगत कर्मचा-यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. भविष्यामध्ये सदर प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन झाल्याबाबतची तक्रार संबंधित कुटुंबातील सदस्यांनी केल्यास सदर तक्रारीची चौकशी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/शिस्तभंगविषयक प्राधिका-याने करावी. चौकशीअंती अनुकंपा नियुक्तीधारकाने प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याला सेवेतून काढून टाकण्याची देखील शिक्षा देता येईल. (शासन निर्णय, दि. १७.११.२०१६)

(९) कुटुंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्रः-

अ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती ही कुटुंबातील एकाच पात्र नातेवाईकास अनुज्ञेय असल्याने (शासन, निर्णय, दि. २६.१०.१९९४) कुटुंबातील इतर सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

आ) ज्या शासकीय कर्मचा-यांना वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा जास्त लग्न करण्यास प्रतिबंध नसेल अशा कर्मचा-याच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास, ज्या पत्नीला किंवा तिच्या मुलाला/मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यायची आहे त्या व्यतिरिक्त अन्य पत्नीचे देखील ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. (शासन निर्णय, दि. २३.०८.१९९६)

(१०) अर्ज करण्यासाठी मुदतः-

(अ)अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र नातेवाईकाने शासकीय अधिकारी/कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून **एक वर्षाच्या** मुदतीत संबंधित नियुक्ती प्राधिका-याकडे विहीत नमून्यात परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. (शासन निर्णय, २२/८/२००५ व शासन परिपत्रक, दि. ०५.०२.२०१०)

(आ) सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. (शासन निर्णय, दि. ११/९/१९९६ व शासन परिपत्रक, दि. ०५.०२.२०१०)

(इ) पात्र वारसदारास विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्ष इतक्या कालावधिपर्यंत (मृत्यूच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंत) तसेच दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या अज्ञान वारसदाराच्या बाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षापर्यंत (सज्ञान झाल्यानंतर ३ वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत.

अनुकंपा नियुक्ती धोरणातील याशिवाय अन्य कोणत्याही अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना राहणार नाहीत. (शासन निर्णय, दि. २०.०५.२०१५)

(ई) जोपर्यंत अनुकंपा नियुक्तीकरीता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उमेदवारांकडून प्राप्त होत नाहीत तोपर्यंत त्यांचे नांव प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट करता येणार नाही. ज्यादिवशी संपूर्ण कागदपत्रे प्राप्त होतील त्यादिवशीच त्यांचे नाव प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करावे. (शासन परिपत्रक, दि. ५/२/२०१०)

(११) अनुकंपा नियुक्तीसाठी वयोमर्यादा:-

(अ) किमान वयोमर्यादा- १८ वर्ष (शासन निर्णय, दि. ११.०९.१९९६)

(आ) कमाल वयोमर्यादा- वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षांपर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतीक्षासूचीतून काढून टाकण्यात यावीत. (शासन निर्णय, २२.०८.२००५ व दि. ६.१२.२०१०)

(१२) अनुकंपा नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता:-

(अ) पात्र नातेवाईकाची शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादेनुसार त्याला गट-क किंवा गट-ड मधील पदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील. (शासन निर्णय,दि. २६/१०/१९९४)

(आ) संबंधीत पदांसाठी विहीत शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणूकांसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील. (शासन निर्णय,दि. २६/१०/१९९४)

(इ) तथापि, दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्या बाबतीत गट-ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याला असतील. (शासन निर्णय,दि. २६/१०/१९९४)

(१३) गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत:-

(अ) अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी शासन निर्णय, दि. ०६.१२.२०१० अन्वये ६ महिने असलेली मुदत वाढवून ती २ वर्ष इतकी करण्यात येत आहे.

अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती दिलेल्या व शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत नियुक्तीपासून २ वर्ष पूर्ण न झालेल्या उमेदवारांनाही सदर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी उमेदवारांच्या नियुक्तीपासून २ वर्ष इतकी मुदत देण्यात येत आहे.

६ महिन्याच्या कालावधित सदर प्रमाणपत्र सादर न केल्याने ज्या उमेदवारांच्या लिपीक-टंकलेखक पदावरील सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत त्यांनाही लिपीक-टंकलेखक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षात सदर प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा द्यावी. अशा उमेदवारांनी सदर प्रमाणपत्र सादर केल्यानंतर लिपीक-टंकलेखक पदावरील अनुपस्थित कालावधिचे कोणतेही वेतनविषयक लाभ न देता सेवा सातत्यासह लिपीक-टंकलेखक पदावर पुन:स्थापित करण्यात यावे. (शासन निर्णय, दि. २०.०५.२०१५)

(आ) कोणत्याही कारणास्तव दोन वर्षापेक्षा अधिक मुदतवाढ अनुज्ञेय असणार नाही. हा कालावधी संपताच नियुक्ती संपृष्टात आणावी. (शासन निर्णय,दि. २३/०८/१९९६)

(१४) अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर विहीत मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती:-

अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर टंकलेखनाची विहीत वेगमर्यादेची परीक्षा पास होऊ शकले नाहीत म्हणून त्यांच्या सेवा संपृष्टात आणल्या आहेत, अशा उमेदवारांचा गट-ड मधील नियुक्तीसाठी पदांची उपलब्धता विचारात घेऊन नव्याने नियुक्ती देण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र अशा रीतीने गट-ड मधील पदावर नियुक्ती स्विकारल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत गट-क मधील पदासाठी त्याचा विचार करता येणार नाही, ही बाब त्यांना नियुक्तीपूर्वी स्पष्ट करावी.

(शासन निर्णय, दि. ०८.०९.१९९७)

(१५) गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे :-

माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून शासन सेवेतील गट-क मधील (वाहन चालक वगळून) संबंधित पदाकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/व वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ च्या नियम ३ अन्वये आवश्यक अर्हता म्हणून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी उमेदवारांनी खालील 'अ' किंवा 'ब' प्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C.' किंवा 'O' स्तर किंवा 'A' किंवा 'B' किंवा 'C' स्तर पैकी कोणतेही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा,

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

संगणक ज्ञानाची वरील किमान अर्हता अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या वेळी धारण करीत नसलेल्या उमेदवारांना सदर अर्हता गट-क मधील पदावर (वाहन चालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाच्या कालावधित संबंधितांनी विहीत संगणक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती अधिका-यांना सादर

करावे, अन्यथा हा कालावधि संपताच उमेदवारांची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआप संपृष्टात येईल, अशी स्पष्ट तरतूद उमेदवारांच्या नियुक्तीच्या आदेशात नियुक्ती प्राधिका-यांनी नमूद करावी. (शासन निर्णय, दि. २४.०९.२००१)

(१६) पद उपलब्धते अभावी गट-क मधील पदाऐवजी गट-ड मधील पदावर नियुक्ती देताना अनुसरावयाची कार्यपध्दती:-

गट-क मधील पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणा-या कर्मचा-याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट-ड मधील पदांवर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट- क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणा-या पदांवरील समजण्यात यावी. मात्र गट-ड मधील पदावर अनुकंपा योजनेन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा, तसे करण्यात आले तरच गट-क मधील पदावर नियुक्ती देता येईल. (शासन निर्णय, दि. २३.०८.१९९६)

(१७) अनुकंपा तत्वावर प्रतिक्षासूची ठेवण्याबाबतची कार्यवाही:-

(अ) अनुकंपा नियुक्तीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय/सा.प्र.वि.१४-अ यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूचीबरोबरच संबंधित नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता गट-क व गट-ड करीता प्रतिक्षासूची ठेवण्याची दुहेरी प्रतीक्षासूचीची कार्यपध्दती अंमलात आणावी. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(आ) गट-क व गट-ड मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी (कार्यालय किंवा विभाग प्रमुख इत्यादी) त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट-क व गट-ड च्या रिक्त पदांवर पदांसाठी विहीत अटी व शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांना त्यांच्याकडील प्रतीक्षासूचीतील क्रमानुसार नियुक्ती करु शकतील. मात्र उमेदवारांच्या नियुक्त्या केल्यानंतर त्या उमेदवारांची नावे जिल्हाधिकारी कार्यालयांकडील सामायिक प्रतीक्षासूचीतून वगळण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना लगेच कळवावीत. बृहन्मुंबईतील गट-क मधील नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्याकडील नियुक्त्यांबाबतची माहिती सा.प्र.वि./१४अ ला कळवावी. (शासन निर्णय, २२.०८.२००५ व शासन परिपत्रक दि. ५.२.२०१०)

(इ) अनुकंपाची प्रकरणे ज्या कार्यालयात/विभागात होतील त्या प्रकरणांच्या छाननीनंतर पात्र उमेदवारांची नावे संबंधित नियुक्ती अधिका-याकडील गट-क व गट-ड च्या प्रतीक्षासूचीत समाविष्ट करण्यात यावीत. त्याचप्रमाणे ज्या तारखेस अशी नावे कार्यालयाच्या प्रतीक्षासूचीवर घेण्यात येतील त्याच तारखेपासून त्यांची नावे संबंधित जिल्हाधिका-याकडील सामायिक प्रतीक्षासूचीत समाविष्ट करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे पाठवावीत. बृहन्मुंबईतील नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्याकडील गट-क च्या प्रतीक्षासूची/नियुक्त्यांबाबत सामान्य प्रशासन विभाग कार्यासन १४-अ यांना कळवावे. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(ई) जिल्हाधिका-यांकडे/सामान्य प्रशासन विभागाकडे समन्वयाच्या कामासाठी ठेवलेल्या सामायिक प्रतीक्षासूचीत जिल्हातील विविध कार्यालयांकडून येणारी नवीन नावे मूळ कार्यालयांच्या प्रतीक्षासूचीत समाविष्ट केलेल्या दिनांकानुसार गट-क व गट-ड च्या सामायिक प्रतीक्षासूचीत समाविष्ट करावीत. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(उ) ज्या कार्यालयात अनुकंपाधारक नियुक्तीच्या प्रतीक्षेत नाहीत, परंतु गट-क किंवा गट-ड मध्ये रिक्त पदे उपलब्ध आहेत. त्यांनी त्यांच्याकडे वर्षात रिक्त झालेल्या/होणा-या गट-क व गट-ड मधील पदांपैकी विहीत केलेल्या ५ टक्के पदे (१० टक्के- शासन निर्णय दि. १.३.२०१४) अनुकंपा धारकांनी भरण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागणीपत्र पाठवावे. अशी मागणीपत्रे पाठविताना संबंधित कार्यालयाने त्यांच्याकडे संबंधित पदांवर नियुक्ती देण्यासाठी अनुकंपाधारक त्या कार्यालयास उपलब्ध नाहीत असे प्रमाणित करावे. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(ऊ) सर्व जिल्हाधिकारी तसेच सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१४अ) यांनी प्रत्येक ६ महिन्यांनी जानेवारी आणि जुलै मध्ये त्यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूचीचा आढावा घेऊन दरम्यानच्या कालावधित नियुक्त्या मिळालेल्या उमेदवारांची नावे वगळून त्यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूची अद्ययावत करतील. यासाठी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालयातील प्रतीक्षासूच्यांचा आढावा घेऊन समन्वयाचे काम करतील. (शासन निर्णय, २२.०८.२००५)

(ए) जिल्हाधिकारी कार्यालयांनी जिल्ह्यातील सर्व कार्यालयात उपलब्ध होणाऱ्या पदांवर नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या मागणीनुसार सामायिक प्रतिक्षासूचीतील अनुकंपा धारकांची नियुक्तीसाठी शिफारस करावी. तसेच शिफारस प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याची राहिल. (शासन परिपत्रक दि.०५.०२.२०१०)

(ऐ) शासन निर्णय, दि. २२.०८.२००५ नुसार प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५ टक्के (१० टक्के- शासन निर्णय दि. १.३.२०१४) पदे अनुकंपा नियुक्तीने भरावयाची आहेत. नियुक्ती प्राधिका-यांकडे असलेल्या विभागाच्या/कार्यालयाच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांसाठी अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी रिक्त जागा उपलब्ध असल्यास त्यानुसार नियुक्ती करावी. तसेच रिक्त पदांची माहिती वेळोवेळी संबंधित जिल्ह्याधिका-यांकडे सादर करावी.(शासन परिपत्रक दि.०५.०२.२०१०)

(ओ) ज्या ठिकाणी विभागप्रमुख हा नियुक्ती प्राधिकारी असेल व त्याचे कार्यक्षेत्र एकापेक्षा अनेक जिल्हयांमध्ये असेल तर विभाग प्रमुखाने नियुक्ती प्राधिकारी या नात्याने त्याच्या अधिकार क्षेत्रातील जिल्हयातील कार्यालयांसाठी एकत्रित प्रतीक्षासूची ठेवावी. तसेच दिवंगत कर्मचारी ज्या जिल्हयातील कार्यालयामध्ये असेल त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे सामाईक प्रतीक्षासूचीवर घेण्यास त्या दिवंगत कर्मचाऱ्याच्या वारसाचे नाव पाठविण्यात यावे.

उदा. एखाद्या प्रशासकीय विभागाचे नियंत्रणाखालील विभागप्रमुखाचे कार्यालय, अमरावती

येथे आहे. विभागप्रमुख हा गट क साठी नियुक्ती प्राधिकारी असून त्याचे अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा या जिल्हयात कार्यक्षेत्र आहे. अशावेळी अनुकंपा नियुक्तीकरिता गट क साठी मूळ प्रतिक्षासूची नियुक्ती प्राधिकारी म्हणून अमरावती येथील विभाग प्रमुखांच्या कार्यालयात ठेवण्यात यावी व या प्रतीक्षासूचील सदर उमेदवारांची नावे सरसकट जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे न पाठविता दिवंगत कर्मचारी हा ज्या जिल्हयातंर्गत कार्यालयातील असेल त्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे संबंधित उमेदवाराचे नाव त्याच्या सामायिक प्रतीक्षासूचीत दाखल करण्यासाठी पाठविण्यात यावे व अशा प्रतीक्षासूचीवरील उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर त्याचे नाव दोन्ही प्रतिक्षासूचीतून वगळण्यात यावे.

गट ड करीता नियुक्ती प्राधिकाऱ्याचे कार्यक्षेत्र एकापेक्षा अनेक जिल्हयात असल्यास वरीलप्रमाणेच कार्यपध्दती अनुसरण्यात यावी. (शासन परिपत्रक दि.०५.०२.२०१०)

(औ) सैनिक कल्याण विभाग, पुणे व सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद या कार्यालयातील पदे ही त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केवळ माजी सैनिकांमधून भरण्याची तरतुद जाणीवपूर्वक करण्यात आली आहे. त्यामुळे दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी दि.२२.८.२००५ च्या शासन निर्णयान्वये अस्तित्वात आलेल्या योजनेमध्ये सदर दोन्ही कार्यालयातील आस्थापनांचा अपवाद करण्यात या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे. त्या कार्यालयातील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्याची कार्यवाही दि.२२.८.२००५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार न करता, ही कार्यवाही यापूर्वी अस्तितत्वात असलेल्या शासन निर्णयामधील (शासन निर्णय दि.१२ मार्च, १९९७) तरतुदीनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडूनच करण्यात यावी.

सैनिक कल्याण विभाग, पुणे व त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये तसेच सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद या कार्यालयातील गट-क व गट-ड मधील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबतचा अर्ज स्विकृत करणे, अर्जाची छाननी करणे व नियमांची पूर्तता होत असलेला अर्ज प्रतीक्षासूचीत समाविष्ट करण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्याबाबतची प्राथमिक कार्यवाही ही संबंधित कार्यालयांमार्फत करण्यात यावी. त्यानंतर सदर अर्जदाराचे नाव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या सामायिक प्रतिक्षासूचीमध्ये योग्य ठिकाणी समाविष्ट करावे व या सामायिक प्रतीक्षासूचीनुसार ज्येष्ठतेने त्यांचा क्रम अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी आल्यास त्यांच्या जिल्हयातील कोणत्याही क्षेत्रीय कार्यालयात (अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी रिक्त पदे असल्यास) नियुक्ती देण्यासंदर्भातील कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फतच करण्यात यावी. (शासन निर्णय दि.३१.३.२००८)

(१८) अनुकंपा नियुक्तीकरिता ठेवण्यात येणारी प्रतीक्षासूची वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्याबाबत:-

सर्व जिल्हाधिकारी/नियुक्ती प्राधिकारी व सामान्य प्रशासन विभाग, का. १४अ, यांनी त्यांच्या कार्यालयातील अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीक्षासूचीवर (सामायिक/स्वतंत्र) असलेल्या उमेदवारांची नावे व इतर माहिती सोबत जोडलेल्या **प्रपत्र 'ड' मधील नमून्यात** कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी व सदर माहिती ही प्रत्येक महिन्यास अद्ययावत करावी. (शासन परिपत्रक, दि. १५.०५.२०१०)

सर्व जिल्हाधिकारी व नियुक्ती प्राधिकारी व सामान्य प्रशासन विभाग, का. १४अ, यांनी प्रतीक्षासूचीतील उमेदवारांना महिन्याभरात अनुकंपा नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची नावे व माहिती प्रत्येक महिन्याच्या अखेरीस कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी व त्याची प्रत शासनास सामान्य प्रशासन विभाग, का. ८ कडे सादर करावी. (शासन परिपत्रक, दि. १५.०५.२०१०)

सर्व जिल्हाधिकारी व नियुक्ती प्राधिकारी व सामान्य प्रशासन विभाग, का. १४अ, यांनी अनुकंपा नियुक्तीबाबतची माहिती महिन्याच्या शेवटच्या दिवशी अद्यावत केली जाईल याची दक्षता घ्यावी. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारातील मंत्रालय खुद्द व क्षेत्रीय नियुक्ती प्राधिका-यांकडून सदर सूचनांची अंमलबजावणी केली जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांच्या अखत्यारातील नियुक्ती प्राधिका-यांच्या वेबसाईटचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक कार्यासन क्र. ८, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे पाठवावीत. (शासन परिपत्रक, दि. १५.०५.२०१०)

(१९) अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत पदांची मर्यादा:-

(अ) शासन निर्णय दि. २२.०८.२००५ अन्वये विहीत करण्यात आलेल्या अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क आणि गट-ड मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या ५% मर्यादेमध्ये वाढ करुन ती गट-क व गट-ड मधील प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% इतकी करण्यात आली आहे. (शासन निर्णय, दि. ०१.०३.२०१४)

(आ) अनुकंपा तत्वावरील पदे सन २०१२ या भरती वर्षापासून गट-क आणि गट-ड मधील प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% मर्यादेत भरण्याची कार्यवाही सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी तात्काळ करावी. (शासन पूरक पत्र, दि. ०२.०५.२०१४)

(इ) शासन निर्णय, दि. ०१.०३.२०१४ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% ची असलेली मर्यादा दि. ०१.०३.२०१५ पासून पुढे २ वर्ष (दिनांक २८.०२.२०१७ पर्यंत) चालू होती.सदर १०% च्या मर्यादेस दि. ०१.०३.२०१७ पासून पुढे दोन वर्ष (दि. २८.०२.२०१९ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे.

तथापि शासन निर्णय, वित्त विभाग दि. ०२.०६.२०१५ व दि. २३.०९.२०१५ अन्वये पदभरतीवर असलेले निर्बंध विचारात घेता, प्रस्तुत निर्बंध असेपर्यंत गट-क व गट-ड संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या १०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत. (शासन निर्णय, दि. २८.१०.२०१५ व दि. ०३.०५.२०१७)

(ई) निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली, ह्या कार्यालयात शासन सेवेत असताना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.

निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली हे कार्यालय नवी दिल्ली येथे असून त्या कार्यालयातील गट-क व गट-ड मधील एकूण पदांची ८९ ही संख्या लक्षात घेता त्या कार्यालयात प्रतिवर्षी १-२ पदेच रिक्त होतात. शासन निर्णय, दि.२२.८.२००५ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी विहित केलेल्या ५% मर्यादेमुळे (१०% - शासन निर्णय दि. ०१.०३.२०१४) या कार्यालयात कधीच अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध होणार नाही व अनुकंपा नियुक्ती या कार्यालयात करणेही शक्य होणार नाही. ही बाब विचारात घेता निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या आस्थापनेचा, अपवाद करुन त्या कार्यालयातील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना अनुकंपा नियुक्ती देण्याची कार्यवाही दि.२२.८.२००५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ (ओ) मध्ये विहित केलेली रिक्त पदांची ५% ची (१०% - शासन निर्णय दि. ०१.०३.२०१४) मर्यादा शिथिल करुन त्या कार्यालयातच उपलब्ध होणाऱ्या गट-क किंवा गट-ड च्या पदावर निवासी आयुक्त यांचेकडूनच करण्यास या शासन निर्णयाद्वारे खास बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे. (शासन निर्णय, दि.६.११.२००८)

(उ) कार्यालयामध्ये रिक्त पदांची संख्या १० पेक्षा कमी असल्यास नियुक्ती प्राधिकारी यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती:-

नियुक्ती प्राधिका-यांकडे त्याच्या नियंत्रणाखालील कार्यालयात गट-क व गट-ड मध्ये प्रतिवर्षी २० किंवा त्या पटीत किंवा त्यापेक्षा अधिक पदे रिक्त होत असतील, तर त्यांनी प्रचलित नियमाप्रमाणे ५% (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) नुसार पदे अनुकंपा नियुक्तीने भरावीत. मात्र ज्या नियुक्ती प्राधिका-याकडे वर्षात १० पेक्षा कमी रिक्तपदे उपलब्ध होणार असतील, तर त्यांनी त्यावर्षी उपलब्ध होणा-या सदर रिक्त पदांची संख्या संबंधित जिल्हाधिका-यांना/बृहन्मुंबईच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ) यांना कळवावी. तसेच रिक्त पदे उपलब्ध होणार नसल्यासही कळविण्याची कार्यवाही करावी. संबंधित जिल्हाधिका-यांनी त्यांच्या जिल्ह्यातील (गट-क व गट-ड) व सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ) यांनी (फक्त गट-क) बृहन्मुंबईतील अशा नियुक्ती प्राधिका-यांकडून प्राप्त झालेल्या रिक्त पदांची संख्या एकत्रित करुन त्या एकूण रिक्त पदांच्या ५% (सध्या १०%, शासन निर्णय, ०१.०३.२०१४) पदांची परिगणना करुन, त्यानुसार ती पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यासाठी जिल्हाधिका-यांनी/ सामान्य प्रशासन विभागाने (कार्यासन १४-अ) त्यांच्याकडील सामायिक प्रतीक्षासूचीतील उमेदवारांच्या नावांची शिफारस जेष्ठतेनुसार नियुक्ती प्राधिका-यांना करण्याची कार्यवाही करावी. या नव्याने समाविष्ट केलेल्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिका-यांची तसेच बृहन्मुंबईसाठी सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ) ची राहील.

सदर तरतुदींची अंमलबजावणी करताना कॅलेंडर वर्षात (जानेवारी ते डिसेंबर) रिक्त झालेली पदे विचारात घ्यावीत व त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ)/ जिल्हाधिकारी यांच्याकडून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी विभाग/ कार्यालयात उपलब्ध असलेल्या पदांवर अनुकंपा नियुक्तीसाठीच्या उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यावर सात दिवसांच्या आत नियुक्ती करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याची राहील. नियुक्ती केल्यानंतर तसे केल्याचे सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४-अ)/ जिल्हाधिकारी यांना संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने विनाविलंब कळविणे बंधनकारक आहे.

त्याखेरीज बृहन्मुंबईतील गट-ड वर्गाच्या अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध नसेल तर अशा आस्थापनांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी अनुकंपा नियुक्ती योजनेखाली प्राप्त झालेली नावे वरानमुद केल्याप्रमाणे रिक्त पदांची माहिती जिल्हाधिकारी, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई यांच्याकडे पाठवावीत. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी गट-ड करीता स्वतंत्र सामायिक प्रतीक्षासूची ठेऊन त्यामधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांच्या नावांची शिफारस ज्या ठिकाणी अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्ध आहे अशा आस्थापनांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांना करावी. (शासन निर्णय, दि. ०१.०१.२००८)

(ऊ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी दिनांक २२.०८.२००५ पूर्वी प्रतिक्षासूचीत असलेल्या पात्र उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

१. शासकीय कार्यालयातील आस्थापनेवर गट-क व गट-ड मध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरिता तयार करण्यात आलेल्या प्रतीक्षासूचीमधील, दि.२२.८.२००५ पूर्वीच्या उमेदवारांना दि. २२.०८.२००५ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेली रिक्त पदांच्या ५% ची मर्यादा (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) लागू राहाणार नाही.

२. प्रतीक्षासूचीवर असलेल्या दि. २२.०८.२००५ पूर्वीच्या उमेदवारांना शासकीय कार्यालयात रिक्त असलेल्या/होणाऱ्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती, आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षात टप्प्याटप्प्याने देण्यात यावी. तीन वर्षात टप्प्या-टप्प्याने नियुक्ती करताना दि. २२.०८.२००५ पूर्वीच्या प्रतीक्षायादीतील उमेदवारांपैकी ५० % उमेदवारांची नियुक्ती पहिल्यावर्षी, २५% उमेदवारांची नियुक्ती दुसऱ्या वर्षी व उर्वरित २५% उमेदवारांची नियुक्ती तिसऱ्या वर्षी करण्यात यावी.

३. अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी उपरोक्त (अनुक्रमांक (ऊ) (१) व (२) मधील) आदेशाची अंमलबजावणी करताना दि. २२.०८.२००५ पूर्वीच्या उमेदवारांना तीन वर्षात टप्या-टप्याने नियुक्ती देण्याकरिता नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे तितकी पदे उपलब्ध नसल्यास, त्यांनी अशा उमेदवारांना, सामायिक प्रतीक्षासूचीतून अन्य कार्यालयात नियुक्ती देण्याची विनंती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे करावी. बृहन्मुंबईतील गट-क च्या पदावरील नियुक्तीसंदर्भात अशी कार्यवाही बृहन्मुंबईतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी, सामान्य प्रशासन विभाग (का.क्र.१४-अ)

यांच्याकडे करावी व बृहन्मुंबईतील, गट ड च्या बाबतीत अशी कार्यवाही बृहन्मुंबईतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे करावी. जिल्हाधिकारी/सामान्य प्रशासन विभाग (का.१४-अ) यांना रिक्त पदावर अनुकंपा नियुक्तीकरिता शिफारस करणे शक्य व्हावे म्हणून सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गट-क व गट-ड मधील रिक्त पदांची संख्या त्यांना कळवावी. ही प्रक्रिया संपूर्णपणे सुयोग्यरित्या पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी/सामान्य प्रशासन विभाग, का.१४-अ यांची राहील. त्यांनी ह्या संदर्भात वेळोवेळी आढावा घेऊन अनुकंपा तत्वावरील नियुक्ती योग्य रित्या होते, याची खात्री करावी. (शासन निर्णय, दि. २३.०४.२००८)

(ए) दि. २२.०८.२००५ पूर्वी प्रतीक्षासूचीवर असलेल्या उमेदवारांपैकी ५०% उमेदवारांना पहिल्या वर्षी, २५% उमेदवारांना दुसऱ्या वर्षी व उर्वरीत २५% उमेदवारांना तिसऱ्या वर्षी शासन सेवेत अनुकंपा तत्वावर सामावून घ्यायचे आहे. ही कार्यवाही करताना प्रतीक्षासूची मध्ये उमेदवार आहेत, परंतू नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे नियुक्ती देण्यासाठी गट-क व गट- ड मध्ये सरळसेवेची पदे रिक्त नाहीत तसेच ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे रिक्त पदे आहेत, परंतु अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी दि २२.०८.२००५ पूर्वीचे उमेदवार प्रतीक्षासूचीवर नाहीत, अशी परिस्थिती केव्हा केव्हा उदभवते. परिणामी अशा वेळी अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सामायिक प्रतीक्षासूचीतून अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी जिल्ह्यांतील अन्य कार्यालयांकडे शिफारशी केल्यानंतरही त्या उमेदवारांना संबंधित कार्यालयात पद रिक्त असूनही नियुक्ती दिली जात नाही, असे काही जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे. अनुकंपा नियुक्ती संदर्भात शासनाने जो धोरणात्मक निर्णय दि.२३.४.२००८ च्या आदेशान्वये घेतला आहे, त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्याने ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे/ज्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयामध्ये गट-क व गट-ड ची सरळसेवेची पदे रिक्त आहेत, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या शिफारशीच्या अनुषंगाने विहीत अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या व पूर्ण कागदपत्रे असणाऱ्या उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची कार्यवाही विनाविलंब पूर्ण करावी. त्याचप्रमाणे या आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांमध्ये सरळसेवेच्या गट-क व गट-ड च्या रिक्त पदांची माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना न चुकता वेळोवेळी कळवावी. तसेच, सरळसेवेने गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्यासंदर्भात जाहिरात देण्यापूर्वी दि.१.१.२००८ व दि.२३.४.२००८ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात आल्याची खात्री करुन उर्वरीत पदांकरीता जाहिरात देण्यापूर्वी संबंधित जिल्हाधिकारी यांची संमती मिळवणे आवश्यक राहील.

पृष्ठ २८ पैकी १८

जाहिरातीसाठी संमती मिळविण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविताना नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्याच्या अखत्यारीतील कोणत्या जिल्हयात कोणत्या संवर्गाची किती पदे रिक्त आहेत याची माहिती त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक राहील. जाहिरात देण्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्यावर दि. २२.०८.२००५, दि.१.१.२००८ व दि.२३.४.२००८ च्या शासन निर्णयातील तरतुदींची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेल्या उमेदवारांना अनूकंपा नियुक्तीकरीता त्यांच्या जिल्ह्यात रिक्त असलेली पदे भरण्याकरीता जिल्हाधिकारी शिफारस करतील व अशा शिफारशीनुसार अनुकंपा नियुक्ती देणे संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना बंधनकारक राहील. अनुकंपा नियुक्ती करिता जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार नियुक्ती केल्यानंतर/दिल्यानंतर जी रिक्त पदे उरतील ती पदे जाहिरातीद्वारे विहीत मार्गाने व विहित कार्यपध्दतीने भरण्यासाठी, जिल्हाधिकारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना परवानगी/ ना हरकत प्रमाणपत्र देतील. (शासन परिपत्रक, ०५.०२.२०१०)

(२०) मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना करावयाच्या कार्यवाहीबाबत:-

अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी वर्षभरात रिक्त होणाऱ्या पदांच्या ५ % (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) पदे अनुज्ञेय असून, शासनाच्या दि. १३.०६.२००३ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्ती करतांना मागासवर्ग/अमागासवर्ग अशा भेदाभेद न करता प्रतिक्षासूचीवरील ज्येष्ठतेनूसार नियुक्ती देण्याचे निदेश देण्यात आले आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २३.०४.२००८ च्या शासन निर्णयान्वये दि. २२.०८.२००५ पूर्वीच्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देण्यासाठी ५% (१०% - शासन निर्णय, ०१.०३.२०१४) अट नसल्याने, रिक्त पदांची माहिती पाठविणाऱ्या कार्यालयास, जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रतीक्षासूचीवर उमेदवार उपलब्ध असल्यास रिक्त पदांइतक्याच उमेदवारांची शिफारस केली जाते. नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून उपलब्ध सर्व रिक्त पदांची संख्या कळविली जात असल्याने त्यामध्ये काही पदे मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असण्याची शक्यता असते व अशा पदांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची शिफारस केली गेल्यास नियुक्ती प्राधिकाऱ्यांपुढे आरक्षित पदावर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करणे नियमानुकूल होईल किंवा कसे, असा प्रश्न उद्भवत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य लोकसेवा {अनुसूचित-जाती/अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण अधिनियम, २००१ मधील कलम ४(१) मध्ये "अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा अशा जातीतील, जमातीतील, प्रवर्गातील किंवा वर्गातील नसलेल्या उमेदवारांद्वारे भरण्यात येणार नाहीत" अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.

त्यामुळे वरील अधिनियमातील तरतूद तसेच अनुकंपा नियुक्ती देताना ती प्रतीक्षासूचीवरील जेष्ठताक्रमानुसारच देण्याची प्रचलित कार्यपध्दती इ. सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन आता अनुकंपा नियुक्तीसाठी असलेल्या प्रतीक्षासूचीवरील अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी उमेदवारांची शिफारस करताना जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी, असे सूचित करण्यात येत आहे :-

अ) मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती करता येत नसल्याने, जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून रिक्त पदांची माहिती घेताना प्रत्येक रिक्त पद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहे/अनारक्षित आहे याचीही माहिती घ्यावी. तद्नंतर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी/शिफारस करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी अशा पदावर अनुकंपा उमेदवारांची शिफारस करतांना मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या रिक्त पदावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवाराची शिफारस केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी व असे आरक्षित पद आरक्षित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त रिक्त ठेवावे.

ब) प्रतीक्षासूचीत कनिष्ठ क्रमांकावर मागास प्रवर्गाचा उमेदवार असला तरी त्यास जेष्ठता क्रम डावलून खुल्या प्रवर्गाच्या जेष्ठ उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी आरक्षित पदावर नियुक्ती देता येणार नाही. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर जेव्हा आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवाराचा प्रतीक्षासूचीतील जेष्ठतेनुसार नियुक्तीसाठी क्रम येईल तेव्हाच त्याची नियुक्ती आरक्षित पदावर करणे आवश्यक आहे. तथापि, मागासवर्गीय उमेदवारास प्रतीक्षासूचीवरील जेष्ठताक्रमानुसार अनुकंपा नियुक्ती देण्याच्यावेळी त्या उमेदवारांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे पद उपलब्ध नसले तरी त्यांना खुल्या प्रवर्गाच्या उपलब्ध पदावर नियुक्ती देण्यात यावी.

क) सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या आस्थापनेवरील रिक्त पदांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना कळविताना त्यामधील आरक्षित पदे किती आहेत व ती कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहेत, याचा स्पष्ट उल्लेख करावा. त्याचप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे त्यांच्या प्रतीक्षासूचीवर दाखल करण्यासाठी अनुकंपा उमेदवारांची नावे पाठविताना त्यांचा प्रवर्ग न चुकता नमूद करावा. (शासन परिपत्रक दि. १३.१०.२०१०)

(२१) अनुकंपा तत्वावरील प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचे निधन झाल्यास त्याऐवजी कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचा समावेश अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीत करणे:-

कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या पात्र कुटुंबियांचे नांव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये घेतल्यानंतर त्याच्याऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नाव प्रतीक्षासूचीमध्ये घेतले जात नाही. म्हणजेच प्रतीक्षासूचीमधील नाव बदलण्याची तरतूद सध्याच्या धोरणात नाही. परंतु प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचेच निधन झाल्यास प्रतीक्षासूचीतील उमेदवाराऐवजी त्याच्या कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकाला

घेतले जाईल. मात्र नव्या उमेदवाराचे वय सदर दिनांकाला १८ वर्षापेक्षा जास्त असावे. जर नव्या उमेदवाराचे वय मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी असेल तर, नव्या उमेदवाराचे नाव त्याला ज्या दिवशी १८ वर्ष पूर्ण होतील त्या दिनांकास घेण्यात यावे. (शासन निर्णय दि. २०.०५.२०१५)

(२२) दि. २६.११.२००८ ते दि. २९.११.२००८ या कालावधित मुंबई येथे आतंकवाद्यांच्या हल्ल्यांत शहीद झालेल्या पोलीस सेवेतील व्यक्तींच्या कुटुंबियांपैकी एकास गट-ब किंवा गट-अ मधील पदावर खास बाब म्हणून शासन सेवेत सामावून घेण्याबाबत:-

(अ) प्रचलित अनुकंपा नियुक्ती योजनेतील अटी व शर्ती तसेच पात्रतेचे निकष शिथील करुन एक खास बाब म्हणून दि. २६.११.२००८ ते २९.११.२००८ या कालावधित शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचा-यांच्या पात्र कुटुंबियांपैकी एकाच व्यक्तीस त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन गट-क व गट-ड प्रमाणेच शासन सेवेतील गट-ब किंवा गट-अ मधील सरळसेवेच्या कोट्यातील प्रथम टप्प्यावरील पदांवर नियुक्ती देण्यास शासन मान्यता देत आहे. प्रचलित अनुकंपा योजनेतील अटी व शर्ती शिथील करुन वरील पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यास दिलेली मान्यता ही तत्कालीन विशिष्ट परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणी घेतलेला निर्णय पूर्वोदाहरण म्हणून धरता येणार नाही. (शासन निर्णय, दि. २०.०१.२००९)

(आ) अनुकंपा तत्वावरील नियुक्ती संदर्भातील इतर तरतूदी कायम राहतील. त्यामुळे शहीद झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र व्यक्ती सज्ञान असल्यास त्यांनी पोलीस अधिकारी/कर्मचारी शहीद झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षात अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या पात्र कुटुंबियांपैकी कोणीही व्यक्ती सज्ञान नसल्यास त्या कुटुंबियांमधील पात्र व्यक्तीने सज्ञान झाल्यानंतर एका वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक राहील. तथापि पात्र कुटुंबियांतील ज्यांना गट-ब किंवा गट-अ पदावरील नियुक्तीकरिता अर्ज करावयाचा आहे, त्यांच्याबाबतीत अर्ज करण्यासाठी वयोमर्यादा २५ वर्षापर्यंत राहील. (शासन निर्णय, दि. २०.०१.२००९ व दि. १३.११.२००९)

प्रस्तुत प्रकरणी अनुकंपातत्वावर प्राधान्याने नियुक्ती द्यावयाची असल्याने शासन निर्णय दि. २२ ऑगस्ट, २००५ मधील तरतूदीनुसार नियुक्ती करीता रिक्त होणाऱ्या पदांच्या ५% ची मर्यादा या प्रकरणी शिथील करण्यात येत आहे. त्यामुळे अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहित सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतर संबंधितांना प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. तथापि, आयोगाच्या कक्षेतील गट-ब किंवा गट-अ पदावर नियुक्ती देण्यापूर्वी अशा प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासंदर्भातील संपूर्ण कार्यवाहीवर म्हणजेच अर्ज स्वीकृतीपासून ते नियुक्ती देईपर्यंतच्या कार्यवाहीवर नियंत्रण गृह विभागाचे राहील. (शासन निर्णय दि. २०.०१.२००९)

(२३) सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकार क्षेत्रातील अनुकंपा नियुक्ती योजनेशी संबंधित कोणताही धोरणात्मक निर्णय प्रशासकीय विभागांनी परस्पर न घेण्याबाबत:-

शासन सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड मधील शासकीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यास त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट-क अथवा गट-ड पदावर अनुकंपा नियुक्ती देण्याची योजना व त्या योजनेत वेळोवेळी आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे ही बाब सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकार कक्षेतील आहे. या योजनेतील प्रचलित तरतूदींपेक्षा वेगळा अथवा त्या तरतूदींना अपवाद करणारा असा कोणताही निर्णय प्रशासकीय विभागांनी स्वतंत्रपणे घेणे अपेक्षित नाही. तथापि दि.२६ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वारसांना अनुकंपा नियुक्तीचा विशेष लाभ देण्याचा निर्णय घेताना त्याचप्रमाणे नक्षलवादी क्षेत्रात कार्यरत असतांना नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती विषयक विशेष लाभ देण्याचा निर्णय घेताना महसूल व वन विभागाने व गृह विभागाने सामान्य प्रशासन विभागाशी सल्लामसलत न करता अथवा प्रस्ताव या विभागास न दाखविता परस्पर मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करुन स्वतंत्रपणे निर्णय घेतल्याचे आढळून आले आहे व अशातऱ्हेने प्रशासकीय विभागांनी परस्पर प्रस्ताव सादर केल्यामुळे प्रस्तावाची सर्वांगीण बाजू मंत्रिमंडळासमोर/शासनासमोर विभागांकडून मांडली जात नाही ही वस्तुस्थिती आहे.

वस्तुत: कोणतीही नियुक्ती ही सेवाविषयक बाब असल्याने, अनुकंपा नियुक्तीसंदर्भात निर्णय घेताना सर्वंकष विचार होणे आवश्यक असते व त्यासाठी सेवाविषयक नियम/तरतूदी, वेळोवेळी पारित झालेले न्याय निर्णय तसेच घेतलेल्या निर्णयाचा राज्य स्तरावरील सर्व सेवांवर होणारा परिणाम विचारात घेऊन निर्णय घ्यावा लागतो.

वर नमूद केल्यानुसार प्रशासकीय विभागांनी सामान्य प्रशासन विभागाशी सल्ला मसलत न करताच परस्पर शासनास प्रस्ताव सादर करताना वरील कोणत्याही बाबींचा विचार केलेला दिसून येत नाही. तसेच त्यामुळे प्रचलित कार्यपध्दतीचा व संकेतांचा भंग होऊन संबंधीत प्रशासकीय विभागाकडून त्यांचे कार्यकक्षांचे उल्लंघन होत आहे ही बाबही त्या विभागांनी विचारात घेतलेली नाही. त्यामुळे विहित कार्यपध्दती अनुसरुन व सामान्य प्रशासन विभागाशी सल्ला मसलत न करता परस्पर घेतल्या गेलेल्या निर्णयामुळे त्यामध्ये काही त्रुटी राहून भविष्यात न्यायालयीन प्रकरणे उद्भवून त्यामुळे शासनाची अडचणीची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

वरील सर्व परिस्थिती विचारात घेऊन, सर्व प्रशासकीय विभागांना असे निदेश देण्यात येत आहेत की, सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यकक्षेतील "अनुकंपा नियुक्ती" या विषयाशी संबंधीत कोणताही प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणण्यापूर्वी तो सामान्य प्रशासन विभागाला दाखविणे व अशा कोणत्याही प्रस्तावामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायांचा समावेश मंत्रिमंडळ टिप्पणीमध्ये

करणे सर्व प्रशासकीय विभागांना याद्वारे बंधनकारक करण्यात येत आहे.(शासन परिपत्रक, दि. ०५.०३.२०११)

(२४) अनुकंपा नियुक्ती हा कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा "वारसा हक्क" नाही-

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निर्णयानूसार अनुकंपा तत्वावरील नियुक्ती हा कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा "वारसा हक्क" होत नाही. तसेच विशिष्ट कालावधी उलटून गेल्यावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहत नाही. (शासन निर्णय, दि. २२.०८.२००५)

(२५) अनुकंपा नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती शिथील करण्याबाबत:-

शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट-ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची तरतुद आहे. याव्यतिरिक्त अन्य कोणतीही अट शिथील करण्यास शासन सक्षम नाही असा स्पष्ट उल्लेख शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४ मध्ये करण्यात आला आहे.

अनुकंपा नियुक्तीबाबच्या तरतुदी सुस्पष्ट असताना देखील ब-याच विभागांकडून कर्मचा-यांच्या कुटुंबियांना अनुकंपा नियुक्तीकरिता अटी शिथील करण्याकरिता सातत्याने प्रस्ताव प्राप्त होत असतात. अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार शासनाला नसताना देखील अशा स्वरुपाचे प्रस्ताव विचारात घेण्यामुळे शासनाच्या आदेशांचे उल्लंघन होते आणि अनुकंपाच्या अटी शिथीलक्षम आहेत असा गैरसमज पसरतो. परंतु या अटी व शर्ती शिथीलक्षम नसल्याने ही सर्व प्रकरणे सामान्य प्रशासन विभागात अमान्य केली जातात. यास्तव नियमांना धरुन नसलेली प्रकरणे/ शासन सक्षम नसलेली प्रकरणे विभागांनी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करुन नयेत. केवळ गट-ड मधील नियुक्तीसाठी कर्मचा-यांच्या विधवांना शैक्षणिक अर्हतेत जी शिथीलता दिली जाते ती वगळता अन्य कोणत्याही अटी व शर्ती शिथिल करण्याचे प्रस्ताव विभागांनी विचारात घेऊ नयेत.

अनुकंपा नियुक्तीबाबतचे प्रस्ताव विभाग/कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांची संपूर्ण शहानिशा संबंधित कार्यालयांनी करुन जर अटी व शर्तींची पूर्तता होत असेल तरच ते प्रस्ताव विचारात घ्यावेत अन्यथा ते प्रस्ताव त्यांच्या स्तरावर उचित उत्तर देऊन निकालात काढावेत. त्याकरीता प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग/शासनास सादर करण्याची आवश्यकता नाही. सर्व नियुक्ती अधिकारी/विभाग/कार्यालयांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(शासन परिपत्रक, दि. २९.१०.२००३)

(२६) अटी शिथील करण्याचे अधिकार-

उपरोक्त अनुक्रमांक ३.(१२) (इ) मध्ये नमूद केलेल्या अटी व्यतिरिक्त कोणत्याही अटी शिथील करण्याची शक्ती शासनाकडे राहणार नाही.

परिशिष्ट 'ब'

(शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.)

शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नेमणूक देतेवेळी भरावयाचे प्रपत्र. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

भाग-१

१. (अ) दिवंगत अधिकारी/कर्मचा-याचे नांव:-
(ब) कर्मचा-याचे पदनाम:-
(क) जन्म दिनांक:-
(ड) मृत्यूचा दिनांक/कायमस्वरुपी जायबंदी झाल्याचा दिनांक:-
(इ) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक:-

२. (अ) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे
त्या व्यक्तीचे नांव:-
(ब) त्याचे/तिचे कर्मचा-याशी नाते:-
(क) जन्म दिनांक:-
(ड) शैक्षणिक अर्हता:-
(इ) कुटुंबियांपैकी दुस-या कोणा कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे काय ?:-

३. स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नासह पुढील योजनांनुसार मिळालेली एकूण रक्कम:-
(अ) कुटुंब निवृत्तीवेतन-
(ब) स्थावर मालमत्तेपासूनचे वा इतर मासिक उत्पन्न-
(क) मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान-
(ड) भविष्यनिर्वाह निधीतील बचत-
(इ) ठेव संलग्न विमा योजना-
(फ) गट विमा योजना-
(ग) आयुर्विम्याची रक्कम-

एकूण रक्कम-

४. शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचा तपशील (त्यापैकी कोणी नोकरी/व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन याबाबतची माहिती)

अ.क्र. (१)	नांव (२)	शासकीय कर्मचा-याशी नाते व वय (३)	नोकरी /व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन्न (४)
१			
२			
३			
४			

प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर नमूद केलेल्या बाबी माझ्या समजुतीप्रमाणे ख-या आहेत. वरील बाबींपैकी एक बाब जरी भविष्यात खोटी किंवा चुकीची आढळली तर माझी नियुक्ती समाप्त करण्यात यावी.

दिनांक- उमेदवाराची सही.

श्री./श्रीमती ..... हे माझ्या परिचयाचे असून त्यांनी नमूद केलेल्या बाबी ख-या आहेत.

दिनांक:- स्थायी शासकीय कर्मचा-याची सही व पत्ता

भाग-२

१ (अ) ज्याला नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे नांव:-

(ब) त्याचे/तिचे शासकीय अधिकारी/कर्मचा-याशी नाते:-

(क) शैक्षणिक अर्हता, वय (जन्मतारीख), अनुभव (काही असल्यास):-

(ड) ज्या पदावर नियुक्ती द्यावयाची आहे ते पद व कार्यालयाचे नांव:-

२. उमेदवाराने अर्ज केल्याचा दिनांक:-

३. विभाग प्रमुख/विभागाची शिफारस:-

४. उमेदवाराचे प्रकरण सादर करण्यास उशीर झाला असल्यास त्यांचा खुलासा:-

मी उमेदवाराने नमूद केलेल्या भाग-१ मधील बाबी तपासल्या आहेत.

दिनांक-
ठिकाण-

आस्थापना अधिका-यांची सही,
नांव व पत्ता

परिशिष्ट - 'क'

(शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.)

(शासन निर्णय, क्र.अकंपा-१०९६/प्र.क्र.६७/९६/आठ, दि. २०.१२.१९९६ अन्वये निवड मंडळाच्या कक्षेतील रु. १२००/- व त्याहून अधिक वेतनश्रेणी असलेले संवर्ग कार्यकारी पदे) (वेतनश्रेणी- ५ व्या वेतन आयोगानुसार)

१. वरिष्ठ लिपीक	रु. १२००-२०४०
२. वरिष्ठ सहायक	रु. १४००-२३००
३.अल्पबचत अधिकारी	रु. १६४०-२०००
४. वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक	रु. १६४०-२९००
५. रचना सहायक	रु. १४००-२३००
६. कनिष्ठ अभियंता	रु. १६४०-२९००
७. सांखिकी सहायक	रु. १२००-२०००
८. दुय्यम निबंधक	रु. १२००-२०४०
९. लेखापाल	रु. १६४०-२९००
१०. सहकार अधिकारी	रु. १६४०-२९००
११. विस्तार अधिकारी(कृषि)	रु. १६००-२६६०
१२.लेखा परिक्षक	रु. १६४०-२९००
१३. विस्तार अधिकारी (पंचायत)	रु. १४००-२३००
१४. विस्तार अधिकारी (शिक्षण)	रु. १६४०-२९००

परिशिष्ट - 'ड'

(शासन निर्णय, क्र. अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७)

अनुकंपा नियुक्तीसाठी जिल्हाधिकारी/सा.प्र.वि.-१४-अ आणि नियुक्ती प्राधिकारी यांनी ठेवावयाच्या प्रतीक्षासूचीचा नमूना

(शासन परिपत्रक, दि. १५.०५.२०१०)

अ.क्र.	प्रतीक्षासूची मधील उमेदवाराचे नाव व पत्ता	उमेदवाराशी संबंधित मूळ कार्यालयाचा पत्ता	प्रतीक्षासूची मधील क्रमांक	प्रतीक्षासूची मध्ये नाव दाखल झाल्याचा दिनांक	जन्मतारीख	शैक्षणिक अर्हता	मागासवर्गीय प्रवर्गाचे नावखुला/	नियुक्तीसाठी शिफारस केल्याचा दिनांक व क्रमांक	नियुक्तीसाठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली
१	२	३	४	५	६	७	८	९	१०

अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रक यांचे एकत्रिकरण.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्र :अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०४ ऑगस्ट, २०१८

वाचा

१) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ दिनांक २१.०९.२०१७.

शासन शुध्दीपत्रक :-

संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ वगळण्यात येत आहे. तसेच परिशिष्ट "अ" अनुक्रमांक ३ (३) (इ) मधील "(उदाहरणादाखल काही कार्यकारी पदांची यादी -परिशिष्ट क)" हे शब्द व सोबतचे परिशिष्ट "क "वगळण्यात यावे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०८०४१५१७३४०४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317edc978442ac0b3994b4abcf73fe717ee52944443a8526975101cc93, serialNumber=82e4748418d9427232001a1094ed5913488f4f3d1967665a47d177267c9d3384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2018.08.09 12:52:12 +05'30'

(गीता कुलकर्णी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधान भवन, मुंबई,
५. सर्व सन्माननीय संसद सदस्य,

६. विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य.
७. मा. मुख्य सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९. सर्व मंत्रालयीन विभाग,
१०.प्रबंधक मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.प्रबंधक अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
13(a) In the event of the Auction Purchaser failing or neglecting to make payment of 1/4th of the sale price and/or 3/4th of the Sale price plus Sales Tax, Forest Development Tax and all other taxes, rates and duties without or with interest or any part thereof as provided in condition 12 above or in the event of the Auction Purchaser committing a breach of any of the terms and conditions hereof the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division may, without prejudice to any other rights remedies and powers of the Government, cancel such sale which has been accepted whereupon without prejudice to any other rights, remedies and powers of the Government, the amount deposited by the Auction Purchaser as Earnest Money and the said amount of 1/4th Sale price and interest, if paid, shall forthwith stand forefeited to the Government. On cancellation of such sale the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division shall in his absolute distriction if he so thinks fit, be entitled to -

forthwith and without any further notice resell either by public auction or by private contract on account and at the risk of the Auction Purchaser the lot/s for which the bid of the Auction Purchaser was accepted and cancelled as aforesaid.

Provided, however that if before the actual resale of the material at the risk and cost of the auction Purchaser, the Auction Purchaser pays under intimation tothe Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of independent Sub-Division the sale price or three fourths of the sale price as the case may be (defaulted amount) in full along with interest Sales Tax, Forest Development Tax and all other taxes, rates and duties as aforesaid and also penalty at the rate of 10% of the price offered by him the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of independent Sub-Division shall set a side the cancellation of the sale and permit the Auction Purchaser to remove the material sold to him as hereinafter provided in clause 14 here of.

The Auction Purchaser shall be liable to pay to the Government in the event of resale the amount of the loss, if any, sustained by the Government as a result of such resale, but he shall not be entitled to any profit arising as a result thereof. The Auction Purchaser shall forthwith on demand by the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of independent Sub-Division pay to the Government the amount of such loss. The amount of such loss shall be deemed to be arrears of land revenue and without prejudice to any other rights, remedies and powers of the Government the Government shall be entitled to recover the same from the Auction Purchaser as arrears of land revenue.

14. The amount of consideration shall be paid into Maharashtra Government Treasury. For payment of consideration the Auction Purchaser or the Purchaser on resale under clause 13 hereof as the case may be shall obtain the necessary challan from the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division. The receipted challan shall be produced before the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division/ Depot Officer in proof of payment of consideration. The sale price can also be paid by a demand draft in favour of the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division concerned drawn on the State Bank of India or any other scheduled Bank on its branch situated at the Head Quarters of the Treasury/Sub-Treasury..... *

* Note : The name of H.Qr. of Treasury/Sub-Treasury shall be prescribed by the concerned Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division.

DELIVERY OF MATERIAL :

15. After making full payment of the sale price, Sales Tax, Forest Development Tax and other taxes, rates and duties as are leviable thereon and interest, if any, as provided in condition 12 hereof the Auction Purchaser of the purchaser or the purchaser on resale as the case may be shall remove the material within 90 days from the date of auction/dae of communication of acceptance by the competent authority as the case may be. The auction Purchaser or the pruchaser on resale as the case may be shall make his own arrangements for loading and removal of the material, PROVIDED, However, that if the Auction Purchaser or the Purchaser on resale as the case may be fails or neglects to remove the material as aforesaid within the said period of 90 days the Auction Purchaser or the Purchaser on resale as the case may be shall thereafter not be entitled to remove the said material without obtaining the prior permission in writing of the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division for which permission the Auction Purchaser or the Purchaser on resale as the case may be shall apply to a week before the expiry of the said period of 90 days. The Auction Purchaser or the Purchaser on resale as the case may be shall remove the said material before the expiry of the dae specified in such permission after paying in cash the ground rent calculated at the rate of Rs. per day per lot for such entire further period.

Provided, further that if the Auction Purchaser or the Purchaser on resale as the case may be fails or neglects to remove the said material before the date specified in such permission the Auction Purchaser or the Purchaser on resale as the case may be shall NOT thereafter be entitled to do so without obtaining the prior permission in writing of the Conservator of Forests, who may be in his absolute discretion refuse or grant such permission on such conditions as he thinks fit including payment of an additional sum by way of penal ground rent which shall NOT exceed 10% of the value of the said material. The decision of the Conservator of Forests shall be final and binding on the Auction Purchaser as resale as the case may be.

16. If the sale is held at the beginning of the rainy season and the Auction Purchaser requests Government for grant of extension of time for removal due to various reasons, the period of rainy season which will be determind by the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division may be excluded for the prupose of calculating the extension period.

17. No lot or part of a lot shall be allowed to be removed unless full payment in respect of that lot has been made and a Forest Pass for transportation of material is issued by a person duly authorised by of the depot.

18. The removal shall be restricted to hours of day light and shall be allowed through the gate of the depot set apart for the purpose where the timber or the concerned forest produce shall be presented for examination and in case of timber branding the same with an exit hammer mark.

19. The material shall be deemed to have been delivered once the timber or the concerned forest produce is taken possession of by the Auction Purchaser or his authorised agent and his signature in token of receipt of the material [illegible] is obtained.

ACTION FOR BREACH OF CONDITIONS :

20. Notwithstanding the condition of resale, the Auction Purchaser shall be liable to make good the loss sustained by the Government on account of his failure to discharge his obligations.

The amount of loss will be determined by the Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division as under :-

a) the amount outstanding against the purchaser 'X' (i.e. the sale price)

b) the amount realised, if any, on resale of the 'Y' material.

c) The amount paid by the Auction Purchaser towards 'Z' EMD/Security Deposit/Advance on account of consideration.

The amount of loss will thus be:-'X'-('Y'+'Z')

The amount of loss shall be deemed to be arrears of land revenue and without prejudices any other rights remedies and powers of the Government the same may be redovered as arrears of land revenue in accordance with the provisions of the Indian Forest Act, 1927.

21. Unless the Auction Purchaser has secured extension of period for removal of material beyond 90 days from the date of auction date of communication of acceptance by the competent authority as the case may be on expiry of 90 days or such extended periods as the case may be the material shall revert to Government. The Auction Purchaser will have No right over the left ever material whatsoever after the said period and the Government will be entitled to dispose it of as it thinks proper. Even if full amount is paid for the material in question the Auction Purchaser will NOT be entitled to any refund on account of value of the said material.

22. Any moneys due to the Government on account of sale held under these conditions shall be deemed to be arrears of land revenue and may without prejudice to any other rights remedies and powers of Government be recovered by the Government as arrears of land revenue, in accordance with the provisions of the Maharashtra Land Revenue Code, 1966 as amended from time to time.

GENERAL :

23. The sales of all forest produce which are covered by the aforesaid conditions will also be subject to any other condition/s that may be prescribed from time to time by Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division (after prior approval of the concerned Conservator of Forests and the same will be notified on the notice board of the Divisional Forest Officer/ Sub-Divisional Forest Officer/Sub-Divisional Forest Officer of Independent Sub-Division 7 days before the date of sale and the same will also be binding on the bidders.

24. Notwithstanding anything contained in the aforesaid conditions, the Principal Chief Conservator of Forests/Chief Conservator of Forests (Production),/Chief Conservator of Forests (Conservation)/Additional Chief Conservator of Forests/Concerned Conservator of Forests may without assigning any reason with hold/ cancel any sale advertised, if it is so required in Government interest.

DISPUTES AND DIFFERENCES:

25. In the event of any dispute or difference whatsoever arising between the parties hereto as to the interpretation of the terms and conditions mentioned above or as to the rights duties and obligations of all the parties hereunder or as to any other matter whatsoever arising out of it or in relation thereto or concerning the sale, the decision thereon of the Conservator of Forests, _____ Circle shall be final and binding on all the parties concerned.

***

rmw/29/5/

इमारती लाकूड, कांळसा, बांबू, जळाऊ लाकूड, (आगारा मध्ये व मूळ जागी असलेले) यांच्या विक्रीबाबतच्या एकीकृत आगार विक्री शर्ती मध्ये सुधारणा बाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्र.एमएफपी-२०१२/प्र.क्र.०१/फ-१

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- १५ जानेवारी, २०२०

वाचा :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. टीएमआर १६८०/११७२४१/सीआर-९३७/फ-१, दिनांक २९.४.१९८६.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१६/प्र.क्र. ५३/२०१४ १५/नस्ती-३/टी.सी./जी- ८७/२०१७-१८,दिनांक ६.९.२०१७.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१६/प्र.क्र. ५३ ई-ऑक्शन/प्रक्र. ५३(२०१४-१५)/नस्ती ३/जी. ३८८/२०१८-१९, दिनांक १९ जून २०१८

शासन निर्णय :-

वन आगारामधील विक्रीचे काम पूरकीत होण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २९.४.१९८६ अन्वये इमारती लाकूड, कोळसा, बांबू, जळाऊ लाकूड, (आगारा मध्ये व मूळ जागी असलेले) यांच्या विक्रीबाबतच्या एकीकृत आगार विक्री अटी शर्ती विहीत करण्यात आलेल्या आहेत. दरम्यानच्या कालात दळणवळणाची अद्यावत सुविधा, उपलब्ध वाहतूकीची साधने, मुद्रांक शुल्काचा प्रदानाची व्यवस्था इत्यादी संदर्भात व्यापक बदल झालेले असून नव नविन तंत्रज्ञान विकसीत झालेले आहे. तसेच वस्तू व सेवा अधिनियम दिनांक १.७.२०१७ पासून लागू करण्यात आलेला आहे. त्यामुळे एकीकृत आगार विक्री अटी व शर्ती मध्ये सुधारणा करणे आवश्यक व अनिवार्य झालेले आहे. त्या करीता इमारती लाकूड, कोळसा, बांबू, जळाऊ लाकूड, (आगारा मध्ये व मूळ जागी असलेले) यांच्या विक्रीबाबतच्या एकीकृत आगार विक्री अटी व शर्ती खालील जोडण्या नुसार विहीत करण्यात येत आहेत.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४६७/व्यय-१०/२०१९, दिनांक १३.४.२०१९ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहपत्र:- जोडपत्र अ

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. व्यवस्थापकीय संचालक वनविकास महामंडळ, नागपूर.
५. अपर प्रधान वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. मुख्य वनसंरक्षक (सर्व प्रादेशिक)
७. सर्व प्रादेशिक / विभागीय व्यवस्थापक, वनविकास महामंडळ
८. सर्व उपवनसंरक्षक व विभागीय वन अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
९. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१०. वित्त विभाग, व्यय-१०/वित्तिय सुधारणा- १ कार्यासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. कार्यासन अधिकारी फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४००३२.
१२. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ (निवडनस्ती)

जोडपत्र "अ"

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : एमएफपी-२०१२/प्र.क्र.०१/फ-१.

दिनांक १५ जानेवारी, २०२० चे सहपत्र.

एकीकृत आगार विक्री शर्ती

इमारती लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा इत्यादींची (आगारांमध्ये व मूळ जागी असलेले) जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यासंबंधीच्या अटी शर्ती.

लिलावाची मुदत :-

उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी, हे महाराष्ट्र शासनासाठी व त्यांच्या वतीने, खाली दर्शविण्यात आलेल्या अनुसूचीमध्ये केलेल्या वर्णनानुसार थप्पीत असलेले इमारती लाकूड/जळाऊ लाकूड/कोळसा इत्यादींची जाहीर लिलावाद्वारे विक्री करतील. ही विक्री ..... येथे दिनांक .....२० ..... रोजी ..... वाजेपासून पुढील अटींवर व शर्तींवर करण्यात येईल.

विक्रीच्या अटी व शर्ती :-

१. बोली बोलणे म्हणजे विक्रीच्या या शर्तींना पूर्णपणे व अनिर्बंध संमती देणे असे मानण्यात येईल. इच्छुक बोलीदारांनी विक्रीच्या शर्तींवर त्यांची संमतीदर्शक सही करणे आवश्यक आहे.

२. लिलावात ठेवण्यात आलेल्या वनोपजाचे परिमाण व तपशील या बाबी खाली दर्शविलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असून त्या खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार बरोबर आहेत परंतु त्यांची कोणत्याही प्रमाणात हमी देण्यात येत नाही. इच्छुक बोलीदारांनी सदर थप्प्यांची जागेवरच तपासणी करून ते बरोबर असल्याबद्दल स्वत:ची खात्री करून घ्यावी.

इसाऱ्याची रक्कम :-

३.(अ) **ईच्छुक बोलीदारांनी बोली बोलण्यापूर्वी त्याची ज्या रकमेपर्यंतची बोली बोलण्याची इच्छा असेल त्या रकमेच्या १० टक्के रक्कम इसा-याची रक्कम म्हणून लिलावाच्या सुरुवातीला उल्लेखित रितीने जमा केल्याखेरीज त्या बोलीदाराला बोली बोलण्याची परवानगी देण्यात येणार नाही. परंतु अशा रितीने जमा करावयाची इसा-याची रक्कम ही कोणत्याही बाबतीत १००० रुपयापेक्षा (रुपये एक हजार फक्त) कमी असणार नाही.**

[illegible]

(भाग) ही रक्कम राहतील. **जमा केलेल्या इसाऱ्याच्या रकमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.**

३.(ब) इसाऱ्याची रक्कम खालील निर्दिष्टीत कोणत्याही प्रकारे भरता येईल.

(एक) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासकीय कोषागाराच्या यथोचित प्राप्तीपत्र चलनाद्वारे, किंवा

(दोन) भारतीय स्टेट बँकेने किंवा कोणत्याही अनुसूचित बँकेने उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उप विभागाचे उपविभागीय वन अधिकारी यांचे नावे ..... बँकेतील कोषागाराच्या/ उप कोषागाराच्या मुद्रांकाच्या टिपणी असलेल्या किंवा शासकीय काढलेल्या दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा दर्शनी निक्षपाद्वारे.

(टिप:- कोषागाराचे/उप कोषागाराचे नांव संबंधित उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी विहित करतील.) परंतु अपवादात्मक परिस्थितीमध्ये, विक्री करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार इसाऱ्याची रक्कम रोख स्वरुपात जमा करता येईल व असा अधिकारी तो रक्कम स्विकारण्यास परवानगी देऊ शकेल.

(क) यशस्वी बोली बोलण्यापूर्वी उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिकारी यांचेकडे किंवा त्याने या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्राप्तपोच कोषागार चलान, बँक धनाकर्ष किंवा दर्शनी निक्षेप पावती सादर करील. इसाऱ्याच्या रकमेपोटी रोख प्रदान करण्यास पूर्वोक्तप्रमाणे परवानगी दिलेली असेल तर ती प्रदाने (वरील शर्त क्र.३(ब) च्या परंतुकामध्ये नमुद केलेल्या शर्तीच्या अधीन राहून) लिलाव विक्रीच्या ठिकाणी ठेवलेल्या विशेष काऊंटरवर करण्यात येतील.

(ड) अयशस्वी बोलीदारांनी जमा केलेली इसाऱ्याची रक्कम लिलाव पूर्ण होण्या अगोदर सरकार जमा झालेली नसेल तर लिलाव पूर्ण झाल्यानंतर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, ती कोणतेही व्याज न देता परत करण्यात येईल.

(ई) यशस्वी बोलीदारांच्या बाबतीत, इसाऱ्याची रक्कम लिलाव पूर्ण होण्यापूर्वी सरकारजमा झालेली नसेल तर ती रक्कम बोलीदारांकडून प्रदेय असलेल्या मोबदल्याच्या रकमेसाठी समायोजित करण्यात येईल.

(फ) कोणत्याही बाबतीत इसाऱ्याच्या रकमेवर कोणतेही व्याज प्रदेय असणार नाही.

बोलीदाराचा तपशील :

४. इच्छुक बोलीदार, त्यांच्यासाठी असलेली कोणतीही पत्रे ज्या पत्त्यावर पाठवता येतील तो टपालाचा संपूर्ण लेखी पत्ता इसाऱ्याची रक्कम भरण्याच्या वेळी देतील. पत्त्यामध्ये झालेला कोणताही बदल बोलीदार तत्परतेने उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी यांस लेखी कळवतील. टपाल दाखला घेऊन त्या पत्त्यावर पाठविलेले कोणतेही पत्र इच्छुक बोलीदारांकडे यथोचितरित्या पोचले असल्याचे मानण्यात येईल.

५. लिलावाच्या वेळी बोली बोलण्याची इच्छा असलेली किंवा असलेल्या व्यक्ती कोणत्या नात्याने लिलावासाठी बोली बोलू इच्छिते/इच्छितात ते, ती किंवा त्या व्यक्ती नमूद करील/करतील, उदा.व्यवसाय संस्थेचा एकमेव मालक किंवा भागीदार म्हणून अथवा मर्यादित कंपनीचा सचिव/व्यवस्थापक/संचालक इत्यादी म्हणून व्यवसाय संस्थेच्या बाबतीत, सर्व भागीदारांची नांवे प्रकट करण्यात येतील व सर्व भागीदार किंवा लिलावाशी संबंधित सर्व बाबींमध्ये सर्व भागीदारांवर बंधन घालण्याचा प्राधिकार असलेला, रीतसर नेमलेला त्यांचा न्यायप्रतिनिधी हे या शर्तींवर सही करतील. "भागीदारी विलेखा" ची एक अनुप्रमाणित प्रत उपवनसंरक्षकांकडे/ विभागीय वन अधिकाऱ्यांकडे/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात यावी. मर्यादित कंपनीच्या बाबतीत, कंपनीने या सर्व शर्तींवर सही करण्यास प्राधिकृत केली व्यक्ती अशी सही करील, कंपनीचे संस्थापन समयलेख व नियमावली यांची एक प्रत या शर्तींना जोडण्यात येईल. हिंदु अविभक्त कुटुंबाच्या बाबतीत, कुटुंबातील व्यक्तींची नावे प्रकट करण्यात यावीत व कर्त्याने/कुटुंबावर बंधन घालण्यू शकणाऱ्या व्यक्तीने या शर्तींवर सही करावी व सही खाली आपला दर्जा दर्शवावा.

६. पुढील व्यक्ती लिलावाच्या वेळी बोली बोलण्यास पात्र असणार नाही/नाहीत, त्या व्यक्ती म्हणजे :- न्यायालयाने नैतिक अध:पात अंतर्भूत असलेल्या अपराधाबद्दल सिध्दापराध ठरलेली ती/त्या व्यक्ती किंवा नादार म्हणून न्यायनिर्णीत केलेली/केलेल्या किंवा शासनाची देणी देण्यायावत जिने करार फसवी असेल अशी व्यक्ती किंवा अज्ञान असलेली/असलेल्या व्यक्ती किंवा विकृत मनाची/मनाच्या व्यक्ती.

७. जी व्यक्ती/ज्या व्यक्ती लिलावात बोली बोलला असेल/बोलत्तेल्या असतील आणि जिची/ज्यांची बोली मान्य करण्यात आली असेल ती/त्या व्यक्ती या शर्तीनुसार बोली बोलण्यास अर्हताप्राप्त

व्यक्ती नाही/नाहीत असे लिलाव चालू असतांना किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी आढळुन आले तर तिने/त्यांनी जमा केलेली इसाऱ्याची रक्कम ताबडतोब सरकारजमा करण्यात येईल व तिची/त्यांच्या नावे मान्य करण्यात आलेली/आलेल्या बोली रद्द केली/केल्या जाण्यास पात्र ठरेल/ठरतील आणि त्या प्रसंगी ती/त्या व्यक्ती अशा बोली रद्द करण्याबद्दल कोणतीही भरपाई मिळण्यास हक्कदार असणार नाही / नाहीत.

विक्रीची कार्यपध्दती :-

८. उपवनसंरक्षकास/विभागीय वन अधिकाऱ्यास/स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिकाऱ्यांस त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार पुढील गोष्टी करता येतील :-

(अ) लिलावाच्या कोणत्याही टप्प्यामध्ये कोणालाही बोली बोलण्यास मनाई करणे.

(ब) सर्वाधिक किंवा कोणतीही बोली नाकारणे,

(क) सर्वाधिक किंवा कोणतीही बोली मान्य करणे,

(ड) खरेदीदार कोणतीही किंवा कोणत्याही थप्पी/थप्प्या खरेदी करण्यास तयार असेल व ती/त्या थप्पी/थप्प्या लिलावात मांडलेली/मांडलेल्या असेल/असतील तरी लिलावाच्या कोणत्याही टप्प्यामध्ये ती/त्या थप्पी/थप्प्या काढून घेणे किंवा त्यात बदल करणे.

(इ) थप्पीच्या यादीनुसार असलेला थप्पीचा (थप्प्यांचा) अनुक्रमांक विचारात न घेता कोणत्याही रितीने त्या थप्पींचा (थप्प्यांचा) लिलाव करणे.

(फ) एकेक थप्पी किंवा थप्प्यांचे गट विक्रीस काढणे,

(ग) विक्री नोटिशीमध्ये प्रसिध्द न केलेल्या जादा थप्पी लिलावात ठेवणे.

९. उपवनसंरक्षकास/विभागीय वन अधिकाऱ्यांस/स्वतंत्र उपविभागाच्या उप विभागीय वन अधिकाऱ्यास, आधीच्या बोलीवर बोलायची अशी किमान जादा रक्कम निश्चित करता येईल व अशी निश्चित केलेली रक्कम बोली चालू असतांना वेळोवेळी बदलता येईल. दिलेल्या बोली बद्दल कोणताही वाद निर्माण झाल्यास बोली ताबडतोब शेवटच्या निर्विवाद बोलीपासून पुन्हा सुरु करण्यात येईल.

१०.(अ) एखाद्या विशिष्ट थप्पीचा किंवा यथास्थिती थप्प्यांचा बोलीच्या अखेरीस त्या व्यक्तीची बोली (स्विकारण्यात आली असेल व) मान्य करण्यात आली असेल ती व्यक्ती (जिचा यात यापुढे "लिलाव खरेदीदार" असा उल्लेख केलेला आहे.) तिने ती बोली दिल्याचे दर्शक म्हणून (किमान दोन साक्षीदारांसह) बोली पत्रकावर सही करील व त्या व्यक्तीची सही किमान दोन साक्षीदार साक्षांकित करतील. ज्या बोली मान्य करणे उपवनसंरक्षकांच्या/विभागीय वन अधिकाऱ्यांच्या/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्यांच्या अधिकारात असते त्या बोली तो अधिकारी बोली पत्रकावर योग्य त्या ठिकाणी त्याची सही करुन मान्य करील. ज्या बोली मान्य करणे उपवनसंरक्षकांच्या / विभागीय वन अधिकाऱ्यांच्या / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्यांच्या अधिकाराबाहेर असेल आणि म्हणून त्या सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर करण्यासाठी राखुन ठेवण्यात आल्या असतील त्या बाबतीत तसे बोली परिपत्रकावर नमूद करण्यात येईल अशा प्रत्येक प्रकरणामध्ये सक्षम प्राधिकारी लिलावाच्या दिनांकापासुन तीस दिवसांच्या कालावधीत अंतिम आदेश देई पर्यंत बोलीदार त्यांच्या बोलीस बांधील राहील. तथापि, सक्षम प्राधिकाऱ्यास अशा बोली मान्य वा अमान्य करता येतील. किमान दोन साक्षीदारासह लिलाव खरेदीदाराने आणि उपवनसंरक्षकांने/विभागीय वन अधिकाऱ्यांने/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्याने किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने यथोचितरित्या सही केलेली बोली पत्रके संविदेचा निर्णायक पुरावा राहील.

१०.(ब) मुख्य वनसंरक्षकांच्या/ वनसंरक्षकांच्या मान्यतेसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या बोलीचा निकाल त्या मान्य झाल्यानंतर उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी, यांच्या कार्यालयाच्या किंवा संबंधित आगारातील सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल व उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी तो निकाल स्वतंत्रपणे देखील संबंधित यशस्वी बोलीदारांना कळविल.

११. बोली एकदा मान्य झाल्यानंतर इमारती लाकूड/संबंधित वनोपज/वनउत्पादन संपूर्णतया लिलाव खरेदीदाराच्या जोखीमेवर आगारात पडून राहील आणि आग, पूर, चोरी, अफरातफर इत्यादी सारख्या कोणत्याही कारणामुळे अशा थप्पी/थप्प्यामधील किंवा त्यांच्या कोणत्याही भागामधील इमारती लाकूड किंवा संबंधित वनोपज/वन उत्पादन खराब झाल्यास आणि/किंवा त्याची हानी झाल्यास त्याबद्दल शासन जबाबदार असणार नाही.

प्रदाने :

१२. लिलाव खरेदीदार त्याच्या मान्य झालेल्या बोलीच्या रकमेचे (यात यापूढे जिचा "विक्री मुल्य" असा उल्लेख केला आहे.) प्रदान पुढील प्रमाणे करील :-

१२ (अ) यथास्थिती, लिलावाच्या दिनांकापासून किंवा प्राधिकाऱ्याने बोली मान्य केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत विक्री मुल्याची १/४ रक्कम **वस्तू व सेवा कर अधिनीयम २०१७ नूसार GST च्या संपूर्ण रक्कमेसह आणि आयकर अधिनीयम १९६१ नूसार टॅक्स कलेक्टेड ॲट सोर्स (TCS) च्या रक्कमेसह** प्रमाणनुसारी रक्कम भरावी लागेल. तथापि, लिलाव खरेदीदाराने विक्री मुल्याची उक्त १/४ रक्कम **वस्तू व सेवा कर कायदा २०१७ नूसार GST च्या संपूर्ण रक्कमेसह आणि आयकर अधिनीयम १९६१ नूसार टॅक्स कलेक्टेड ॲट सोर्स (TCS) च्या रक्कमेसह त्यानंतर कोणत्याही वेळी परंतु २३ दिवसापुर्वी भरली तर त्यासोबत त्याला विलंबीत प्रदानाबद्दल दरसाल १८ टक्के दराने व्याज GST च्या रक्कमेसह** द्यावे लागेल.

१२ (ब) यथास्थिती लिलावाच्या दिनांकापासून किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने बोली मान्य केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसाच्या आत उर्वरीत ३/४ विक्री मुल्य आणि इतर सर्व कर पट्ट्या व शुल्के यांची संपूर्ण रक्कम भरावी लागेल. तथापि, लिलाव खरेदीदाराने, विक्री मुल्याची उक्त ३/४ रक्कम व इतर सर्व कर, पट्ट्या व शुल्के ही त्यानंतर कोणत्याही वेळी परंतु आणखी ३० दिवसापुर्वी भरली तर त्यासोबत त्याला विलंबीत प्रदानाबद्दल दरसाल दरशेकडा १८ टक्के या दराने व्याज द्यावे लागेल.

१३ (अ) वरील शर्त १२ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे विक्री मुल्याचो १/४ रक्कम आणि/ किंवा विक्री मुल्याची ३/४ रक्कम अधिक **वस्तू व सेवा कर अधिनीयम २०१७ नूसार GST च्या संपूर्ण रक्कमेसह आणि आयकर अधिनीयम १९६१ नूसार टॅक्स कलेक्टेड ॲट सोर्स (TCS) च्या रक्कमेसह,** इतर सर्व पट्ट्या, व शुल्के त्या रकमेवरील व्याजाविना किंवा व्याजासह अथवा त्या रकमेचा कोणताही भाग भरण्यात लिलाव खरेदीदार कसूर किंवा हयगय करील त्या प्रसंगी अथवा लिलाव खरेदीदार या अटी शर्ती पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग करील त्या प्रसंगी उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी शासनाचे इतर कोणतेही अधिकार, उपाय योजना व शक्ती यांना बाध न येता, अशी मान्य केलेली विक्री रद्द करील आणि त्यानंतर लिलाव खरेदीदारानी जमा केलेली इसाऱ्याची रक्कम आणि त्याने विक्री मुल्याची १/४ रक्कम, व्याज व ती सर्व रक्कम

शासनाचे इतर कोणतेही अधिकार, उपाययोजना व शक्ती यांना बाध न येता शासन तावडतोब जप्त करील. अशी विक्री रद्द झाल्यानंतर उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी त्यास योग्य वाटल्यास स्वेच्छा निर्णयाद्वारे तावडतोब आणि ज्या थप्पी/थप्प्यासाठी लिलाव खरेदीदाराची बोली मान्य करण्यात व पूर्वोक्तप्रमाणे रद्द करण्यात आली होती त्या थप्पीची/ थप्प्यांची आणखी कोणतीही नोटीस न देता लिलाव खरेदीदाराच्या खर्चाने आणि त्याच्या जोखीमेवर जाहीर लिलाव करुन किंवा खाजगी संविदेद्वारे पुन्हा विक्री करील.

तथापि, लिलाव खरेदीदाराच्या जोखीमेवर व त्याच्या खर्चाने सदर वनोपजाची प्रत्यक्ष विक्री होण्यापुर्वी लिलाव खरेदीदाराने पूर्वोक्त व्याज, **GST आणि TCS** च्या रक्कमेसह व इतर सर्व कर, पट्ट्या व शुल्के आणि त्याने देऊ केलेल्या मुल्याच्या १० टक्के या दराने दंड यासह संपूर्ण विक्री मुल्य किंवा यथास्थिती विक्रीमुल्याची ३/४ रक्कम (न भरलेली रक्कम) भरली व तसे उपवनसंरक्षकांस/विभागीय वन अधिकाऱ्यास / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्यास कळविले तर, उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी सदर विक्री न करता आणि लिलाव खरेदीदाराला, यानंतर या अटी शर्तीच्या खंड १४ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार त्याला विकलेले वनोपज हलविण्याची परवानगी देईल.

१३ (ब) फेरविक्री करण्यात येईल त्या प्रसंगी अशा फेरविक्रीमुळे शासनाला कोणताही तोटा सोसावा लागल्यास अशा तोट्याची रक्कम शासनाला देण्यास लिलाव खरेदीदार जबाबदार राहील, मात्र अशा विक्रीच्या परिणामी होणाऱ्या कोणत्याही नफ्यास तो हक्कदार असणार नाही. उपवनसंरक्षकाने / विभागीय वन अधिकाऱ्याने / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्याने मागणी केल्यावर लिलाव खरेदीदार तावडतोब अशा तोट्याची रक्कम शासनाला देईल. अशा तोट्याची रक्कम जमीन महसूलाची थकबाकी असल्याचे मानण्यात येईल आणि शासनाचे इतर कोणतेही अधिकार, उपाय आणि शक्ती यांना बाध न येता ती रक्कम जमिन महसूलाची थकबाकी म्हणून लिलाव खरेदीदाराकडून वसूल करण्यास शासन हक्कदार असेल.

१४. मोबदल्याची रक्कम महाराष्ट्र शासनाच्या कोषागारात भरण्यात येईल. लिलाव खरेदीदार किंवा या अटी शर्तीमधील खंड १३ अन्वयेच्या फेरविक्रीनंतरचा खरेदीदार मोबदल्याची रक्कम भरण्यासाठी उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडून आवश्यक ते चलान मिळविल. मोबदल्याचे प्रदान केल्याच्या पुराव्यादाखल प्राप्त पोच चलान उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी/आगार अधिकारी यांचेकडे सादर करण्यात येईल. उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी यांचे नांवे ** ..... भारतीय स्टेट बँक किंवा अन्य कोणत्याही अनुसूचीत बँकेच्या / कोषागारातल्या / उपकोषागाराच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या शाखेवर काढलेल्या दर्शनी धनाकर्षाद्वारे देखील विक्री मुल्य देता येईल.

****टीप** :- कोषागाराच्या/उपकोषागाराच्या मुख्यालयाचे नांव संबंधित उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी विहित करतील.

वनोपजाचा बटवडा :-

१५. या शर्तीमधील शर्त १२ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे विक्री मुल्य, **जीएसटी व टिसीएस च्या संपूर्ण रक्कमेसह** आणि इतर कर, पट्टया व शुल्के आणि कोणतेही व्याज असल्यास ते व्याज यांचे संपूर्ण प्रदान केल्यानंतर यथास्थिती, लिलावाच्या दिनांकापासून किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने लिलाव मंजूर झाल्याचे दिनांकापासून **७५** दिवसाच्या आत ते वनोपज हलविल. यथास्थिती लिलाव खरेदीदार किंवा फेर विक्री नंतरचा खरेदीदार वनोपज भरण्यासाठी व हलविण्यासाठी स्वत:ची व्यवस्था करील. तथापि, यथास्थिती लिलाव खरेदीदाराने किंवा फेरविक्रीनंतरच्या खरेदीदाराने **७५ दिवसाच्या** उक्त कालावधीत पूर्वोक्तप्रमाणे वनोपज हलविण्यात कसूर किंवा हयगय केली तर त्यानंतर उपवनसंरक्षकाची/विभागीय वन अधिकाऱ्यांची/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्यांची लेखी पूर्व परवानगी मिळविल्याखेरीज सदर वनोपज हलविण्यास यथास्थिती लिलाव खरेदीदार किंवा फेरविक्रीनंतरचा खरेदीदार हक्कदार असणार नाही. यथास्थिती लिलाव खरेदीदाराला किंवा फेरविक्रीनंतरच्या खरेदीदाराला उक्त ७५ दिवसांचा कालावधी समाप्त होण्याच्या एक आठवडा अगोदर अशा परवानगीसाठी अर्ज करता येईल. यथास्थिती लिलाव खरेदीदार किंवा फेरविक्रीनंतरचा खरेदीदार, अशा परवानगी मध्ये विनिर्दिष्ट केलेला दिनांक उलटून जाण्यापुर्वी, अशा संपूर्ण अधिक कालावधीसाठी खाली दिलेल्या दराने परिगणना केलेले जमीन भाडे भरल्यानंतर उक्त वनोपज हलविल.

अ.क्र.	बाब	जमीन भाड्याचा दर

परंतु आणखी असे की, यथास्थिती, लिलाव खरेदीदाराने किंवा फेरविक्री नंतरच्या खरेदीदाराने, अशा परवानगीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकापूर्वी उक्त वनोपज हलविण्यात कसूर किंवा हयगय केली तर त्यानंतर, मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षकाची लेखी पूर्व परवानगी मिळविल्या खेरीज उक्त वनोपज मिळवण्यात हक्कदार असणार नाही. मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक त्यांच्या संपूर्ण स्वेच्छा निर्णयानुसार अशी परवानगी नाकारु शकेल किंवा शिक्षार्थ जमीन भाडे म्हणून अशा वनोपजाच्या मुल्याच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही इतकी जादा रक्कम भरण्यांच्या शर्तीसह, त्यांस योग्य वाटतील अशा शर्तीवर अशी परवानगी देऊ शकेल. **मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षकाचा निर्णय** अंतिम व यथास्थिती, लिलाव खरेदीदार आणि फेरविक्रीनंतरचा खरेदीदार यांच्यावर बंधनकारक राहील.

१६. विक्री, पावसाळ्याच्या सुरुवातीला करण्यात आली आणि लिलाव खरेदीदाराने वनोपज हलविण्याची मुदत विविध कारणांमुळे वाढवून मिळण्याची शासनाला विनंती केली तर उपवनसंरक्षकाकडून / विभागीय वन अधिकाऱ्यांकडून / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्यांकडून ठरविण्यात येईल असा पावसाळ्याचा कालावधी वाढीव मुदतीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ वगळता येईल.

१७. एखाद्या थप्पीच्या संबंधात संपूर्ण रक्कम प्रदान करण्यात आलेली नसेल आणि आगाराच्या वनक्षेत्रपालाने, रितसर प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने वाहून नेण्यासाठी लागणारा वाहतूक परवाना दिलेला नसेल तर ती थप्पी किंवा तिचा कोणताही भाग हलविण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

१८. वनोपज हलविण्याचे काम सूर्यप्रकाश असेपर्यंत मर्यादित राहील आणि ते आगाराच्या मुद्दाम राखून ठेवलेल्या फाटकातून बाहेर नेण्यास परवानगी असेल. इमारती लाकूड किंवा संबंधित

वनोपज तपासणीसाठी या फाटकाजवळ हजर करण्यात येईल आणि इमारती लाकडावर हातोड्याने " निर्गमित" चिन्ह उमटवण्यात येईल.

१९. लिलाव खरेदीदाराने किंवा त्याच्या प्राधिकृत एजंटाने एकदा इमारती लाकडाचा किंवा संबंधित वनोपजाचा ताबा घेतला आणि वनोपज मिळाल्याचे दर्शक म्हणून त्याची सही घेण्यात आली की, वनोपज स्वाधीन करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

शर्तीचा भंग झाल्याबद्दल करावयाची कार्यवाही :

२०. फेरविक्रीची शर्त असली तरी लिलाव खरेदीदार हा त्याने त्याची दायित्वे पार न पाडल्यामुळे शासनाला सोसावा लागलेला तोटा भरुन देण्यास जबाबदार राहील.

उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी तोट्याची रक्कम पुढील पध्दतीने निश्चित करील :-

(अ) खरेदीदार यांचेकडून येणे असलेली रक्कम -- "क्ष"(म्हणजेच विक्री + जीएसटी)

(ब) वनोपजाच्या फेरविक्री नंतर कोणतीही रक्कम वसूल झालेली असल्यास, ती रक्कम -- "य"

(क) लिलाव खरेदीदाराने इसाऱ्याची रक्कम म्हणून/प्रतिभूती ठेवी म्हणून/मोबदल्यापोटी आगाऊ रक्कम म्हणून दिलेली रक्कम -- "ज"

अशा रितीने तोट्याची रक्कम पुढील प्रमाणे राहील :- "क्ष" — ("य"+"ज")

तोट्याची रक्कम ही जमीन महसूलाची थकबाकी असल्याचे मानण्यात येईल आणि शासनाचे कोणतेही इतर अधिकार, उपाय व शक्ती यांना बाध न येता ती भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या तरतुदीनुसार जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

२१. लिलाव खरेदीदाराने वनोपज हलविण्यासाठी, यथास्थिती लिलावाच्या दिनांकापासून किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने बोली मान्य केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासून ७५ दिवसाच्या कालावधीनंतरचा कालावधी वाढवून घेतलेला नसेल तर यथास्थित ७५दिवसाचा किंवा असा वाढवलेला/ले कालावधी समाप्त झाल्यानंतर वनोपजाची मालकी परत शासनाकडे येईल. उक्त कालावधीनंतर, उरलेल्या कोणत्याही वनोपजावर लिलाव खरेदीदाराचा कोणताही अधिकार असणार नाही आणि शासन, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे ते वनोपज निकालात काढण्यास हक्कदार असेल. प्रस्तुत वनोपजाची संपूर्ण रक्कम चुकती करण्यात आलेली असली तरी लिलाव खरेदीदार उक्त वनोपजाच्या मुल्यादाखल कोणताही परतावा मिळण्यास हक्कदार असणार नाही.

२२. या शर्तीवर करण्यात आलेल्या विक्रीमुळे शासनाला देय असलेला कोणताही पैसा जमीन महसूलाची थकबाकी असल्याचे मानण्यात येईल आणि तो पैसा शासनास, शासनाचे इतर कोणतेही अधिकारी, उपाय व शक्ती यांस बाध न येता, वेळोवेळी सुधारणा केलेला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

सर्वसाधारण :-

२३. पूर्वोक्त शर्ती लागू असतील अशा, सर्व वनोपजाच्या विक्री या, उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / उपविभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी (संबंधित वनसंरक्षकाची पूर्व मान्यता घेऊन) वेळोवेळी विहीत करील अशा कोणत्याही इतर शर्तींनाही अधिन असतील आणि या शर्ती विक्रीच्या दिनांकाच्या सात दिवस अगोदर उपवनसंरक्षकाच्या / विभागीय वन अधिकाऱ्यांच्या / उपविभागीय वन अधिकाऱ्यांच्या / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकाऱ्यांच्या सूचना फलकावर अधिसुचित करण्यात येतील व त्या बोलीदारावर देखील बंधनकारक असतील.

२४. पूर्वोक्त शर्तीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जाहिरात केलेली कोणतीही विक्री शासनाच्या हिताच्या दृष्टीने थांबवून ठेवणे किंवा रद्द करणे आवश्यक असेल तर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख)/प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) संबंधित मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक यांस कोणतेही कारण न देता अशी विक्री थांबवून ठेवता किंवा रद्द करता येईल.

विवाद आणि मतभेद :-

२५. वर नमूद केलेल्या अटी शर्तींचा अर्थ लावणे किंवा या अटी शर्तींशी संबंधित असलेल्या सर्व व्यक्तींचे अधिकार, कर्तव्ये व दायित्वे किंवा त्यामधुन उद्भवणारी वा त्याच्या संबंधातील किंवा विक्रीशी संबंधित इतर कोणतीही बाब याबद्दल संबंधित व्यक्तीमध्ये कोणताही विवाद किंवा मतभेद निर्माण झाल्यास त्या प्रसंगी, मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक) वनवृत्त यांचा त्यावरील निर्णय अंतिम व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.

****

ANNEXURE 19.06

3) Pmk/A/c 31/7/ echy/

वंगल कामगार सहकारी संस्थांना झुलतोड्यांची कामे देण्याच्या पध्दती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. एफएलसी १०९२/प्र.क्र. ९९/फ-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २० नोव्हेंबर, १९९३

वाचा:- १. कृषि व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलसी १०५८/१११२३/ई [दोन], दिनांक ३ डिसेंबर, १९५९.

२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलसी १०६७/२०७२५/एफ दिनांक २६.१२.१९७०

३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलसी १४६९/८२४८/वाय दिनांक २९.३.१९७१.

४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलसी १०८७/प्र.क्र.४९१/फ-९, दिनांक २० मार्च, १९८७.

५. महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. एफएलसी १०८७/प्र.क्र.४९१/फ-९ दिनांक २ एप्रिल, १९८७.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्यात वनक्षेत्रामध्ये कार्य आखणीप्रमाणे काम करीत असताना जे कूपस तोडण्यासाठी घेतले जातात त्यामधील वरेचसे कूप वंगल कामगार सहकारी संस्थांना दिले जातात. या संस्थांना कूप तोडीची कामे देण्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा करण्यासाठी शासन निर्णय क्र. एफएलसी १०८७/प्र.क्र. ४९१/फ-९, दिनांक २० मार्च १९८७ आणि शासन शुध्दिपत्रक क्र. एफएलसी १०८७/प्र.क्र.४९१/फ-९, दिनांक २ एप्रिल १९८७ अन्वये सहकारी संस्थांना फक्त लॉटिंग सूत्र पध्दतीप्रमाणे कूप तोडीची कामे देण्याची पध्दती निश्चित करण्यात आली होती. सदर आदेशास वंगल कामगार सहकारी संस्थांनी विरोध दर्शवून आधीच्याच पध्दतीप्रमाणे कूप तोडीची कामे देण्यात यावी यासाठी वारंवार शासनाकडे निवेदने सादर केली होती. अशा प्रकारे लॉटिंग सूत्र पध्दती प्रमाणे कूप तोडीची कामे करण्यासाठी वंगल कामगार सहकारी संस्थाकडून मुळीच प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून सहकारी संस्थांची बाजू विचारात घेऊन कूप तोडीची कामे देण्याच्या पध्दती निश्चित करण्याबाबत मध्यंतरीच्या काळात

प्रत्येक वर्षी आदेश निर्गमित करून कूपतोडीची कामे "अ व "ब" ऑडिट वर्ग मिळालेल्या जंगल कामगार सहकारी संस्थांना सुधारित सूत्र पध्दतीने आणि "क" व "ड" ऑडिट वर्ग मिळालेल्या जंगल कामगार सहकारी संस्थांना लार्गेस्ट सूत्र पध्दतीने कूप तोडीची कामे देण्यात येत होती. दरवर्षी आदेश काढून कूपतोडीची कामे देण्याच्या पध्दती ठरविण्यापेक्षा त्यासाठी प्रोत्साहनात्मक निर्णय घेऊन जंगल कामगार सहकारी संस्थांना कूप तोडीची कामे देण्याच्या पध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

आता जंगल कामगार सहकारी संस्थांना कूप तोडीची कामे देण्याबाबत [१] सुधारित सूत्र पध्दती व [२] लार्गेस्ट सूत्र पध्दती अशा दोन्ही पध्दती चालू ठेवण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे:-

१] "अ" व "ब" ऑडिट वर्ग मिळालेल्या संस्थांना सध्या प्रचलित असलेल्या सुधारित सूत्र पध्दतीप्रमाणे कूप तोडीची कामे देण्यात यावीत.

२] "क" व "ड" ऑडिट वर्ग मिळालेल्या जंगल कामगार सहकारी संस्थांना कूप तोडीची कामे प्रचलित लार्गेस्ट सूत्र पध्दतीच्या ऐवजी आदेशानुसार खालील सुधारणा विचारात घेऊन देण्यात यावीत.

अ] जंगल कामगार सहकारी संस्थांच्या सभासदांनी पूर्वात केलेल्या कामाच्या प्रतिदिनाच्या मजुरीची जी रक्कम असेल त्या रकमेच्या ३५% एवढी रक्कम संस्थेस अनुदान म्हणून देण्यात यावी.

ब] ज्या संस्थेने कूपाचे काम कार्यक्षमपणे केले, अशा संस्थेला प्रोत्साहनात्मक अनुदान म्हणून सभासदांनी केलेल्या कामाच्या प्रतिदिनाची जी मजुरी असेल त्या रकमेच्या २०% एवढी जादा रक्कम सभासदांच्या कल्याणकारी कामासाठी देण्यात यावी. त्यासाठी संस्थेने खालील अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

[एक] कूपाच्या कामावरदल दिलेल्या वेळापत्रकाचे पालन करून कूपाचे काम वेळेवर केली पाहिजेत.

[दोन] कूप कामाबाबत ज्या नोंदवहया ठेवावयाच्या आहेत त्या वेळेवर व योग्यपणे भरलेल्या पाहिजेत.

[तीन] कूपतोडीची कामे काटकसरीने केलेली असावीत व प्रकाष्ठ निष्कासनाचे काम शास्त्रशुध्द पध्दतीने केलेले असावे व चिरी योग्य माल कूपात राहता कामा नये.

[चार] सहकारी संस्थेच्या सभासदांसाठी करावयाची कल्याणकारी कामे संस्थेच्या मजुरांसाठीच केलेली असावीत.

[क] संस्थेला देण्यात आलेल्या कामाबाबत करारपत्र न करता संस्थेला फक्त कामाबाबत वर्क ऑर्डर देण्यात यावी

इ] सहकारी संस्थेने कापात केलेल्या कामातून निघालेले वनोपज एकत्र जमा करून शासनाच्या आगारामध्ये रचून ठेवावे. अशा वनोपजाची विक्री शासकीय आगारातच संबंधित उप वनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी यांच्यामार्फत करावी.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिकतेने प्राप्त झाला असून त्यास वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ प्राप्त झाले आहेत. ८ १८/९३/व्यय १० दिनांक १७ नोव्हेंबर १९९३ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गो.डो.तायडे

[गो. डो. तायडे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, ६- ए नवाब ले आउट टिळक नगर नागपूर ४४० ०१०,
मुख्य वनसंरक्षक [उत्पादन], महाराष्ट्र राज्य, नागपूर.
मुख्य वनसंरक्षक [संधारण], महाराष्ट्र राज्य, नागपूर,
सर्व वनसंरक्षक,
सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ,
सर्व विभागीय वन अधिकारी,
सर्व विभागीय व उप विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ,
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे
विशेष वन अधिकारी, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
कृषि व सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर
खाजगी सचिव श्री [वने]
खाजगी सचिव राज्यमंत्री [वने]
खाजगी सचिव श्री [आदिवासी विकास विभाग]
खाजगी सचिव श्री [सहकार]
सर्व कार्यासन अधिकारी, वन विभाग, मंत्रालय मुंबई

ANNEXURE 19.07

जंगल कामगार सहकारी संस्थांना कुपतोडीची कामे देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांकः एफएलसी 1093/प्र.क्र.260/फ-9,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 24 डिसेंबर, 1993.

संदर्भ :- 1) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांकः एफएलसी 1087/प्र.क्र.491/फ-9, दिनांक 10 फेब्रुवारी, 1987.

2) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः एफएलसी 1092/प्र.क्र.99/भाग-2/फ-9, दिनांक 8 एप्रिल, 1993.

3) मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांकः कक्ष-11/जंकास/प्र.क्र.98/(93-94)/374/सन 1993-94, दिनांक 10 नोव्हेंबर, 1993.

4) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः एफएलसी 1092/प्र.क्र.99/फ-9, दिनांक 20 नोव्हेंबर, 1993.

5) मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांकः कक्ष-11/जंकास/प्र.क्र.98/93-94/409/1993-94, दिनांक 26 नोव्हेंबर, 1993.

प रि प त्र क

जंगल कामगार सहकारी संस्थांना कुपतोडीची कामे देण्याबाबत (1) सुधारीत सुत्र पध्दती व (2) लॉगिंग सुत्र पध्दती सन 1992-93 पासूनच्या कुप वाटप पासून प्रचलित पध्दतीप्रमाणेच लागू करण्यात आलेल्या आहेत. त्याबाबत शासन निर्णय, क्रमांक एफएलसी 1092/प्र.क्र.99/फ-9, दिनांक 20 नोव्हेंबर, 1993 अन्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार "अ" किंवा "ब" ऑडीट वर्ग प्राप्त झालेल्या संस्थांना सुधारीत सुत्र पध्दती प्रमाणे आणि "क" किंवा "ड" ऑडीट वर्ग प्राप्त झालेल्या संस्थांना लॉगिंग सुत्र पध्दती प्रमाणे कुप वाटप करावयाचे आहे.

2. वनीकरणाची कामे रोजगार हमी योजनेखाली संस्थांना देवून ती विभागामार्फत करुन घ्यावी लागतात. तसेच काही संस्थांना 75 हेक्टरवर वनीकरणाची कामे देणे/करणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना कुप तोडीच्या कामापासून वंचित व्हावे लागते व वनीकरणाचे कामाची कुपतोडीच्या कामाशी सांगड घातल्याने अडचणी निर्माण होतात. म्हणून कुपतोडीची कामे देण्यासंदर्भात वरीलप्रमाणे अट शिथील करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता जंगल कामगार सहकारी संस्थांना कुपाचे वाटप करण्याचा खालील सूत्रांचा विचारात घेण्यांत यावयात.

(1) ज्या जंगल कामगार सहकारी संस्थांनी कुप वाटपाच्या अलीकडच्या वर्षात वनीकरणाचे कामात सहभागी होऊन वास्तविक वनक्षेत्रात वन विभागाने उपलब्ध करुन दिलेले आहेत, त्या संस्थांना प्राधान्याने कुप वाटप करावे. प्रत्येक जंगल कामगार सहकारी संस्थांनी 100 हेक्टर क्षेत्रावर वनीकरण करावे असे मार्गदर्शक तत्व आहे. भविष्यात येत असून संस्थांनी वनीकरणाचे कामात जास्तीत जास्त सहभागी व्हावे अशी अपेक्षा आहे. तथापि वनीकरणाचे कामात संस्थांनी सहभाग घेतला नाही किंवा कमी प्रमाणात वनीकरणाचे काम केले असेल तर कुप वाटप करण्यासाठी वनीकरणाच्या कामाचे बंधन असू नये.

(2) थकबाकी असलेल्या संस्थांना कुपाचे वाटप करण्यात येणार नाही ही बाब संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(कृ.मा.प.)

3. उपरोक्त सूचना विचारात घेऊन कृपाचे आदेश दिनांक 20 नोव्हेंबर, 1993 च्या शासन निर्णयान्वये करण्यात आले.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गो. डो. तायडे,
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रत,

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, 6-अे, नवाब से आऊट, टिळक नगर,नागपूर-440 010,
मुख्य वनसंरक्षक (उत्पादन), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
सर्व वनसंरक्षक,
सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ,
सर्व विभागीय वन अधिकारी,
सर्व विभागीय व उप विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
कृषि व सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032,
विशेष वन अधिकारी, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
उपायुक्त(कल्याण), सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032,
उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल-2, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
सचिव, राज्य मंत्री(वने),
सचिव, राज्यमंत्री(वने),
सचिव, मंत्री (आदिवासी विकास विभाग),
सचिव, मंत्री (सहकार),
सर्व कार्यासन अधिकारी, वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, कक्ष-9, कार्यासन, महसूल व वन विभाग.

ANNEXURE 19.08

NO.FLS/D-II/Regn./of 1986
Office of the
Commissioner for Co-operation and
Registrar,Co-operative Societies,
Maharashtra State
Pune-1 the 23rd September 1986

C I R C U L A R :-

It has come to the notice of undersigned that some of the District Deputy Registrars/Registering Authority have registered the Forest Labourers Co-operative Societies without obtaining 'No Objection' Certificate from the Forest Department regarding availiability of felling series which are to be given as area of operation to the Societies. This is absolutely irregular on the part of registering authority. They should therefore bear in mind that 'No objection' Certificate from Forest Department is must for a registering Forest Labourers Co-operative Societies.

You should also ensure that in future Forest Labourers Co-operative Societies do not alter or add any felling series to the existing area of operation of the societies without obtaining certificate regarding availability of felling series from the Forest Department.

O.C. approved by Addl. Regr.

For Additional Registrar(ADM)
Co-operative Societies,
Maharashtra State,Pune-1

Copies to:-

1) All District Deputy Registrar,Co-operative Societies
2) All Divisional Joint Registrar,Co-operative Societies
3) All Assistant Registrar,Co-operative Societies.

Copy forwarded to the Chief Conservator of Forests,Maharashtra State,Pune with reference to his letter No.D11/F.L.C.S./226 dated 29th August 1986 for information.

ANNEXURE 19.09

विषय :- नविन निर्माण होणा-या जंगल कामगार सहकारी संस्थाना ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.

शासन :

क्रमाक-कक्ष/११/जंकास/ ३२० सन १९८५-८६
पुणे-क्र० ४ दिनाक- २८ ऑगष्ट १९८५

सन १९८५-८६ च्या जंगल कामगार सहकारी संस्थाच्या हंगामाच्या सुरुवातीच्या वेळी असे नजरेस आले की काही नविन संस्थाना विभागीय वन अधिकारी, यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. या संस्था कार्यान्वित होऊन १-२ वर्ष झाली नाहीत तोच संस्थाना देण्यात आलेल्या कार्यक्षेत्रात कामाचे झाड उपलब्ध नसल्याचे काही संस्थाचे बाबतीत नजरेस आले. अशा संस्थांनी कार्यक्षेत्राबाहेरील झाडांची मागणी केलेली आहे. याचा अर्थ असा की संस्था पंजीबध्द होण्यासाठी पातनक्षेत्री उपलब्ध असल्याबाबत जे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले ते सर्वांगीण विचार करुन देण्यात आलेले नव्हते; असे खेदाने नमुद करावे लागते.

२. जंगल कामगार सहकारी संस्थाच्या कामाचा विचार करता असे प्रर्कषाने नजरेस आले आहे की, काही अस्तित्वात असलेल्या जून्या संस्थाना कामासाठी झाड उपलब्ध होत नाहीत, यामुळे संस्था दुस-या संस्थेच्या कार्यक्षेत्रातील किंवा खात्यामार्फत काम करण्यासाठी राखून ठेवलेल्या झाडांची मागणी करतात. संस्थेस पुरेसे काम नाही म्हणून वारंवार तक्रारी केल्या जातात. काम नसल्यामुळे काही संस्था बंद पडण्याचा मार्गावर आहेत. केल्या काही वर्षांपासून अशी परिस्थिती उद्भवली आहे याची जाणीव असूनसुध्दा नविन संस्थाना ना हरकत प्रमाणात्र देण्याची प्रकरणे घडत आहेत. हे योग्य नाही.

३. कोणत्याही नविन जंगल कामगार सहकारी संस्थाना ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी ही संस्था आर्थिक दृष्टया सातत्याने कार्यशील राहू शकेल अशी पातनक्षेत्री संस्थेस कार्यक्षेत्र उपलब्ध आहे किंवा नाही याची चिकित्सक पाहणी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या पातनक्षेत्री खात्यामार्फत काम करण्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या आहेत त्याच्यावर अतिक्रमण होत नाही याचीही खात्री करणे आवश्यक आहे.

४. याबाबतीने वनसंरक्षक, प्रादेशिक [सर्व] यांना कळविण्यात येते की, यापुढे मुख्य वनसंरक्षक, [उत्पादन] यांची अनुमती घेतल्याशिवाय विभागीय वन अधिकारी यांनी अथवा वनसंरक्षकांनी ना हरकत प्रमाणपत्र कोणत्याही संस्थेस देऊ नये.

[व० के० प्रभु]
मुख्य वनसंरक्षक, [उत्पादन]
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,
वनसंरक्षक प्रादेशिक [सर्व].

ANNEXURE 19.10

जंगल कामगार सहकारी संस्थांना वेगवेगळ्या विभागांतील कामांमध्ये काम देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्र. : एफएलसी १०८७/प्र.क्र. ४९१/फ-९,
मंत्रालय मुंबई-४०० ०३२,
दिनांक १० फेब्रुवारी, १९८७.

वाचा :- शासन निर्णय क्र. एफएलसी १०७८/१९६१९४/फ-९,
दिनांक २३ ऑगस्ट, १९८५.

परिपत्रक :-

जंगल कामगार सहकारी संस्थांना वेगवेगळ्या कामांमध्ये विभागांतील कामांमध्ये काम देण्याबाबत त्यांच्यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. :-

१) जंगल कामगार सहकारी सोसायटी या शासकीय कामाच्या ज्या जंगल कामगार सहकारी सोसायट्या काम करतात त्यांना यापुढे "प्रकल्पीय सहकारी संस्था" म्हणून संबोधावे. अशा प्रकल्पीय सहकारी संस्थांना कोणत्या विभागामार्फत काही विशिष्ट संस्था त्या सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र, सभासद संख्या, आर्थिक परिस्थिती, यांचा सखोल विचार करण्यात यावा. अशा संस्था तसेच वेगवेगळ्या विभागांतील ज्या कामांसाठी अशा संस्थांच्या कार्यक्षेत्रामध्ये गरजेप्रमाणे कामे उपलब्ध करता येतील याची खात्री करून घ्यावी.

२) या कामांमध्ये जितके रोजगार निर्माण होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे व जितकी रोजगार निर्मितीची कामे करण्यासाठी संबंधित संस्थेकडे आहे याची खात्री करून घ्यावी.

३) " ज्या क्षेत्रामध्ये एक मजूर सहकारी संस्था कामे करण्यास उपलब्ध असतील किंवा ती काम करण्यास पात्र असतील त्यांच्या मार्फतच कामे सामान्यतः वेगवेगळ्या विभागामार्फत करून घेण्यात येतो. तथापि, विभागप्रमुखांना काम करून घेण्याची निर्णयाधारी त्यांच्या क्षेत्रामध्ये ज्या विशिष्ट आदिवासी सहकारी संस्था काम करित असतील व त्या संस्था जर कुठलेही काम करण्यास सक्षम असतील अशा आदिवासी सहकारी संस्थांना कुठले काम देण्यात यावे, जेथे एक किंवा दोन्ही उपलब्ध असतील तर तेथे एक किंवा दोन्ही सहकारी संस्थांना कुठले काम करण्यात यावे व तेथे या तीनही संस्थांमार्फत काम करण्यासाठी संबंधित संस्था तेथे विभागामार्फत काम करण्यात यावे."

४) कोणत्याही सहकारी संस्थेने विहित मर्यादेपेक्षा कमी काम केले तरीसे जाणार नाही याची खात्री काटेकोरपणे करून घ्यावी. तसेच ज्या संस्थांचे म्हणजे संस्थेने ज्यांना दिलेल्या कुठल्या कामे करण्याच्या संबंधित संस्थेचे सभासद

वैधता प्रमाणपत्र, जी सहकारी संस्था अशी बंधन पाळणार नाही त्यांना कोणत्या ही नोंदणी देखील रद्द किंवा नये आणि सर्वसाधारण नोंदणीची पूर्तता करण्यास सांगावे. संस्थेने तसे न केल्यास संस्थेचे काम काढून घ्यावे व उरलेले काम विभागा-मार्फत पूर्ण करावे.

५) जाती संस्थांचे पदाधिकारी गैरप्रकार करतात व त्यांनी केलेले गैर प्रकार हे वैयक्तिक की व्यक्तिगत स्वरूपाचे आहेत किंवा काही याबाबत संदिग्ध निर्माण होतो. असे प्रकार जर खालावा व्यक्तिचा असेल तर त्यावर वर संहितेप्रमाणे कार्यवाही करावी. जेथे आवश्यक असेल तेथे फौजदारी खटला भरण्यास हुरळाई करू नये. याशिवाय जे संस्थेचे पदाधिकारी असतील अशांचे बाबत नेहमी तक्रार संबंधित जिल्हा सहकार उपनिबंधक यांचेकडे यावी व त्याची संकलित माहिती मुख्य वन संरक्षक (उपवने) यांचेकडे पाठवावी.

६) वन मजूर सहकारी संस्थेच्या प्रत्येक सभासदाला ओळखपत्र देणेत यावे. हे ओळखपत्र संबंधित संस्थेच्या अध्यक्ष किंवा सचिव यांचे सहीचे असावे. ते त्या संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा सहकारी उपनिबंधक किंवा त्यांनी नेमलेल्या अधिकाऱ्यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले असावे.

७) कमजोर सहकारी संस्थेच्या वृक्ष तोडीचे काम करित असताना त्या काम-ठरोवर त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये किंवा कार्यक्षेत्राजवळपास जी पडीत जमीन उपलब्ध असेल अशा पडीत वन जमिनीत वृक्ष रोपणाचे काम देण्यात यावे. हे काम साधारणत: संस्थेला दिलेल्या कूपाचे जे क्षेत्र असेल अशा ~~सहित सन नमुनीत~~ त्यापेक्षा दिलेल्या दुप्पट क्षेत्राचे असावे. प्रत्येक कूपामागे किमान दरवर्षी वृक्ष लागवडी साठी साधारणत: १०० हेक्टर क्षेत्र असावे. ज्या सहकारी संस्था कूपांचे वृक्ष रोपणाचे काम करणार नाहीत त्या सहकारी संस्थांना कूपांचे काम देण्यात येऊ नये. कूपाचे काम व वृक्ष रोपणाचे काम यांच्या प्रत्येक कार्याची सांख्यिकी संबंधित विभागीय वन अधिकाऱ्यांना घालावी व असे करतांना याची खात्री करून घ्यावी की, कूपाचे काम पूर्ण होण्यासाठी दरवर्षी १०० हेक्टर क्षेत्रावर वृक्षारोपणाचे त्या त्या पंचवार्षिक मागणीचे ... पूर्ण झालेले असेल.

८) वृक्ष लागवडीचे काम सहकारी संस्था करतील त्यासाठी आवश्यक असणारा निधी ... वन विकास महामंडळ ज्या पध्दतीने पडीत वन जमिनीच्या वृक्ष लागवडीचे काम करणार आहेत, त्याच पध्दतीने त्यांना उपलब्ध देण्यात येईल.

...9...

या संस्थांना पेव्हर व पोच रस्त्याने कुंपण लागवडीसाठी निधी उपलब्ध देण्याची जबाबदारी ही वन विकास महामंडळाची असेल.

महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वा/-
[ज. ता. जाधव]
शासनाचे अवर सचिव
महसूल व वन विभाग.

प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहिसाठी रवाना.

सर्व विभागीय वन अधिकारी.

. . . . .

ANNEXURE 19.11

जंगल कामगार सहकारी संस्था
कुप्रथे बाबत कल्याणकारी प्रोत्साहनात्मक
अधिदान वापराबाबतच्या पध्दतीबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
निर्णय क्र. एफएलसी १०७८/१९६१९४/ क- ९

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक २३ ऑगस्ट, १९८५.

वाचा:- १] शासन निर्णय कृ. व. स वि.क्र. एफएलसी १०५८/१११११३३६[दोन]
दि. ३/१२/१९५९

२] शा. नि. कृ.व स. वि.क्र. एफएलसी १०५९/३०८३१/६[सह]
दि. ७/९/१९६०

३] शा. नि. कृ व स. वि.क्र. एफएलसी १०५९/३०८३१/६ सहा
दि. ११/१०/१९६३

४] शा. नि. म. व. व. वि.क्र. एफएलसी १०६७/२०७२५/वाय
दि. २६/१०/१९७०

५] शा. नि. म. व. व. वि क्र. एफएलसी १०६७/२०७२५/वाय
दि. ६/४/१९७२

कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट ,मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-५)

ANNEXURE 21.04

Revision of norms for Maintenance and Repairs grants for Government Buildings.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Public Works and Housing Department
Government Circular Memo No.BDG 1180/378/D-2
Mantralaya, Bombay 400 032.

29 th July 1980

Reference :- Govt. Memo No. P.69 (7)
Desk No. 21 A, dated 3/12/1975

C I R C U L A R

Government had fixed certain norms to be adopted for working out the requirement for repairs to Government Reside Non-Residential bldgs. vide Govt.Memorandum referred to above These norms were based on the Capital Cost, as well as the a bldge.

These norms were fixed in the year 1975 and the Maintenance and repairs grants worked out on these basis were found to be quite inadequate to maintain the buildings properly in view of ever increasing rates of materials, Labour and non-repair items like Service charges, Electricity Charges , W.C charges etc.

3. The matter was under consideration of Government for some time past and it hasbeen now decided that the norms of maintenance grants should be related to the total builtup a as well as functioning of the buildings.

Government is therefore, pleased to fix the following revised norms to be adopted in working out the requirement f repairs to Government residential/Non-Residential buildings.

Type of building	Rate for M & R Civil Portion	Rate for M & R Electrical Portion	Total
	Rs. per Sq.meter of built up area		
1. Adm. & Residential Bldge.	10	1.5	11.5
2. Hospitals and residential bldgs.of special nature such as M.L. As Hostels, V.I.Ps. Bunglows, V.I.P. Guest House etc.	12	2	14
3. Monumentil bldge, such as Council Hall, Museums (Revindra Natya Mandir etc.)	15	2.5	17.5

4. The above rates are recommended for 8 items as under.

1. Repairs to fixture and fastening of doors and windows.

2. Repairs to frames and shutters of doors and windows.

3. Repairs to sanitary and water supply fittings.

4. Colour washing distemparing and painting of walls and doors and windows.

5. Repairs of floors.

6. Repairs to plaster, pointing.

7. Repairs to roof such as turining gttles replacement of files water proofing course etc.

8. Monsoon protectin such as Bamboo matting etc.

9. Maintenance of electrical fittings and fixtures.

5. In addition to the provisin on above items and at rates prescribed above, additional provision may be made on the following items.

1. Municipal Taxes (2) Services charges (3) Water charges.

4) Telephone charges (5) Electricity charges (6) Rent for Maharashtra Housing Board Tenements (7) Running of Assembly Sessions (8) Air conditioning. (9) Bulk Electric distribution etc. (10) Running charges of Rest House/Inspection Bunglows such as provision of lines, furniture etc.

6. In case of buildings more than 25 years old, further addition at 25 % of the above norms may also be made to take of more repairs required in case of such old buildings.

These norms should be adopted while demanding grants for current repairs and special repairs to buildings in future.

This circular memorandum issue with the concurrence of Internal Financial Advisor and Joint Secretary to Government, Public Works and Housing Department

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Sd/-

Deputy Secretary to Govt.

प्रशासकीय व निवासस्थानीय इमारतींचे

परिरक्षण व दुरुस्ती करिता लागणारा

सर्वसाधारण खर्चाचा कालावधी

अ. क्र.	सर्वसाधारण बाबी	कालावधी	शेरा
१.	इमारतींच्या भिंतींना आंतील बाजूने चुन्याच्या सेकटीचे दोन हात देणे.	दरवर्षी ऑक्टोबर/ नोव्हेंबर महिन्यात	
२.	भिंतींना बाहेरच्या बाजूने रंग सेकटी अगर पिवळ्या मातीचे दोन हात देणे.	दर दोन वर्षांनी एकदा	
३.	भिंतींचा आंतील बाजूने डाग डिस्टेंपरचे दोन हात देणे.	दर दोन वर्षांनी एकदा	
४.	भिंतींना आंतील बाजूने ऑईल बॉंड डिस्टेंपरचे दोन हात देणे.	दर तीन वर्षातून एकदा.	
५.	दरवाजे खिडक्या, जाळ्या इत्यादींना आईल पेंटचे दोन हात देणे.	दर पाच वर्षातून एकदा	
६.	लाकडी सामान-सुमारास पॅंच पॉलिश करणे.	दर तीन वर्षातून एकदा	
	लाकडी दरवाजांना, फळ्यांना वार्निश करणे.	दर तीन वर्षातून	
८.	विश्राम गृहातील/सरकारी कुटीतील पडदे, गाद्यांच्या गादी, खुर्च्यांवरील गाद्यांची आवरणे बदलणे.	दर पाच वर्षातून एकदा	
९.	खुर्च्यांचे बेतकाम करणे	जरुरी प्रमाणे.	
१०.	पुटलेली मंगलोरी कवले बदलणे/ नवीन कवले घालणे.	जरुरी प्रमाणे.	
११.	खिडक्यांची/दरवाजांची डागडुजी करणे	जरुरी प्रमाणे.	
१२.	दरवाजे-खिडक्यांचे डोअर बोल्ट हॉडल्स, कायेची तावदाने वगैरे बदलणे.	जरुरी प्रमाणे.	
१३.	फरशींची डागडुजी करणे	जरुरी प्रमाणे.	
१४.	विद्युत सामान सुमान बदलणे/ दुरुस्त करणे.	जरुरी प्रमाणे.	
१५.	पाणी पुरवठ्याच्या साधनांची दुरुस्ती/ बदलणे.	गरज भासेल त्याप्रमाणे.	
१६.	शौच -कुपाच्या सेप्टिक टॅंकची सफाई करणे.	दर चार वर्षांनी अगर गरज भासेल त्याप्रमाणे	
१७.	इमारतीचे आयुष्यमान सुरक्षित राहण्याहेतू करावी लागणारी प्रतिबंधक लिकोज किंवा त्यांची दुरुस्ती.	जरुरी भासेल त्याप्रमाणे.	

ANNEXURE 21.05

विषय:- इमारतीचे परिरक्षण व दुरुस्ती

क्रमांक वह।-२४/ [३३/३५/परि/१४३तन १९९०-९१.

नागपूर-४४० ००१, दिनांक ८ फेब्रुवारी, ९१

"प रि प त्र क"

सध्या वन विभागाच्या ताब्यात अनेक इमारती आहेत. यात प्रशासकीय इमारती व निवासस्थानीय इमारतींचा समावेश आहे. यातील ब-याचशा इमारती पक्क्या असून पूर्वीच्या जुन्या काही इमारती निम्न पक्क्या आहेत. या सर्व इमारतीचे परिरक्षण व चालू दुरुस्ती करण्याची जबाबदारी वन विभागाची आहे. पण असे आढळून आले आहे की, काही इमारतीच्या अंशत: अगर संपूर्णपणे दुरुस्ती होते. त्यामुळे या इमारतींवर पावसाळ्यापूर्वी अगर पावसाळ्यानंतर वेळीच दुरुस्ती न केल्यामुळे विपरीत परिणाम होतो व नाइलाजाने जादा खर्च करून विशेष दुरुस्तीचे काम हाती घ्यावे लागते किंवा प्रसंगी संपूर्ण इमारतीचे नुतनीकरण करावे लागते. सारांशाने म्हणावयाचे झाल्यास एकूण एक इमारतीची देखभाल समाधानकारक पणे होत नाही. आता नवीन बांधकामासाठी पूर्वी पेक्षा अनेक पटीने खर्च वाढल्याने जुन्या इमारती सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक आहे.

२. शासनाने परिरक्षण व चालू दुरुस्ती वेळेवर करून सर्व इमारती सुस्थितीत व वापरण्यायोग्य ठेवण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्र. बी.डी.जी. ११८०/३५ डी-२ दिनांक २१ जुलै, १९८० अन्वये यासाठी मार्गदर्शन निश्चित केलेले आहेत. त्याची प्रत सोबत जोडली आहे. याप्रमाणे प्रशासकीय व निवासस्थानिय इमारतीच्या चालू दुरुस्ती व परिरक्षणाकरिता रुपये १०/- प्रति चौरस मि व विद्युतीकरणाच्या दुरुस्तीसाठी रुपये १.५० प्रति चौ. मिटर असे एकूण रुपये ११.५० प्रति चौरस मिटर या दराने प्रत्येक इमारतीसाठी रक्कमेची मर्यादा घातली आहे. जर इमारती २५ वर्षापेक्षा जुन्या असतील तर या रकमेत २५ टक्के वाढ सूचविलेली आहे. स्थानिक कर, सेवा शुल्क इत्यादींचा यात समावेश नाही. तेव्हा कोणत्याही इमारतीच्या परिरक्षण व चालू दुरुस्तीवर या मर्यादेपेक्षा जास्त खर्च प्रतिबंधीत होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३] दर वर्षी प्रत्येक वन वृत्तातून येणा-या मागणी नुसार व उपलब्धतेनुसार परिरक्षणाकरीता अनुदान मंजूर करण्यात येते. या मंजूर अनुदानातून प्रस्तावित आवश्यक असलेली चालू दुरुस्तीची कामे हाती घेण्यात यावीत. विशेषत: वनरक्षक व वनपाल यांची निवासस्थाने सुस्थितीत राहण्याची काळजी घ्यावी. अधिकारी वर्गाच्या निवास स्थानावरच मंजूर अनुदान मोठ्या प्रमाणात खर्च करू नये. तसेच अधिका-यांच्या बदलीनंतर बंगल्याचा डिसेटपर/ ऑईलपेंट बदलला पाहिजे ही पडत चालेलली प्रथा योग्य नाही. उपवनसंरक्षकांनी या ऐवजी खालच्या श्रेणीतील निवासस्थानाच्या देखभालीकडे जास्त लक्ष दिले पाहिजे.

या अनुदानातून जरुर पडल्यास. जुन्या काही इमारतींचा किरकोळ दुरुस्तीचीही कामे घेण्यास हरकत नाही. एप्रिल पासून सविस्तर नकाशे अंदाजपत्रके तयार करावयास हवीत. इमारती दुरुस्तीसाठी ठेवण्यासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत याची यादी वन अभियंता, नागपूर यांनी तयार केली असून ती सोबत माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी जोडलेली आहे. या यादी मध्ये रंगसफेदी अगर ऑईल पेन्ट इत्यादी करण्यासाठी सर्व साधारण काल मर्यादा नमूद केलेली आहे. मंजूर अनुदानातून इमारती निवास स्थान डिस्टेंपर वे तसेच आणि त्यानंतर पहील्या वर्षी ऑईल पेन्टचे अगर इतर कामे करण्यास मंजूर अनुदानातून सर्व इमारतींची देखभाल करणे शक्य आहे.

यासाठी विभागातील सर्व इमारतींचे परिरक्षण ३ वर्षाचे कालावधीत पूर्ण होईल हे ध्यानात घेऊन अवस्थाबद्ध कार्यक्रम उप वनसंरक्षकांनी तयार करावा व त्यास वन संरक्षकांनी मान्यता द्यावी. अशी मान्यता दिल्यानंतर वृत्तांतील एकूण एक इमारतींचे उपलब्ध अनुदानातून परिरक्षण केले जाईल. अवस्थाबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी होईल याची जबाबदारी वनसंरक्षकांनी घ्यावी. अवश्य वर्षानंतर पुन्हा हाच कार्यक्रम गृहीत धरुन अंमलात आणता येईल.

मुख्य वनसंरक्षक,
अन्वेषणी,
महाराष्ट्र राज्य,
नागपूर.

प्रतिलिपी प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
-"- मुख्य वनसंरक्षक [संधारण] महाराष्ट्र राज्य, नागपूर
-"- मुख्य वनसंरक्षक [उत्पादन] महाराष्ट्र राज्य, नागपूर
-"- मुख्य वनसंरक्षक [मुल्यांकन व राष्ट्रीयीकरण] महाराष्ट्र राज्य, नागपूर
-"- वसं-१, वसं-२, वसं-३, वसं-४ वसं-५,
-"- वनसंरक्षक ---------- पुणे ----------
-"- उप वनसंरक्षक ---------- विभाग ----------
-"- वनअभियंता, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
-"- उप वनअभियंता ---------- पुणे ----------

ANNEXURE 21.06

उपविभाग सत्तावीस—भाडे, दर व कर

भाडे

१४७. (ए) सरकारी प्रयोजनार्थ ताब्यात घेतलेल्या कोणत्याही जमिनीचे किंवा इमारतीचे भाडे तो ताब्यात असणाऱ्या सरकारी कार्यालयाकडून किंवा विभागाकडून भरण्यात येईल व सरकारी लेख्यामध्ये त्याची नोंद त्या कार्यालयाचा किंवा विभागाचा खर्च म्हणून दाखल करण्यात येईल. कोणत्याही आकस्मिक खर्चाच्या बिलात प्रत्येक वर्षी पहिल्या वेळी दाखवण्यात येणाऱ्या अशा खर्चभाराच्या पुष्टिदाखल महाराष्ट्र शासनाची आवश्यक असलेल्या प्रयोजनासाठी योग्य अशी इमारत उपलब्ध नसल्याबद्दलचे कार्यकारी अभियंत्याचे एक प्रमाणपत्र जोडण्यात आले पाहिजे.

इमारत प्रथम भाड्याने घेण्यात आल्यावर कार्यकारी अभियंत्याने भाडे वाजवी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र दिले पाहिजे. इमारत ताब्यात असणाऱ्या विभागाने त्या वस्तीतील भाड्यामध्ये होणारा चढउतार किंवा जागेच्या क्षेत्रफळात किंवा आकारमानात काही बदल झाल्यास त्याकडे लक्ष ठेवावे आणि भाड्याबाबत सुधारित प्रमाणपत्र आवश्यक असेल तरच कार्यकारी अभियंत्याशी विचारविनिमय करावा. [1][नगरपालिका करातील वाढीइतकी भाड्यात वाढ झाली असल्यास त्यासंबंधात कोणतेही सुधारित भाड्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही ; मात्र ज्यामध्ये प्रथमत: वाढीव भाड्याची मागणी केली असेल अशा बिलाला करातील वाढीबाबतचे नगरपालिकेचे प्रमाण पत्र जोडण्यात यावे].

टीप १.—पोलीस उपआयुक्त, मुंबई यांच्या निवासव्यवस्थेसाठी, शासनाच्या मान्यतेने पोलीस आयुक्त, मुंबई यांनी भाड्याने घेतलेल्या इमारतीच्या बाबतीत या नियमानुसार आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रास सूट देण्यात आली आहे.

टीप २.—प्रस्तुत प्रकरणी निवास व्यवस्था नियंत्रक, मुंबई/जिल्हाधिकारी यांजकडून नुकसानभरपाई निश्चित केली जात असल्याने मागणी केलेल्या जागांच्या संबंधात भाडे वाजवी असल्याबद्दलचे कार्यकारी अभियंत्याचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.

(बी) या नियमामुळे, विभागांना आपापसात रकमांची प्रदाने किंवा समायोजने करण्याचे प्राधिकार प्राप्त होत नाही.

(सी) नागरी सेवेतील ज्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात सरकारी इमारती आहेत अशा अधिकाऱ्याकडून भाडे वसूल करण्याची जबाबदारी सामान्यपणे, इमारती व दळणवळण विभाग/पाठबंधारे व वीज विभाग यांच्यावर आहे. परंतु ज्या अपवादात्मक प्रकरणी, एखाद्या इमारतीची किंमत नागरी खर्च म्हणून समजण्यात येत असेल अशा प्रकरणी संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंत्यास आवश्यक ते तपशील पुरवण्यात येतात हे पाहण्यासाठी महालेखापालांनी आवश्यक त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. कृषि संचालक, संचालक, दारूबंदी व उत्पादन शुल्क, उद्योग संचालक व जिल्हाधिकारी, पुणे, यांनी निवासस्थाने म्हणून बांधलेल्या व तशी व्यवस्था ठेवलेल्या इमारती दर्शवणारे विवरणपत्र प्रत्येक वर्षाच्या १५ मे पर्यंत महालेखापालास सादर करावे. या विवरणपत्रात, भाडे माफ असलेल्या किंवा नसलेल्या इमारतीचा समावेश असावा व ते नमना क्र. १० मध्ये संकलित करावे. हा विवरणपत्राचा नमुना व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, यांच्याकडून मिळवण्यात यावा.

वन विभागाच्या ताब्यात असलेल्या व त्याजकडून व्यवस्था ठेवल्या जाणाऱ्या सर्व निवासी किंवा निवासेतर इमारतींच्या बाबतीत इ. व द. विभाग नमुना क्र. १३३ मध्ये आवश्यक ते फेरबदल करून, प्रत्येक मंडळासाठी वेगवेगळी नोंदवही मुद्रित करावी. नोंदवहीत कोणतीही भर घालावयाची व फेरफार करावयाचे असल्यास त्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस चिठ्ठ्या काढण्यात याव्यात. अशी नोंदवही दर पाच वर्षांनी किंवा त्या दरम्यान पुनर्मुद्रित करावी. ज्या कालांतराने ही नोंदवही पुनर्मुद्रित करावयाची असेल त्याचा निश्चित कालावधी मुख्य वनसंरक्षकांच्या स्वेच्छा निर्णयानुसार ठरवण्यात येईल.

टीप १.—शासन, त्याने भाडेपट्ट्यावर दिलेल्या जमिनीचे आणि इमारतीचे भाडे अर्थसंकल्पीय तरतुदींच्या मर्यादेत प्रत्येक बाबतीत दरवर्षी रु. १४४ च्या मर्यादेपर्यंत व वर विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींच्या अधीन राहून प्रदान करण्यास मंजुरी देण्याच्या शक्ती, विभाग प्रमुख व उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांना प्रदान करू शकेल. या शक्तींखेरीज विभाग प्रमुखांना, वित्तीय शक्तींच्या नियमपुस्तिकेच्या भाग १ च्या अनुक्रमांक २४ समोरील शेवटच्या स्तंभातील शेऱ्याच्या अधीन, कार्यालयाच्या नित्याच्या जागेकरिता प्रत्येक प्रकरणी पुढील मर्यादेपर्यन्त भाडे मंजूर करण्याच्या शक्तीही आहेत.

स्वतंत्र इमारतीमध्ये जागा देण्यात येते तेव्हा ..... दरमहा रु. १५०.

काही भाग खाजगी निवास म्हणून वापराव्याली असलेल्या इमारतीत दरमहा रु. १०० या मर्यादेच्या अधीन, एकूण भाड्याच्या एक-द्वितीयांश.
जागा देण्यात येते तेव्हा.

कार्यालयाच्या जागेसाठी देण्याव्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीवरील किंवा इमारतीवरील भाड्याचे प्रदान प्रत्येक प्रकरणी दरमहा रु. ५० या मर्यादेच्या अधीन राहून अर्थसंकल्पीय तरतुदींच्या मर्यादेमध्ये किंवा "आकस्मिक खर्चाच्या" त्याच प्राथमिक युनिटाखाली निधींचे समायोजन करून मंजूर करण्याची शक्ती पोलीस महानिरीक्षक यांना सोपवण्यात आली आहे.

(मुंबई पोलीस नियमपुस्तिका, १९५०, खंड दोन, परिच्छेद १०८ पहा).

टीप २.—शासनाने, अंशतः शासकीय कार्यालयांच्या जागेसाठी व अंशतः निवासस्थानांसाठी भाड्याने घेतलेल्या खाजगी इमारतींच्या संबंधातील भाडे, बीजखर्च, व इतर संबंधित खर्च यांची मागणी ज्या बिलावर करण्यात येईल अशा प्रत्येक आकस्मिक खर्चाच्या बिलाला पुढील प्रमाणपत्र जोडण्यात यावे. हे प्रमाणपत्र या प्रस्तुत नियमांमधील नियम १४७ मध्ये विहित केलेल्या प्रमाणपत्राखेरीज असेल.

"प्रमाणित करण्यात येते की, भाडे, पट्टी व कर यासाठी आकस्मिक खर्च बिल क्रमांक ———— दिनांक———— यामध्ये काढण्यात आलेली रक्कम संबंधित व्यक्तींना प्रत्यक्षात देण्यात आली आहे. या खर्चापैकी कोणत्याही खर्चाची कोणत्याही मार्गाने वसूली करता येण्याजोगी नसेल आणि खाली उल्लेखलेल्या शासकीय कर्मचाऱ्याकडून वसूल करता येण्यासारख्या————खर्चापैकी एवढा खर्च वसूल करण्यात आला आहे.

टीप ३.—प्रमाणित करण्यात येते की, आकस्मिक खर्चाचे बिल क्र. ..... दिनांक ..... यामध्ये बीज खर्चासाठी काढण्यात आलेल्या रकमेत विद्युत शुल्कावरील खर्चाचा समावेश केलेला नाही.

नगरपालिका व छावणी (कॅन्टोनमेन्ट) कर

१४८. (ए) सर्वसाधारण नियम म्हणून संपूर्ण इमारत किंवा तिचा काही भाग ताब्यात असणाऱ्या विभागाकडून दिले जाणारे किंवा त्याच्याकडे सोपवण्यात येणारे निवासेतर इमारतींवरील नगरपालिका कर व पट्टी यावरील खर्च संबंधित विभागाच्या आकस्मिक खर्चातून करण्यात येतो. तथापि, संपूर्ण कर किंवा कराचा काही भाग इमारतींचे प्रशासनिक नियंत्रण करणारा विभाग म्हणून इमारती व दळणवळण विभाग/पाटबंधारे व वीज विभाग यांच्याकडून किंवा एखाद्या नागरी विभागाकडून भरण्यात येत असेल अशा बाबतीत प्रदानाच्या रकमा संबंधित इमारतींच्या परिरक्षणविषयक अंदाजांच्या रकमांवर आकारण्यात येतील.

(बी) विभागांच्या ताब्यात असलेल्या निवासेतर इमारतींवरील कर, याबाबतीत शासनाने नामनिर्देशित केलेल्या एखाद्या विभागाकडून देण्यात आला असेल व इमारती ज्याच्या ताब्यात असतील त्या विभागाकडे सोपवण्यात आला नसेल तर, अशा कराच्या रकमा, "७१, संकीर्ण भाडे, पट्टी व कर" या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतील.

(सी) निवासी इमारतींवरील कर जर, शासनाकडून देय होत असतील तर, अशा इमारती मग इमारती व दळणवळण विभाग/पाटबंधारे व बीज विभाग यांच्या अथवा इतर कोणत्याही नागरी निभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली असोत वा नसोत, ते अशा संबंधित इमारतींच्या परिरक्षणविषयक अंदाजांच्या खर्चावर आकारण्यात येतील.

टीप १.—शासनाच्या प्रमुखाच्या ताब्यात असलेल्या इमारतींच्या बाबतीत इमारती व दळणवळण विभाग/पाटबंधारे व बीज विभाग यांनी नगरपालिका पट्टी व कर भरण्याची व्यवस्था करावी आणि त्याचा खर्च "५०-सरकारी बांधकामे-शासकीय दुरुस्त्या आकस्मिक बिल-भारित" या निधीच्या शीर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानामधून आकारण्यात यावा.

टीप २.—जेथे संपूर्ण कर किंवा कराचा कोणताही भाग स्थानिक नियम किंवा रूढी यास अनुसरून भाडेकरूकडून सर्वसामान्यपणे वसूल करण्यायोग्य होत असेल तेथे, असा कर त्या इमारतीचे प्रशासनिक नियंत्रण असलेल्या विभागाव्यतिरिक्त अन्य विभागाकडून देण्यात येईल त्याबाबतीत, तो खर्च, असा खर्च देणाऱ्या विभागाचा आकस्मिक खर्च असल्याचे मानण्यात येईल.

(डी) शासकीय विभाग किंवा शासकीय कर्मचारी यांच्या ताब्यात असलेल्या इमारतींवरील नगरपालिका पट्टी व कर यांचे विनियमन करणारे नियम पुढीलप्रमाणे आहेत :—

एक. निवासी इमारतींव्यतिरिक्त अन्य इमारतींवरील कर:—(१) इमारत एकाच विभागाच्या ताब्यात असेल तर त्यावरील कर त्या विभागाने भरावेत.

(२) इमारत एकापेक्षा अधिक विभागाच्या ताब्यात असेल तर किंवा एखाद्या नगरपालिका क्षेत्रातील अनेक इमारतींकरिता ठोक रकमेत कर देय होत असतील तर, असे कर प्रकरणपरत्वे, प्रथम त्या इमारतीचे प्रशासनिक नियंत्रण ज्या विभागाकडे असेल त्या विभागाला अथवा शासनाने याबाबतीत नामनिर्देशित केलेल्या विभागाला देता येतील. एखादी इमारत किंवा इमारती ताब्यात असणाऱ्या निरनिराळ्या विभागांपैकी एखाद्या विभागाच्या नावे ठोक रकमेत करनिर्धारण करण्यात आले असेल आणि हा वाणिज्यिक विभाग असेल तर त्या विभागाच्या ताब्यात प्रत्यक्षपणे असलेल्या जागेच्या प्रमाणानुसार यथाप्रमाण संगणित केलेले कर संबंधित वाणिज्यिक विभागाच्या नावे आकारण्यात येतील. त्यानंतर उर्वरित असलेली शिल्लक रक्कम, इमारतीचा उरलेला भाग ताब्यात असलेल्या एकाच वाणिज्येतर विभागाशी संबंधित असेल तर, ती रक्कम अशा एकाच विभागाच्या नावे आकारण्यात यावी. परंतु, इमारतीचा असा उरलेला भाग ताब्यात असणाऱ्या एकापेक्षा अधिक विभागांशी संबंधित असेल तर, ती रक्कम त्यांच्या नावे आकारण्यात येऊ नये.

टीप १.—संबंधित इमारत संपूर्णपणे ताब्यात नसलेल्या विभागाने रक्कम देण्यापूर्वी किंवा त्या रकमेच्या प्रदानास विलंब होऊन चालणार नसेल तर, त्या इमारतीचा जो कोणताही भाग ज्या विभागाच्या ताब्यात असेल अशा प्रत्येक विभागाकडून याबाबत स्वीकृती मिळविण्यात यावी.

टीप २.—छावणी क्षेत्रांमधील कोणत्याही सरकारी इमारतींवर कोणतेही नगरपालिका कर देय होणार नाहीत.

दोन. निवासस्थाने म्हणून ताब्यात असलेल्या इमारतींवरील कर.—(१) मुंबई नागरी सेवा नियम यातील नियम ८४६ खालील टीप २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या विशिष्ट सेवांवरील करांव्यतिरिक्त अन्य कर मालकांकडून वसूल करण्यात यावेत व ते खुद्द भाडयाचा भाग असल्याचे मानण्यात यावे. अशाप्रकारे एखादी इमारत शासकीय कर्मचाऱ्याच्या वहिवाटीखाली असेल व तो तिचे भाडे देत असेल तर, त्याच्याकडून देय असलेले भाडे अधिक असे मालकांचे कर, एवढी रक्कम ही त्याच्या मिळकतीच्या १० टक्के इतक्या मर्यादेपर्यंतच आकारण्यात यावी. एखादी इमारत भाडेमाफ म्हणून शासकीय कर्मचाऱ्याच्या ताब्यात असेल तर, मालकाच्या अशा करांचा कोणताही भाग त्याच्याकडून वसूल करण्यात येऊ नये.

(२) मुंबई नागरी सेवा नियमपुस्तिकेच्या नियम ८४६ खालील टीप २ मध्ये नमूद केलेल्या विशिष्ट सेवांवर भाडेकरूंकडून वसुलीयोग्य असलेल्या करांच्या संबंधात पुढील आदेशांचे पालन करण्यात यावे :—

(एक) एखाद्या सर्वसाधारण नियमाद्वारे किंवा आदेशाद्वारे अथवा शासनाच्या विशिष्ट मंजुरीद्वारे सूट मिळालेली नसेल तर, भाडेमाफ सरकारी इमारतींमध्ये राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांसकट सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी असे कर भरणे अत्यावश्यक आहे. [खालील (दोन) व (तीन) पहा)].

(दोन) ज्यांची दरमहा मिळकत रु. १५० पेक्षा अधिक नसेल अशा शासकीय कर्मचाऱ्यांना असे कर भरण्यापासून सूट देण्यात आली आहे (मग अशी कराची रक्कम भाड्याच्या रकमेवर आधारित असो वा पार पाडलेल्या सेवेच्या प्रत्यक्ष रकमेवर आधारित असो).

(तीन) ज्यांची मिळकत दरमहा रु. १५० पेक्षा अधिक असेल अशा ज्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या ताब्यामध्ये त्यांना स्वत:ची निवासव्यवस्था स्वत:च करावी लागली असता ते ज्या निवासात राहिले असते त्यापेक्षा त्यांच्या कामाचे स्वरूप पाहता त्यांच्या ताब्यात जास्त भाड्याची निवासस्थाने असतील तर, जर असे कर घराच्या भाड्याच्या मूल्यावर आधारलेले असतील तर त्या शासकीय कर्मचाऱ्याच्या मिळकतीच्या १० टक्क्यांएवढ्या भाड्याच्या रकमेवर देय होणाऱ्या कराच्या रकमेइतकी अशा कराच्या रकमेची वसुली मर्यादित असावी. शासकीय कर्मचारी बदलल्यामुळे वसुलीमध्ये अडचणी येण्याची शक्यता असली तर वरील सर्वसाधारण तत्त्वांवर प्रत्येक निवासस्थानांसाठी वसुलीची ठोक रक्कम निश्चित करावी.

(३) एखाद्या इमारतींच्या बाबतीत नगरपालिकेला देय असलेल्या अशा कराचा काही भाग त्या इमारतीत राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने भरावयाचा असेल व काही भाग शासनाने भरावयाचा असेल अथवा असा कर प्रथम शासनाने त्याच्या सर्वसाधारण महसुलामधून भरून नंतर तो त्या इमारती ज्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या ताब्यात असतील अशा शासकीय कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्याची प्रथा असेल तर, प्रथम शासनाने त्या कराची संपूर्ण रक्कम भरावी व शासकीय कर्मचाऱ्यांकडून देय होत असलेली रक्कम शासनाने त्याच्याकडून वसूल करावी.

तीन. प्रदानाची पद्धत.—शासकीय विभागांनी सरकारी इमारतींच्या बाबतीत स्थानिक निधीमध्ये भरावयाच्या करांचे प्रदान संबंधित स्थानिक प्राधिकरणाचे शासकीय कोषागारात खाते असेल वा नसेल त्यानुसार, पुस्तक समायोजनाद्वारे किंवा रोख रकमेने करावे.

चार. प्रदानासोबत द्यावयाचे प्रमाणपत्र.—(१) इमारती व दळणवळण विभागाच्या/ पाटबंधारे व वीज विभागाच्या नोंदवहीमध्ये अंतर्भूत असलेल्या इमारतींच्या संबंधातील नगरपालिका करांच्या खर्चाच्या पुष्टीदाखल इमारती व दळणवळण विभागाच्या/पाटबंधारे व वीज विभागाच्या संबंधित विभागीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे व त्यामध्ये तो एकतर ही कर आकारणी मान्य करीत असल्याचे अथवा अशी कोणतीही आकारणी अधिक करण्यात आली आहे असे त्यास वाटत असेल तर ती कमी करण्याच्या दृष्टीने सर्व प्रकारची उपाययोजना करण्यात आली आहे अथवा करण्यात येत आहे अशा अर्थाचे निवेदन करील. इतर सरकारी इमारतींच्या बाबतीत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिले पाहिजे.

टीप.—जेव्हा (१) घरभाडे मंजूर करण्यात आले असेल, (२) इमारत शासनाच्या मालकाची असेल, तेव्हा इमारतीचा नगरपालिका कर कार्यकारी अभियंत्याच्या प्रमाणपत्रानुसार आणि शासनाची पुढील मंजुरी न घेता मंजूर करण्यात यावा. हाच नियम पाणीपट्टी व हलालखोर करासही लागू आहे. मोजमापावरून पाणीपट्टी आकारण्यात येत असेल आणि ती इमारतीच्या कर निर्धारणावर अथवा मूल्यांकनावर कोणत्याही प्रकारे अवलंबून नसेल तेव्हा, कार्यकारी अभियंत्याचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. संबंधित इमारत शासनाच्या नळ जोडणीच्या सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली असल्याने तिच्या नळ जोडणीस शासनाच्या संबंधित विभागाची मंजुरी मिळवणे ही एकच बाब आवश्यक आहे. तथापि, अशा बाबतीत, इमारत ज्या कार्यालयाच्या ताब्यात असेल त्याच्या कार्यालय प्रमुखाने, पुरवलेल्या पाण्याचे परिमाण पडताळून पाहिले आहे आणि ते बरोबर असल्याचे आढळले आहे अशा अर्थाचे प्रमाणपत्र दिले

पाहिजे. तसेच पार पाडलेल्या सेवेवर हलालखोर कर आकारण्यात आला असेल तर हलालखोर करासाठी अशाच प्रकारचे प्रमाणपत्र देण्यात यावे. ज्या दराने संपूर्ण करखर्च आकारलेला असेल त्या दरांवर आक्षेप घ्यावयाची इच्छा असल्यास, संबंधित अधिकाऱ्याने कार्यकारी अभियंत्याचे मत घ्यावे.

(३) कर आकारणी अधिक केल्याचे आढळून आल्यास, सर्वसाधारण नगरपालिका कायद्यानुसार त्याची भरपाई करवून घेण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

ज्या प्रकरणात कर आकारणी केल्या जाणाऱ्या मालमत्तेचे स्वरूप असे आहे की, त्यावर कोणत्याही विशिष्ट कराचे प्रदान निर्धारित करताना तिच्या बाबतीत सर्वसामान्य तत्त्वे लागू करता येणार नाहीत, अशा प्रकरणी, स्थानिक प्राधिकरणावरोवर कदाचित स्वेच्छानुसार असली तरी, सलोख्याची तडजोड घडवून आणणे अशक्य असल्याचे दिसून येत असेल तेव्हा, १८८१ च्या अधिनियम अकराच्या विशेष उपबंधांचा अवलंब करता येईल. एखाद्या मालमत्तेवरील कर निर्धारण हे तिच्या भाडचाच्या मूल्यावर आधारित असे करावयाचे असेल, परंतु जी मालमत्ता अशा स्वरूपाची असेल की, ती भाडचाने देण्याची कल्पनाच करणे शक्य नसेल किंवा ती शासनाने भाडचाने देऊ केली तर तिच्यापासून किती भाडे मिळू शकेल याचा तिच्याबाबतचा अंदाज करणे शक्य नसेल, अशा प्रकारची मालमत्ता हे प्रस्तुत एक उदाहरण म्हणून देता येईल.

विशिष्ट सेवांकरित स्थानिक कर

१४९. शासनाने भाडेपट्टचाने घेतलेल्या किंवा बांधलेल्या ज्या इमारतीमध्ये निवासासाठी व कार्यालयासाठी अशा दोन्ही प्रयोजनार्थ जागा देण्यात आलेली असेल किंवा एकाच निवासस्थानामध्ये किंवा इमारतीत एकापेक्षा अधिक भाडेकरू ठेवण्यात आलेले असतील अशा बाबतीत, अन्यथा निदेशित करण्यात आलेले नसेल तर, स्थानिक संस्थांकडून पार पाडण्यात येत असलेल्या विशिष्ट सेवांवरील स्थानिक करांबाबतचा खर्च खाली दर्शवलेल्या आधारावर सर्व रहिवाशांकडून वसूल करण्यात यावा:—

अ— वीज खर्च

(१) मीटर अगोदरच वसविण्यात आलेले असतील तर, मीटरवर दर्शविल्याप्रमाणे दर महिन्याला वापरण्यात आलेल्या युनिटांच्या संख्येनुसार वीजेच्या आकाराचा हिशेब करण्यात यावा.

(२) मीटर वसवण्यात आलेले नसतील तर, भाडचाच्या आधारावर वीज खर्च वसूल करण्यात यावा.

ब—पाणीपुरवठा व साफसफाई खर्च

(१) संबंधित स्थानिक संस्थेने भाडचाच्या आधारावर आकारणी निर्धारित केली असेल तर, त्यांची वसुली भाडचाच्या आधारावर करण्यात यावी.

(२) संबंधित स्थानिक संस्थेने पार पाडलेल्या सेवेच्या प्रत्यक्ष रकमेवर आकारणी निर्धारित केली असल्यास त्याचा खर्च खाली दिल्याप्रमाणे वसूल करण्यात यावा :—

(ए) **पाणीपट्टी**.—(एक) मीटर अगोदरच वसवलेले असतील तर मीटरवर दर्शवल्याप्रमाणे दर महिन्याला वापरण्यात आलेल्या युनिटांच्या संख्येनुसार पाणीपट्टीचा हिशेब करण्यात यावा;

(दोन) मीटर वसवण्यात आलेले नसतील तर, कार्यालय प्रमुखाने संबंधित कार्यकारी अभियंत्याशी विचारविनिमय करून, नळ जोडणीला आकारमानानुसार पाणीपट्टी निर्धारित करावी. या दोन अधिकाऱ्यांमध्ये मतभेद झाल्यास ती बाब आदेशार्थ शासनाकडे पाठवण्यात यावी.

(बी) **साफसफाईचा खर्च**.—कार्यालय प्रमुखाने कार्यकारी अभियंत्याशी विचारविनिमय करून याबाबतचा खर्च निश्चित करावा आणि या दोन अधिकाऱ्यांमध्ये मतभेद झाल्यास ती बाब आदेशार्थ शासनाकडे पाठवण्यात यावी.

१५०. शासनाकडून ज्या निवासस्थानांमध्ये वीज व्यवस्था, पाणी पुरवठा व साफसफाईची व्यवस्था करण्यात येते अशा निवासस्थानांच्या विशिष्ट सेवांसंबंधातील कर पुढीलप्रमाणे सर्व रहिवाशांकडून वसूल करण्यात यावा.

अ—वीज खर्च

(१) मीटर अगोदरच बसवण्यात आलेले असतील तर, मीटरवर दर्शवल्याप्रमाणे दर महिन्यास वापरण्यात आलेल्या युनिटांच्या संख्येनुसार विजेच्या आकाराचा हिशेब करण्यात यावा.

(२) मीटर बसवण्यात आलेले नसतील तर, भाडयाच्या आधारावर वीजखर्च वसूल करण्यात यावा.

ब—पाणीपट्टी

(१) मीटर अगोदरच बसवण्यात आलेले असतील तर मीटरवर दर्शवल्याप्रमाणे दर महिन्याला वापरण्यात आलेल्या युनिटांच्या संख्येनुसार पाणीपट्टीचा हिशेब करण्यात यावा.

(२) मीटर बसवण्यात आलेले नसतील तर, कार्यालय प्रमुखाने संबंधित कार्यकारी अभियंत्याशी विचारविनिमय करून नळजोडणीच्या आकारमानानुसार पाणीपट्टी निर्धारित करावी व या दोन अधिकाऱ्यांमध्ये मतभेद झाल्यास, ती बाब आदेशार्थ शासनाकडे पाठवण्यात यावी.

(३) भिस्त्यांची नेमणूक करून त्यांच्याकडून पाणीपुरवण्याची व्यवस्था केलेली असेल अशा प्रकरणी भाडयाच्या आधारे आकारणी निश्चित करावी.

क—भाडयाच्या आधारावर साफसफाईचा खर्च वसूल करण्यात यावा

टीप.—निवास व कार्यालय या दोन्ही प्रयोजनांसाठी ज्या इमारतीत जागा देण्यात आली आहे अशा इमारतीच्या बाबतीत विशिष्ट सेवांवरील खर्च सादर करावयाच्या बिलांवरोबर खालील प्रमाणपत्र जोडण्यात यावे :—

"प्रमाणित करण्यात येते की, या बिलावर मागणी केलेल्या रकमांमध्ये, इमारतीतील रहिवाशांकडून वसूल करण्यायोग्य असलेले कोणतेही खर्च समाविष्ट करण्यात आलेले नाहीत."

१५१. सरकारी इमारतींवरील नगरपालिका करांच्या संबंधात अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी व हे कर भरण्यासाठी पुढील विवरणपत्रात तपशीलवार दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

सरकारी इमारतींवरील नगरपालिका करांच्या संबंधात अर्थसंकल्पीय अंदाज करणे व या कराची रक्कम चुकती करणे याबाबतच्या तपशीलवार सूचनांचे विवरणपत्र

अनुक्रमांक	वर्णन	ज्याखाली नगरपालिका करांबाबतची तरतूद करावयाची आहे अशी लेखाशीर्षे	ज्याने प्रदान करावयाचे त्या अधिकाऱ्याचे नाव	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
	अ—मुंबई नगरपालिकेच्या हद्दीबाहेरील सरकारी इमारती			
१	निवासी इमारती (केंद्र व राज्य शासनाच्या).	संबंधित सरकारी बांधकामाच्या प्रधान शीर्षाखालील संबंधित इमारतींचे दुरुस्तीविषयक अंदाज.	इमारतींचा प्रभारी कार्यकारी अभियंता.	..

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२	**निवासेतर इमारती :—**			
	(ए) इमारती व दळण-वळण विभागाच्या/पाट-बंधारे व बीज विभागाच्या ताब्यात असल्यास.	संबंधित सरकारी बांधकामाच्या प्रधान शीर्षाखालील संबंधित इमारतीचे दुरुस्तीविषयक अंदाज.	इमारतींचा प्रभारी कार्यकारी अभियंता.	
	(बी) इतर विभागाच्या (केंद्र किंवा राज्य शासनाच्या) ताब्यात असल्यास.	इमारत ज्याच्या ताब्यात असेल त्या विभागाचे आकस्मिक खर्च अनुदान.	इमारत ज्याच्या ताब्यात आहे असा विभागाचा अधिकारी.	
३	ज्याच्या बाबतीत कार्यकारी अभियंत्याने ठोक रकमेत कराची रक्कम द्यावयाची असते अशा एकापेक्षा अधिक विभागांच्या ताब्यात असलेल्या (संघ, केंद्र किंवा राज्य शासनाच्या) सर्व निवासेतर इमारती.	संबंधित सरकारी बांधकामाच्या प्रधान शीर्षाखालील संबंधित इमारतींचे दुरुस्तीविषयक अंदाज.	इमारतींचा प्रभारी कार्यकारी अभियंता.	..
	ब—मुंबई नगरपालिकेच्या हद्दीतील सरकारी इमारती			
४	निवासी इमारती (केंद्र, किंवा राज्य शासनाच्या).	संबंधित सरकारी बांधकामाच्या प्रधान शीर्षाखालील संबंधित इमारतींचे दुरुस्तीविषयक अंदाज.	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग (डिव्हिजन).	..
५	**निवासेतर इमारती :—**			
	(ए) मुंबई विकास विभागाच्या इमारतींव्यतिरिक्त इतर राज्य इमारती.	७१, संकीर्ण प्रादेशिक..	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (डिव्हिजन).	..
	(बी) मुंबई विकास विभागाच्या इमारती.	संबंधित प्रधान शीर्षे २५१ व १०६ याखालील दुरुस्तीविषयक अंदाज.	वरील प्रमाणे	या इमारतीकरिता भांडवली व महसूली लेखे ठेवण्यात येतात.
	(सी) केंद्र सरकारच्या इमारती.	या इमारती ज्या विभागाच्या ताब्यात आहेत अशा विभागाचे आकस्मिक अनुदान.	वरील प्रमाणे	..

टीप १.—मुंबई विकास विभाग चाळींचा अपवाद सोडून, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या मुंबई नगरपालिकेच्या हद्दीतील सर्व शासकीय इमारतींवरील नगरपालिका कर, कार्यकारी अभियंता, इलाखा-शहर विभाग, इमारती व दळणवळण विभाग/पाटबंधारे व बीज विभाग, मुंबई यांच्याकडून देण्यात येईल. हा खर्च प्रथम " ७१, संकीर्ण—एफ-भाडे व कर—आर-१—मुंबई नगरपालिकेस सर्वसाधारण करांचे प्रदान " या शीर्षाखाली टाकण्यात येईल. परंतु, केंद्र शासनाच्या इमारतीवरील करांसाठी केंद्र शासनाकडून वसूल केलेल्या रकमा तसेच (राज्य शासनाच्या) निवासी इमारतींवर आणि मुंबई विकास विभाग इमारतींवर (मुंबई विकास विभाग चाळींव्यतिरिक्त) देण्यात आलेले कर दर्शविणाऱ्या रकमा, खर्चातून केलेली सजावट म्हणून याच शीर्षाखाली ७१, संकीर्ण जमा करण्यात याव्यात ; तथापि, याकरिता आवश्यक असणारी अर्थसंकल्पीय तरतूद उपरोक्त " व " अनुसार केलेली असेल.

टीप २.—मुंबई विकास विभागाच्या चाळींवरील नगरपालिका कर, त्या चाळींचा संवितरण व प्रशासन अधिकारी असलेला कार्यकारी अभियंता, इलाखा-शहर विभाग, यांजकडून " ५१-मुंबई विकास योजना दुरुस्त्या औद्योगिक गृहनिर्माण योजना—भाडे, पटट्या व कर " या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली देण्यात येईल.

उपविभाग अठ्ठाविस—राहुट्या

१५२. (ए) जिल्हा अधिकाऱ्यांना कार्यालयीन वापरासाठी सरकारी खर्चाने राहुट्या पुरवठण्यासंबंधीचे नियम खाली दिल्याप्रमाणे आहेत :—

(१) विभाग प्रमुख दर १२ व्या वर्षी रु. ९०० च्या मर्यादेपर्यंत.

(२) उपविभागांचे प्रभारी सहाय्यक व उप-जिल्हाधिकारी आणि ज्यांना राहुट्या ठेवाव्या लागतात असे इतर सर्व अधिकारी.—दर १२ व्या वर्षी रु. ५०० च्या मर्यादेपर्यंत.

वर विहित केलेल्या प्रमाण मर्यादेमध्ये, राहुट्यांचा, खर्च व त्याचबरोबर रेल्वेच्या व त्या राहुट्या, कारखान्यापासून इष्ट स्थानापर्यंत वाहून नेण्याच्या इतर खर्चाचा समावेश अभिप्रेत आहे, मात्र यामध्ये वार्षिक दुरुस्तीचा खर्च समाविष्ट नाही व अशा खर्चाच्या रकमा ठरावी अनुदानातून देण्याचे चालू ठेवण्यात यावे. विभाग प्रमुखांना प्रमाण मर्यादेनुसार किंवा विशिष्ट प्रकरणी त्या मर्यादेपेक्षा जास्त रक्कम मंजूर करण्यासंबंधीचे शासनाचे काही विशेष आदेश असल्यास त्यानुसार त्यांच्या जिल्ह्यांकरिता उपलब्ध असलेले एकूण अनुदान स्वेच्छानिर्णयानुसार वितरित करण्याची मुभा आहे. मात्र जिल्ह्यांकरिता मंजूर करण्यात आलेल्या एकूण अनुदानात वाढ करण्यात येणार नाही आणि स्वस्त व सदोष राहुट्या खरेदी करण्यात येऊ नयेत. अर्थातच, निरनिराळ्या वर्गाच्या अधिकाऱ्यांकरता आवश्यक असलेल्या राहुट्यांकरिता वर विहित केलेल्या रकमेएवढीच रक्कम खर्च करण्याची आवश्यकता नाही. ज्या जिल्ह्यात प्रमाण मर्यादेपेक्षा राहुट्यांची गरज कमी असेल अशा जिल्ह्यांच्या बाबतीत राहुट्यांवरील खर्चाचा आकडा कमीत कमी ठेवण्यात येत आहे याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे.

टीप.—वन विभाग प्रमुखांच्या बाबतीत उपरिनिर्दिष्ट द्रव्य मर्यादा रु. ९०० वरून रु. १,००० पर्यंत वाढवण्यात आली आहे.

(बी) सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयांसाठी राहुट्या खरेदी करताना पुढील नियमांचे पालन करावे :—

(एक) राहुट्यांचा जुना संच निरुपयोगी झाल्याबद्दलचे प्रमाणपत्र सादर करण्यात आल्याशिवाय आणि १२ वर्षेपर्यंत वापरात नसलेल्या एखाद्या राहुटीच्या जागी दुसरी राहुटी कोणत्या परिस्थितीत घेण्याचे ठरवले आहे याबद्दलचे स्पष्टीकरण दिले जाईपर्यंत, राहुट्यांचा नवीन संच खरेदी करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(दोन) कोणत्याही स्वस्त व सदोष राहुटीचा तसेच जी राहुटी संपूर्ण बारा वर्षांपर्यंत उपयोगात राहू शकणार नाही अशा राहुटीच्या खरेदीच्या संबंधात खरेदी अधिकारी जबाबदार राहील. सर्वसाधारणपणे महासंचालक, पुरवठा व विनियोग (डायरेक्टर जनरल ऑफ सप्लॉइज अॅन्ड डिसपोजलस,), यांनी घालून दिलेल्या विनिर्देशांच्या अनुसार ज्या राहुट्या असतील अशा राहुट्यांचीच खरेदी करण्यात यावी.

१५३. (१) एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यास किंवा विशिष्ट वर्गाच्या शासकीय कर्मचाऱ्यांना कार्यालयीन उपयोगासाठी किंवा वैयक्तिक वापरासाठी पुरवाबयाच्या सरकारी राहुटयांचे प्रमाण मुंबई नागरी सेवा नियम—वित्तीय प्रकाशन क्र. पाच, याच्या परिशिष्ट एकोणतीसमध्ये विहित करण्यात आले आहे.

(२) ज्यांना शासनाकडून राहुटया पुरवण्यात आल्या असतील अशा अधिकाऱ्यांना, केवळ त्या राहुटया ज्या कालावधीपर्यंत टिकल्या पाहिजेत तो कालावधी संपला आहे म्हणून, नवीन राहुटया मिळण्याचा हक्क असणार नाही. जुन्या राहुटया निरुपयोगी झाल्या आहेत याबद्दलचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नवीन संच खरेदी करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

(३) पोलीस विभागातील अधिकाऱ्यांकरिता पोलीस महानिरीक्षकांनी राहुटया खरेदी कराव्यात.

(४) राहुटया शासनाकडून पुरवण्यात आल्या असतील आणि त्यांचा खर्च राहुटयांच्या भत्त्यातून देण्यात आलेला नसेल तेव्हाच फक्त राहुटयांच्या वाहणावळीचा खर्च शासनाकडून आकारण्याजोगा ठरेल.

उपविभाग एकोणतीस—बक्षिसे

१५४. निरनिराळ्या वर्गातील पारितोषिके मंजूर करण्यासंबंधीचे आदेश मोडक्यात खाली नमूद केले आहेत.

१५५. मुंबई मुद्रांक नियम, १९३९ चा नियम २४ अन्वये दंडाच्या रकमेच्या निम्म्यापेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम बक्षिस म्हणून माहिती पुरवणाऱ्यास देता येईल.

१५६. उत्पादनशुल्काच्या प्रकरणांमध्ये (अफूच्या प्रकरणांसह) द्यावयाच्या बक्षिसांचे नियमन करणारे नियम, मुंबई उत्पादनशुल्क नियमपुस्तिका, खंड दोन मधील परिच्छेद ३०१ ते ३०९ मध्ये अंतर्भूत आहेत.

१५७. पोलीस व इतर व्यक्ती, तसेच रेल्वेचे पोलीस यांना बक्षिसे देण्यासंबंधीचे नियम मुंबई पोलीस नियमपुस्तिका, १९५०, खंड एकच्या नियम २३९ ते २४५ मध्ये अंतर्भूत करण्यात आले आहेत.

वन्य प्राणी नष्ट करणे

१५८. शासनाने मानवी जीवितास आणि मालमत्तेस धोका निर्माण करणाऱ्या विशिष्ट वन्य प्राण्यांचा नाश करण्यासाठी द्यावयाच्या बक्षिसांचे दर खाली दिल्याप्रमाणे मंजूर केले आहेत :—

(ए) **वाघ किंवा चित्ता यासाठी.**—मुंबई वन्य प्राणि व वन्य पक्षी रक्षण अधिनियम, १९५१ चे कलम १३ (तीन) अन्वये वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याने दिलेल्या अनुज्ञप्तीच्या प्राधिकाराखाली मारलेल्या प्राण्यांसाठी त्या प्राण्याच्या शिकारीसाठी ठेवलेल्या करंडकासह ५० रुपयांचे रोख बक्षिस.

(बी) **मस्त हत्ती करिता.**—मुंबई वन्य प्राणि व वन्य पक्षी रक्षण अधिनियम, १९५१ चे कलम १३ (तीन) अन्वये वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याने दिलेल्या विशेष अनुज्ञप्तीच्या प्राधिकाराखाली मारलेल्या हत्तीसाठी, त्याच्या शिकारीसाठी ठेवलेल्या करंडकासह ५० रुपयांचे रोख बक्षिस.

अनुज्ञप्तीच्या प्राधिकाराशिवाय, स्वसंरक्षणार्थ मारलेला वन्य प्राणि नष्ट केल्याबद्दल कोणत्याही प्रकारची बक्षिसे देण्यात येऊ नयेत.

(सी) **माकडांकरिता.**—प्रत्येकी एक रुपया.

रानटी कुत्रे, रानडुकरे, लांडगे इत्यादी प्राण्यांचा उपद्रव कमी असल्यामुळे व त्यांच्यापासून मानवी जीविताला व मालमत्तेला गंभीर धोका पोहोचत नसल्यामुळे त्यांचा नायनाट करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे बक्षिस देण्यात येऊ नये. तथापि, आवश्यकता भासल्यास ते प्राणि नष्ट करण्यासाठी वन्य प्राणिरक्षा अधिकाऱ्याने शिकार पथकांची व्यवस्था करावी व शासनाची पूर्वसंमती घेऊन त्यांना पारिश्रमिक द्यावे.

जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळे आणि शासनाकडून विशेषरीत्या शक्ती प्रदान करण्यात येतील असे इतर अधिकारी यांनीच बक्षिसे मंजूर करावीत.

निविदा करारपत्रातील कामातील उणीवांच्या दुरुस्तीचा कालावधी (Defect Liability Period) निश्चित करणे.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

दिनांक : १४ जानेवारी, २०१९

वाचा - सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीएटी-१०८७/सीआर-९४/इमारती-२, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : १४ जून, १९८९

प्रस्तावना :-

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये करण्यात येणाऱ्या रस्ते, पूल, इमारतींच्या मूळ तसेच दुरुस्तीच्या विविध बांधकामांसाठी संदर्भिय परिपत्रकाव्दारे सन १९८९ मध्ये दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) निर्धारीत करण्यात आला असून त्यानंतर त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत. सन १९८९ नंतर गेल्या तीस वर्षाच्या कालावधीत बांधकाम साहित्याचे प्रकार तसेच बांधकामाच्या तंत्रज्ञानामध्ये मोठया प्रमाणात आमुलाग्र बदल झाले आहेत, तसेच बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यांचा दर्जा व विविधतेत मोठया प्रमाणावर बदल होत आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सर्वसाधारणपणे भारतीय रस्ते महासभा यांची मानके व रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या विनिर्देशानुसार रस्ते व पुलांची बांधकामे करण्यात येतात. रस्ते व पूल यांची बांधकामे करणारी रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने त्यांचे बांधकामांसाठी दोष दायित्व कालावधी नव्याने निर्धारीत केले आहेत.

वाहतुक क्षेत्रात होत असणाऱ्या प्रचंड वाहतुकीची वाढ व त्यानुसार बदलत्या बांधकाम क्षेत्रातील कार्यपध्दती यांचा विचार करता बांधकाम खात्रीने दोषरहित होणे व टिकाऊ होणे व याद्दष्टीने करारनाम्यातील दोष दायित्व / उणीवांच्या दुरुस्तीचा कालावधी (Defect Liability Period) सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये करण्यात येणाऱ्या रस्ते, पूल, इमारतींच्या मूळ तसेच दुरुस्तीच्या विविध बांधकामांसाठी खालीलप्रमाणे दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) निर्धारीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अ.क्र.	बांधकामाचा प्रकार	प्रस्तावित दोष दायित्व कालावधी
	अ) इमारती	
१.	मूळ बांधकामे	
	१.१) आर.सी.सी. फ्रेमचे बांधकाम	१० वर्षे
	१.२) लोड बेअरींगचे बांधकाम	१० वर्षे
	१.३) जल प्रतिबंधक उपाय योजना	७ वर्षे
२.	दुरुस्ती	
	२.१) विविक्षित / भांडवली स्वरुपाची दुरुस्ती (SDR/CTR)	५ वर्षे
	२.२) विशेष दुरुस्ती (Special Repairs)	२ वर्षे
	२.३) किरकोळ दुरुस्ती (Current Repairs)	१ वर्षे
	ब) रस्ते	
१.	डांबरीकरण / Flexible Pavement	
	१.१) संकल्पनानुसार पूर्ण तरतूद करुन बांधकाम	५ वर्षे
	१.२) मजबूतीकरण / पूर्ण लांबीमध्ये किमान दोन थर - MPM/ BM	३ वर्षे
	१.३) DBM चा १ थर व त्यावर B.C. / O.G.C. चा थर किंवा संकल्पनानुसार पहिल्या टप्प्याचे बांधकाम (Stage Construction)	३ वर्षे
	१.४) फक्त डांबरी नुतनीकरण - पूर्ण लांबीमध्ये एक थर	२ वर्षे
	१.५) भागाभागात patches of MPM/ BM/DBM चा १ थर व त्यावर पूर्ण लांबीत B.C. / O.G.C. चा थर	२ वर्षे

२.	कॉन्क्रीटीकरण / Rigid Pavement	
	२.१) संकल्पनानुसार ३० से.मी. किंवा त्यापेक्षा जास्त जाडी	१० वर्षे
	२.२) संकल्पन न करता केलेल्या पायवाटा, गावांतर्गत रस्ते व अन्य रस्ते	३ वर्षे
	२.३) कॉन्क्रीट पेव्हर ब्लॉक वापरुन केलेली कामे	५ वर्षे
३.	रस्ते खडीकरण	१ वर्ष
४.	रस्ते किरकोळ दुरुस्ती	१ वर्ष
	४.१) डांबर मिश्रित खडीने खड्डे भरणे, चुना गेरु रंगविणे.	(डिसेंबर ते जुन) नजिकच्या पावसाळया पर्यंत
	४.२) आय.आर.सी. मानकानुसार बसविलेले फलक	५ वर्षे
	४.३) मार्गिका दर्शक व इतर थर्मोप्लास्टीक पेंट	३ वर्षे
	क) पूल व मोऱ्या	
१.	मूळ बांधकाम	
	१.१) पूलाचे बांधकाम	२० वर्षे
	१.२) स्लॅब ड्रेन व पाईप मोऱ्या	१० वर्षे
	१.३) कॉन्क्रीटच्या बांधीव गटारी Built Up Gutter	१० वर्षे
२.	दुरुस्ती	
	२.१) विशेष दुरुस्ती - बेअरींग बदलणे, प्रसरण सांधे बदलणे, पॅरापेट वॉलची पुनर्बांधणी करणे, पाईप रेलींग बसविणे, पिअर/ अबटमेंटला जॅकेटींग करणे, इत्यादी.	५ वर्षे
	२.२) पुलावरील वेअरींग कोर्स	५ वर्षे
	२.३) पुलाचे इपॉक्सी पेंटने पेंटींग करणे व तत्सम दुरुस्ती करणे	३ वर्षे

पूर्ण करण्यात आलेल्या बांधकामांची दोष दायित्व कालावधीत वर्षातून किमान दोनदा (सर्वसाधारणपणे पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर) पाहणी करण्याची जबाबदारी संबंधित उप विभागीय अभियंता यांची राहील.

दोष दायित्व कालावधीत कामामधील उणीवा बारकाईने तपासाव्यात. जर आढळलेल्या उणीवा ह्या दुरुस्ती करण्याच्या आवाक्याबाहेर असल्यास / पूर्ण कामच नव्याने करावयाची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे पुन्हा बांधकाम करण्यासाठी कंत्राटदारास सूचना देऊन तीन महिन्यामध्ये काम नव्याने करुन घेण्यात यावे. या बाबतीत काही वाद उद्भवल्यास मुख्य अभियंता यांना अहवाल सादर करुन त्यांचेकडून निर्णय घेण्यात यावा. मुख्य अभियंता यांचा निर्णय हा अंतिम व कंत्राटदारास बंधनकारक राहील अशा स्वरुपाची भर निविदेत नमुद करावी.

उपविभागीय अभियंता यांनी दोष दायित्व कालावधीमध्ये वरीलप्रमाणे पाहणी केल्यानंतर कामामध्ये दोष / उणीवा आढळल्यास कंत्राटदाराकडून त्या त्या वेळी आवश्यक दुरुस्ती / पुनर्बांधणी करुन घेण्यात यावी. दोष दायित्व कालावधी संपण्याच्या किमान तीन महिने आधी कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी एकत्रितपणे कामाची पाहणी करुन त्या अनुषंगाने कंत्राटदाराने केलेल्या दुरुस्तीबाबतचा आढावा घ्यावा ६०० मीटरपेक्षा जास्त लांबीच्या पुलांची व १००० स्क्वे.फु.मी. जोते क्षेत्रफळापेक्षा जास्त जोते क्षेत्रफळ असलेल्या इमारतीचे दुरुस्ती कामांचे पूर्ननिरीक्षण अधीक्षक अभियंता यांनी दर सहामाही करावे.

२. निविदेमधील प्रपत्रामध्ये विविध प्रकारच्या कामांसाठी उणीवा दुरुस्तींचा कालावधी उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे ठेवण्यात यावा. तसेच निविदा प्रपत्रामध्ये दोष दायित्व कालावधीत करावयाच्या पाहणी व दुरुस्तीबाबत उपरोक्त परिच्छेदात नमूद बाबी निविदेमधील कलमांमध्ये अंतर्भूत करण्यात याव्यात.

३. यापूर्वीच्या परिपत्रकातील या संदर्भात देण्यात आलेल्या सर्व सूचना अधिक्रमीत करुन या सुचना प्रसिध्द होण्याच्या दिनांकापासून लागु राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०११४१२३७१७३५१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Salunke
Bapurao
Popatrao

(बी.पी. साळुंके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (विद्युतसह)
२) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई
३) सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत/यांत्रिकी)
४) सर्व कार्यकारी अभियंते
५) कार्यासन इमारती २-(निवडनस्ती).

ANNEXURE 22.01

- - - - - - - - - - - -

Fin. R. Form No. 1

(See Fin. Rs. 3 and 6) Block	Receipts for Payments to Government (See Fin. R. 3)
Book No. . . . . Receipt No.	Book No. . . . . Receipt No. . . . .
Division . . . . . Date.	Place . . . . . .Date . . . . . 19 .
Received from	Division . . . . .
. . . . .	Received from . . . . .
Rupees	. . . . .
On account of	Rs. . . . . Rupees . . . . .
. . . . .	. . . . .
Initials of Cashier or Accountant — Initials of officer granting the Receipt	Designation.

ANNEXURE 22.02

Appendix 3

(See Fin. R. 51)

Form of Personal Security Bond

KNOW ALL MEN by these presents that I, A.B. of . . . . . am held and firmly bound unto the Governor of Bombay (hereinafter referred to as "the Governor" which expression shall, unless excluded by or repugnant to

the context, include his successors in office and assigns) in the sum of rupees. . . . . (Rs. . . . .) to be paid to the Governor for which payment, well and truly to be made, I bind myself, my heirs, executors, administrators and legal representatives by these presents.

WHEREAS the above bounden A.B. was on the . . . . . day of . . . . 19. . . appointed to and now holds the office. . . . . .in the office of . . . . . .

AND WHEREAS the said A.B. . . . . .by virtue of such office is bound to collect (here describe the nature of the Cashier's/ /Store-Keeper's/Sub-Store-Keeper's/Subordinate's duties) and to keep and render true and faithful accounts of his dealing with all property and money which may come into his hands or possession or under his control, such accounts to be kept in t he form and manner that may, from time to time be prescribed by duly constituted authority and also to prepare and submit such returns. accounts and other documents as may from time to time be required of him;

AND WHEREAS the said A.B., has, in pursuance of rule 51 of the Bombay Financial Rules, 1959, been called upon to execute a bond with two sureties in favour of the Governor in the abovementioned sum of rupees. . . . . (Rs. . . . . .) for the due and faithful performance by the said A.B. of the duties of his office, and of any other office requiring security to which he may be appointed at any time and of other duties which may be required of him, while holding any such office as aforesaid and for the purpose of securing and indemnifying the Governor against all loss, injury, damage, costs or expenses which the Governor may, in any way, suffer, sustain or pay, by reason of the misconduct, neglect, oversight or any other act of the said A.B. or of any person or persons acting under him or for whom he may be responsible.

NOW, the condition of the above-written bond is such that if the said A.B., has whilst he has held the said office of. . . . as aforesaid always duly performed and fulfilled the duties of his said office and if he shall whilst he shall hold the said office or any other office requiring security to which he may be appointed, or in which he may act, always duly perform and fulfil all and every duties thereof respectively and other duties which may from time to time be required of him, while holding any such office as aforesaid and shall duly pay into the Government Treasury at . . . . . all such moneys as are payable to Government and shall come into his possession or control

by reason of the said office and shall duly account for and deliver up all moneys, papers and other property which shall come into his possession or control by reason of the said office and if the said A.B., his heirs, executors or administrators shall pay or cause to be paid unto the Governor the amount of any loss or defalcation in the accounts of the said. . . . . .within 24 hours after the amount of such loss or defalcation, shall have been demanded from the said A.B., by the . . . . . Such demand to be in writing and left at the office or last known place of residence of the said A.B., and shall also at all times idemnify and save harmless the Governor from all and every loss, injury, damage, costs or expenses which has been or shall or may at any times or time hereafter during the service or employment of the said A.B., in such office as aforesaid, or any such other offices aforesaid, be sustained, incurred, suffered or paid by the Governor by reason of any act, embezzlement, defaication, mismanagement, neglect, failure, misconduct, default, disobedience, omission or insolvency of the said A.B., of any person or persons acting under him or for whom he may be responsible, then this obligation shall be void and of no effect; otherwise the same shall be and remain in full force.

AND IT IS HEREBY FURTHER AGREED that in the event of the death of the said A.B., or on the final termination of the service of the said A.B., whether as such. . . . . as aforesaid, or otherwise, or in the event of the said A.B., ceasing to hold any office, requiring security this bond shall remain with the . . . . . [+][permanently or until it is certain that there is no further necessity for keeping it] for recovering any loss, injury, damage, costs or expenses that may have been sustained, incurred or paid by the Governor owing to the act, neglect or default of the said A.B., or any such other person or persons as aforesaid and which may not have been discovered until after his death or the termination of his said service or his ceasing to hold any office for which the security was required:

PROVIDED always that without prejudice to any other rights or remedies for recovering the loss or damage as aforesaid it shall be open to the Governor to recover the amount payable under this bond as an arrear of land revenue.

IN WITNESS WHEREOF the said A.B., has hereunto set his hand this . . . . . day of. . . . 19

Signed and delivered by the abovenamed
A.B. in the presence of-

1.

2.

(Signatures)

We. . . . . .hereby declare ourselves sureties for the abovesaid A.B. . . . . .that he shall do and perform all that he has above undertaken to do and perform, and in case of his making default therein, we hereby bind ourselves jointly and severally to forfeit to the Governor the sum of Rs. . . . . .in which the abovesaid A.B., has bound himself, or such other lessor sum as shall be deemed to be sufficient by the . . .*. . . .to cover any loss or damage which the Governor may sustain by reason of such default.

And we agree that the Governor may, without prejudice to any other rights or remedies of the Governor, recover the said sum as an arrear of land revenue.

And we also agree that neither of us shall be at liberty to terminate his suretyship, except upon giving to the said. . . . . *. . . . six calendar months' notice in writing of his intention so to do and our joint and several liability under this bond shall continue in respect of all acts, embezzlements, defalcations, mismanagements, neglects, failures, misconducts, defaults, disobedience, omissions and insolvencies on the part of the said . . . . . until the expiration of the said period of six months.

Dated this the . . . . . day of . . . . . 19.

Signature of sureties in the presence of-

1.

2.

(Signatures)

In the presence of-

1.

2.

(Signatures)

*** To be filled in.**

+ Substituted by Notification dated 1.12.1969

- - - - - - - - - - - - -

ANNEXURE 23.01

मार्किंग रेकार्ड तक्ता

१ दिनांक	२ जंगल क्रमांक झाडाचा अनुक्रमांक	३ जात	४ छाती गोलाई (से.मी.)	५ झाडाची वर्णावली इमारती, सुतार, जळावू	६ मार्किंग करणा-याची सही	७ शेरा	८ दिनांक	९ जंगल क्रमांक झाडाचा अनुक्रमांक	१० जात	११ छाती गोलाई (से.मी.)	१२ झाडाची वर्णावली इमारती, सुतार, जळावू	१३ मार्किंग करणा-याची सही	१४ शेरा

ANNEXURE 23.02

..... विभाग

जंगल रजिस्टर

लोडीचा दिनांक	चिन्हांकन यादीचा अ.क्र.	प्रजाती	छाती उंचीवरील वेढी से.मी. मध्ये	तुकडयांची संख्या	लाकडा क्र.	लांबी से.मी.मध्ये	वेढी से.मी मध्ये	घनमिटर				घसान क्रमांक	तारीख	विक्री डेपो क्रमांक	लांबी से.मी. मध्ये	वेढी से.मी. मध्ये	घनमीटर	शेरा
								दर्जा I	दर्जा II	दर्जा III	एकुण							
१	२	३	४	५	६	७	८	९				१०	११	१२	१३	१४	१५	१६

ANNEXURE 23.03

मोजमाप नोंदवही - तोडकाम रजिस्टर

वन विभाग .....

मजूराचे नांव	मोजमापाची तारीख	लट्ठ्या क्र.	प्रजाती	लांबी मीटर मध्ये	वेढी से.मी. मध्ये	घनमीटर	झाड क्र.	ओक्शावळ रजिस्टर क्र.	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०

गाठ गोहणी रजिस्टर

गल्ला नंबर	वृक्ष क्रमांक	प्रजाती	गाठ गोहणी अनुक्रमांक	डेपो क्रमांक तारीख	गाठ गोहणीपूर्वी			गाठ गोहणीनंतर			घनमीटर मधील तफावत		निकाशी		कोठे पाठविला	शेरा
					लांबी	बेढी	घनमीटर	लांबी	बेढी	घनमीटर	अधिक (+)	वजा (--)	घसाण क्रमांक	दिशांक		
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७

ANNEXURE 23.04

ANNEXURE 23.05

वनविभाग .....

कामाचे वर्ष २०० - २००

मोजमाप नोंदवही - ओढणावळ रजिस्टर

कम्पार्टमेन्ट क्रमांक	पातणश्रेणी		कूप क्रमांक		क्षेत्र
मजुराचे नांव	मोजमाप तारीख	झाड क्रमांक	तट्टया क्रमांक	घनमीटर	शेरा
१	२	३	४	५	६

कुपातील मालांचे जावक रजिस्टर

वनविभाग .....

अ. क्र.	तारीख	चालान क्र.	टक क्र.	चालकाचे नांव	प्रजाती	नग	घनमीटर	एकुण वेरीज	डेपोमध्ये माल मिळाल्याची प्रत परत मिळाल्याची तारीख	स्वाक्षरी
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११

ANNEXURE 23.06

ANNEXURE 23.07

डेपोमधील आवक - जावक व शिल्लकीचा दैनंदिन गोषवारा

डेपो .....

तारीख	प्रजाती	मागील शिल्लक		दिवसाची आवक		दिवसाची जावक		शिल्लक	
		नग	घनमीटर	नग	घनमीटर	नग	घनमीटर	नग	घनमीटर
१	२	३	४	५	६	७	८	९	१०

डेपोमधून इमारती माल निकासी दर्शविणारे रजिस्टर

..... विभाग

निकासी दिनांक	चालान क्रमांक	प्रजाती	वर्ष	निकासी परिमाण		कोठे पाठविला	शेरा
				नग	घनमीटर		
१	२	३	४	५	६	७	८

ANNEXURE 23.08

ANNEXURE 25.01

शासनाच्या वन विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांची, वेतन व भत्त्याची देयके कोषागारातून पारीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : मकोनि-१०००/प्र.क्र.४४/०५/कोषा-प्र-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ जानेवारी, २००६

शासन निर्णय :

